भारत-इतिहास-संशोधन-मंडळ

# शिव-चरित्र-वृत्त

( १ ला खंड : कानडी विभ

पां. भी. देसाई, एम्. ए.

भारत-इतिहास-संशोधन-मंडळ-पुणें स्वीयग्रंथमाला क्र. ४१.

# शिव-चरित्र-वृत्तसंग्रह

## ( १ ला खंड : कानडी विभाग )

AcN 194743
SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY
PUNE 411 004
FOR INTERNAL CIRCULATION
To be returned on or before the last date stamped below.

23 JUL 2012

मुद्रक—अनंत विनायक पटवर्धन, बी. ए.
'आर्यभूषण छापखाना'
पुणें, पेठ भांबुर्डा, घ. नं. ९१५।१.

प्रकाशक—प्रो. दत्तो वामन पोतदार
श्री. सर. गंगाधरराव नारायणराव मुजुमदार
चिटणीसः भारत इतिहास संशोधक मंडळ पुणें.

# प्रस्तावना.

महाराष्ट्रीय इतिहासाभ्यासकांना—विशेषतः शिवकालीन इतिहासाच्या विद्यार्थ्यांना—श्रीशिवचरित्रासंबंधी उपलब्ध होईल तें देशी, विदेशी इत्यादि अनेक तऱ्हेचें तत्कालीन वाङ्मय संशोधनपूर्वक प्रसिद्ध करावयाचें हा शिवचरित्रसाधनसमितीच्या चालकांचा मुख्य उद्देश आहे. आणि त्यास् अनुसरून प्रस्तुत शिवचरित्रवृत्तसंग्रहापैकीं कर्नाटकविभागाचा खंड आज प्रकाशित होत आहे.

मराठी, कानडी, फारशी, इंग्लिश, डच इत्यादि अनेक भाषांमधून आतांपर्यंत शिवकालीन पत्रव्यवहार ज्याप्रमाणें बराच उपलब्ध झाला आहे त्याचप्रमाणें बखरीवजा असें शिवकालीन व शिवचरित्रात्मक असें वाङ्मयही बरेंचसें उपलब्ध झालें असून त्यापैकीं मराठींत असलेल्या बहुतेक सर्व शिवचरित्रात्मक बखरींचें प्रकाशन होऊन गेलें आहे. त्याचप्रमाणें फारशी व इंग्लिश इत्यादि परभाषांतून असलेलें शिवचरित्रात्मक वाङ्मय हेंही प्रत्यक्ष मराठींत नसलें तरी त्या त्या भाषेंत छापलेलें अंशतः उपलब्ध आहे. आणि तें बरेंचसें इंग्लिश असल्यामुळें व हल्लीं तरी ती भाषा आपणाला परकी नसल्यामुळें अभ्यासकाची तितकी अडचण होत नाहीं. परंतु प्रस्तुत खंडांत आलेलें कानडी भाषेंतील वाङ्मय महाराष्ट्रीय वाचकांना अगदींच नवखें व अपरिचित असल्यानें तें जसेंच्या तसें अनुवादरूपानें प्रसिद्ध करावें लागलें. हा अनुवाद करतांना मराठ्यांच्या—विशेषतः शिवकालाच्या—दृष्टीनें उपयोगी दिसेल तेवढाच भाग घेऊन फक्त त्याचें सार येथें दिलें आहे.

या खंडांत जे ग्रंथ सारांशरूपानें प्रसिद्ध केले आहेत, त्यांत कर्नाटक व महाराष्ट्र या दोन्ही देशांच्या गतेतिहासाचें ज्ञान होण्यास उपयुक्त अशी माहिती आली आहे. या माहितीचे शिवपूर्वकालीन, शिवकालीन व शिवोत्तरकालीन असे तीन विभाग पडतात. शिवपूर्वकालीन माहिती बहुतांशीं कर्नाटकासंबंधी आहे. ही माहिती बरीचशी ऐकीव असावी असें दिसतें. निदान महाराष्ट्रविषयीची या कालांतील माहिती ऐकीव अतएव विपर्यस्त आहे असें सहज दाखवून देतां येईल. शिवोत्तरकालीन माहितीलाही विशेष महत्त्व आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. इ. स. च्या १८ व्या शतकांतील पहिली पंचविशी सोडून

दिल्यास पुढील तीन पंचविशींत मराठ्यांनीं उत्तरेंत व दक्षिणेंत केलेल्या कार्या-विषयींची कल्पना देणारे अस्सल कागदपत्र व ग्रंथ यांची सामुग्री इतकी प्रसिद्ध झाली आहे कीं, 'केळदिनृपविजया' सारख्या ग्रंथांतील माहितीनें ज्ञात गोष्टींत उलथापालथ होण्याचा संभव तर नाहींच; पण महत्त्वाची भर तरी पडेल कीं नाहीं या विषयीं शंका येते. तेव्हां या कालासंबंधींचें तांतडीनें परीक्षण अथवा विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं.

शिवकालाची गोष्ट थोडी वेगळी आहे. श. १५५८ मध्यें शहाजी कायमचा आदिलशाही नोकर बनल्यावर नंतरचें त्याचें बहुतेक आयुष्य दक्षिणेकडील प्रदेश विजापूरकरांतर्फे जिंकण्यांत व त्यांतील कांहीं प्रदेशांत आपलें आसन स्थिर करण्यांत खर्च झालें. या अवधींत त्यानें केलेल्या कार्याची चांगलीशी माहिती मिळत नाहीं. शहाजीच्या आयुष्यांतील हा काळ अंधारांतच आहे. संभाजी व राजाराम यांनीं दक्षिणेंत कोण कोणत्या उलाढाली केल्या या विषयींही कांहीं कल्पना आजच्या माहितीवरून आपणांस बांधतां येते. या ग्रंथांत सारांशिलेल्या पुस्तकांत दोन्ही काळांविषयीं थोडी बहुत माहिती आली असून तिचेंच विशेष महत्त्व आहे.

मुसलमानी साधनांतून आलेली माहिती जशी एकांगी असते तशी येथें सारांशिलेल्या ग्रंथांतील माहितीही एकांगी असण्याचा संभव आहे. पण दोन्ही बाजूंचें म्हणणें ऐकून घेतल्यानें न्यायाधीशापाशीं निकाल देण्यास आवश्यक अशी सामुग्री जमते तद्वत् दोन्ही अंगच्या हकीगती कळल्यानें आपणांस या वेळचा कर्नाटकाचा इतिहास यथास्थित समजण्यास पुष्कळ मदत होते. शिवाय मुहम्मदनामादि ग्रंथांत न आलेली अशी किती तरी माहिती 'कंठीरवनरसराजविजय' व 'केळदिनृपविजय' या दोन ग्रंथांमुळें उजेडांत येत आहे. रणदुल्ला व त्याच्या नंतरचे अधिकारी यांनीं केलेल्या कर्नाटकावरील स्वाऱ्यांत शहाजी हा एक महत्त्वाची व्यक्ति म्हणून उपस्थित होता. मुहम्मदनामादि फारशी व शिवभारतादि संस्कृत ग्रंथांतून त्याच्या कामगिरीविषयीं कांहीं माहिती आली आहे. तींत या पुस्तकांतील सारांशावरून भर पडण्यासारखी आहे. पण तिचें विवेचन करणें गुंतागुंतीचें असल्यानें तो मुद्दा सोडून देऊन येथें इतर पण महत्त्वाच्या मुद्यांचें दिग्दर्शन करतों.

जैतजी काटकर, दादजी काकडे, हरजी [महाडिक ?] इत्यादि मराठी वीरांनीं धर्मपुरी नांवाच्या किल्ल्यास आठ महिने वेढा घातला होता. पण वेढ्यांत

सांपडलेल्या म्हैसूरच्या सैनिकांनीं मराठ्यांचे मोर्चे वगैरे उसळून टाकिले. तेव्हां मराठ्यांनीं दक्षिणेकडील धर्मपुरीस (अर्थात् संयमिनीपट्टणास) वेढा घातला. या प्रकरणांत जैतर्जी काटकर कोतत्ती येथें व दादजी काकडे आणखी कोठें तरी मारले गेले इत्यादि माहिती या साधनांत आली आहे[1]. उपर्युक्त तिघांनीं श. १६०४ च्या चैत्रांत म्हैसूरकर व त्रिचनापल्लीकर यांच्या भांडणांत त्रिचनापल्लीकरांची बाजू घेऊन म्हैसूरकरांचा सरदार कुमार व दोन हजार घोडीं पाडाव केलीं असा एकच त्यांच्या कर्नाटकांतील कामगिरीविषयीं उल्लेख जेधे शकावलींत नमूद आहे.[2] तेव्हां वर दिलेली अधिक माहिती आपल्यापुढें नव्यानेंच येत आहे.

राजाराम पन्हाळ्याहून जिंजीस कोणत्या मार्गानें गेला या विषयीं आपणांस चांगलीशी कल्पना नव्हती. 'राजारामचरितम्'मध्यें तो तुंगभद्रा नदी ओलांडल्यावर पुढें अमूर म्हणजे अंबूर या गांवीं आला असें म्हटलें आहे. मासिर-इ-आलमगीरीमध्यें तो बिदनूरच्या हद्दींत कांहीं काळ लपून राहिला होता पण पुढें त्यास बाहेर जाऊं दिलें असें सांगितलें आहे. (पृ. ३२८). 'केळदिनृपविजयांत' केळदी येथें राज्य करणारी राणी चेन्नम्माजी हिनें राजाराम पन्हाळ्याहून तिच्या राज्यांतील पोन्नाळी गांवीं आला असतां त्याच्या विनंतीवरून आपल्या राज्यांत त्याला तिनें आश्रय दिला आणि गाजनूरची नदी उतरवून आडवाटेनें बोरे, नेडेहळ्ळि, आडुवळ्ळि, कळस, सांड्य, वसुधारे या गांवांवरून जिंजीकडे कसें पोहोंचविलें हें अधिक सांगितलें आहे.[3]

एकोजी (व्यंकोजी) हा एकदां संभाजीबरोबर त्यावेळचा म्हैसूरचा राजा चिकदेवराय यावर चढाई करून गेला होता; पण त्यांत त्याचा पराभव झाला. व्यंकोजीचा यशवंतराव नांवाचा एक मुख्य प्रधान होता; त्याच्यासह दोघांनीं मिळून पोसऊरु किंवा होसूरु हें वेढा घालून घेण्याचा प्रयत्न केला असतां म्हैसूरचा राजा चिकदेव यानें त्यांचा पराभव करून होसूरु तर घेऊं दिलें नाहींच, पण व्यंकोजीस बंगळूर मात्र हातचें गमवावें लागलें अशी माहिती आली आहे.[4] व्यंकोजीनें चिकदेवास बंगळूर विकलें अशी इतरत्र माहिती आहे.[5] यांतील सत्यासत्यनिर्णयास आणखी पुराव्याची आवश्यकता आहे.

---

१ पृ. २९, ३३, ३५, ३६. २ शिवचरित्रप्रदीप पृ. ३१-२. ३ पृ. ६५, ६६. ४ पृ. २९, ३२, ३४, ३५. ५ इंपीरियल गॅझेटियर व्हॉ. २ पृ. ६८.

अशा तऱ्हेनें शिवकालीन भागांवर थोडा फार प्रकाश पडण्यास प्रस्तुत साधनांचा विशेष उपयोग होईल असें वाटतें.

प्रस्तुत खंडांत एकंदर ८ बखरींवजा अशा गद्यपद्यात्मक कानडी ग्रंथांचा अवश्य तितका अनुवाद दिला आहे. त्यांपैकीं पांच ग्रंथ तर मुख्यत्वें म्हैसूरच्या राजवटीची माहिती देणारे आहेत. दोन ग्रंथ विजय-नगर–साम्राज्य–कालांत व त्याच्या नंतर टिकाव धरून राहिलेल्या पाळयांबद्दल व तेथील पाळेगार राजवंशांबद्दल माहिती सांगतात व एक ग्रंथ केळदि संस्थानचा विस्तृत असा इतिहास पुरविणारा आहे. पहिले तीन ग्रंथ हे ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीनें वरच्या दर्जाचे ठरण्यासारखे आहेत. कारण या ग्रंथांच्या कर्त्यानें त्यांत वर्णिलेले सर्व प्रसंग स्वतः अनुभविले आहेत. निदान हे प्रसंग घडत असतां तो हयात तरी होता. यामुळें केवळ कर्णोपकर्णी ऐकून कांहीं तरी लिहिलें असा आरोप प्रस्तुत लिखाणावर करतां येण्यासारखा नाहीं. अर्थात् येवढें मात्र खरें कीं, त्यांत पुष्कळसा आत्मप्रौढीचा व अति-शयोक्तीचा भाग असूं शकेल.

या पुढील दोन ग्रंथ विजयनगर साम्राज्यांत समाविष्ट असलेल्या लहान लहान पाळेगार राजांच्या राजवटींसंबंधीं आहेत. विजयनगर साम्राज्याच्या पडत्या काळांत हे पाळेगार स्वतंत्र तऱ्हेनें नांदूं लागले. तेव्हां संघशक्ति नाहींशी झालेल्या या साम्राज्यांतील निरनिराळया संस्थानांवर व पाळयांवर सदोदित टपून बसलेल्या विजापूर व भागानगर येथील मुसलमानांनीं हल्ला चढविणें क्रमप्राप्तच होतें. उपर्युक्त ग्रंथांतून त्या त्या पाळेगारांनीं झालेले हल्ले कसे परतविले व आपल्या पाळयांचें कसें रक्षण केलें वगैरे भाग आला आहे.

‘ केळदिनृपविजयम् ’ हा ग्रंथ विस्ताराच्या दृष्टीनें इतर ग्रंथांपेक्षां मोठा आहे व त्यांत ठिकठिकाणीं तारखाहि दिल्या आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे. परंतु ग्रंथाचा मुख्य उद्देश केळदीच्या राजांचीं चरित्रें देणें हा असल्यानें मराठे, मुसलमान वगैरेंचा भाग त्रोटकपणें वर्णन केला आहे. प्रस्तुत ग्रंथांत भोंसल्यांच्या मूळ पुरुषापासून ते अगदीं सदाशिवराव भाऊ पेशव्यापर्यंत मराठ्यांचा धावता इतिहास देण्याचा प्रयत्न केला आहे. हें सर्व टिपण बखरवजा, काल्पनिक व त्रोटक असें आहे. येथें या ‘ मराठ्यांच्या छोटेखानी बखरी ’चें थोडें परीक्षण करणें अवश्य आहे.

भोंसल्यांचा मूळ पुरुष हा अस्सल रजपूत असून त्यानें आपल्यापेक्षां निकृष्ट अशा ज्ञातींतील स्त्रीशीं विवाह केल्यामुळें पुढें जी संतती झाली तिला रजपूत मान्यता देईनात म्हणून हा दक्षिणेंत येऊन राहिला वगैरे माहिती फारशी तवारिखेंत व एका पोर्तुगीज बखरींत प्रचलित आहे. तिच्या सारखीच कथा प्रस्तुत ग्रंथांत आली आहे. लेखकानें शिवाजीच्या पूर्वजांचीं नांवें देतांना व त्यांच्याबद्दल दंतकथा ठोकून देतांना जो सांवळा गोंधळ केला आहे तो अगदीं हास्यास्पद आहे. शिवाजीच्या नांवावरच अशा ज्या कांहीं कथा मराठी बखरींतून रूढ आहेत, त्या कथा प्रस्तुत लेखकानें सोईचे प्रसंग पाहून शिवाजीच्या पूर्वजांच्या नांवावर घातल्या आहेत. प्रबळ किल्ल्यानजीक बोरीच्या झाडाला वस्त्र अडकणें व तेथें गुप्त द्रव्य मिळणें ही जी शिवाजीच्या संबंधी म्हणून रूढ असलेली कथा ती या ग्रंथांत शिवाजीचा एक पूर्वज—शिवाजीच पुन्हां तो—याच्या नांवावर दडपून दिली आहे. राज्याभिषेकाच्या वेळीं काशीच्या गागाभट्टानें शिवाजीस क्षत्रिय ठरवून उपनयनास पात्र केलें वगैरे भाग उपर्युक्त पूर्वजांशीं निगडित करून गागाभट्टाऐवजीं नागभट्ट नांवाचा एक काशीचा ब्राह्मण आणून तेथें घुसडला आहे. कोणी सांगावें हाही कदाचित् शिवाजीच्या पूर्वजांप्रमाणें गागाभट्टाचा पूर्वज नसेल म्हणून ! शिवाजी बालपणीं विजापुरीं असतांना घडलेला गोवधाचा प्रसंग चिटणिशी बखरीप्रमाणें यांतही बरोबर वर्णन केला आहे. पुढील बहुतेक सर्व भाग काल्पनिक असाच आहे.

शेवटले दोन ग्रंथ अगदींच त्रोटक असून त्यांत रणदुल्लाखानाच्या स्वारीचा व श्रीरंगपट्टणच्या वेढ्याचा उल्लेख आला आहे.

वरील सर्व ग्रंथ वाचल्यानंतर आपणाला एक गोष्ट कळून चुकते ती ही कीं, परकीय सत्तेच्या आक्रमणाला वाव व जोर मिळतो तो बहुधा स्वकीयांत पडलेल्या फुटीमुळें व फितुरीमुळें. कर्नाटकांत मुसलमानी सत्तेचा प्रसार कसा झाला याचेंही कारण वरील प्रमाणेंच सांगतां येईल. राक्षस तागडीच्या लढाईनंतर विजयनगरची सत्ता नाममात्रच उरली होती. त्यामुळें लढाईपूर्वी जे नायक व पाळेगार विजयनगरचे अंकित होते तेच आतां स्वतंत्र बनले, येवढेंच नव्हे तर राज्य वाढविणेच्या इच्छेनें ते एकमेकांशीं भांडूं लागले. या भांडणांत ज्यांना स्वतःच्या असमर्थतेची जाणीव झाली त्यांनीं भांडणांत आपला टिकाव लागावा म्हणून विजापूरकरांना मदतीस बोलाविलें. आदिलशाही सुलतान या संधीची वाट पहातच होते. त्यांनीं या निमित्ताचा फायदा

घेऊन इसापनीतींतील, घोडा व मनुष्य यांच्या गोष्टीप्रमाणें सर्वच नायकपाळे-गारांना धुडकाऊन देऊन स्वतःच दक्षिणचे बादशहा बनण्याचा प्रयत्न केला व तो बहुतांशीं सिद्धीसही गेला. या प्रयत्नाची विस्तृत हकीकत मुहम्मद-नाम्यांत आली असून या पुस्तकांतील माहितीनें तीस दुजोराच मिळतो. या प्रयत्नास निमित्त इक्केरी व बसवापट्टण येथील वीरभद्र व केंग-नायकांच्या भांडणांत मिळालें. केंगनायकानें विजापूरच्या आदिलशाहास मदत मागितली. त्यानें मोठ्या आनंदानें रणदुल्लाच्या हाताखालीं भलें मोठें सैन्य देऊन त्यास कर्नाटकांत रवाना केलें. त्यानें इक्केरींच्या नायकाची खोड मोडलीच पण त्यानंतर लवकरच शिरें, बंगळूर, बाळापूर, कोल्हार, बिज्जावर वगैरे अनेक प्रांत हस्तगत केले व तो परत विजापुरास गेला. रणदुल्लाच्या या उपद्व्यापानें केंगनायकाचे डोळे उघडले; पण इकडे केळदिनायकाच्या डोळ्यावर धुंदी आली. आतां त्यानें केंगनायकाविरुद्ध विजापूरकराकडे मदत मागितली. तेव्हां रणदुल्लाखानाची मोठ्या सैन्यासह पुन्हां रवानगी झाली. यावेळीं केंगनायकाची हड्डी नरम झाली व म्हैसूरकरांनाही पुष्कळ त्रास सहन करावा लागला. आपल्या राज्याचा बराच मोठा असा पूर्वेकडील भाग प्रयत्न करूनही त्यांना राखतां आला नाहीं. विजापूरकरांनीं म्हैसूरचा दडपतां आला तेवढा भाग दडपलाच; पण कर्नाटकाच्या दक्षिणेचा मुलूख जिंकून त्यांनीं आपल्या राज्यास जोडला. हा मुलूख जोडणें तिकडील नायकांच्या आपापसांतील भांडणामुळेंच शक्य व सोपें झालें. म्हैसूरकरांनीं विजापूरच्या सुलतानाला जरी बोलाविलें नाहीं तरी मराठ्यांविरुद्ध औरंगजेबास बोलावयास मात्र कमी केलें नाहीं. एतावता आपसांतील भांडणेंच दक्षिणेंतील प्रदेशांत मुसलमानी सत्तेचा प्रसार करण्यास कारणीभूत झालीं.

तात्पर्य, बरीच नवीन किंवा जुनीस दुजोरा देणारी माहिती या खंडांत आली आहे. अभ्यासूंना बारकाईनें अभ्यास करतां यावा एतदर्थ ती पुस्तकरूपानें आज प्रसिद्ध करीत आहों.


पुस्तकांतील अनुवादाचें मुख्य काम धारवाड येथील श्री. पांडुरंग भीमराव देसाई एम्. ए. यांनीं केलें असून मुद्रितें तपासणें, गांवें शोधणें, नकाशा तयार करणें वगैरे कार्य श्री. ग. ह. खरे व श्री. वि. वि. पटवर्धन बी. ए. यांनीं केलें आहे.

अक्षय्य तृतीया<br>श. १८६०

अ. वि. पटवर्धन,<br>द. वि. आपटे,<br>सभासद शिवचरित्र उपसमिती.

# अनुक्रमणिका

१ कंठीरवनरसराजविजयम् ... ... १
२ चिकदेवराजबिन्नपम् ... ... २८
३ अप्रतिमवीरचरितम् ... ... ३०
४ गुम्मनायकन पाळयाचे पाळेगार ... ... ३६
५ चित्रदुर्गचे पाळेगार ... ... ३९
६ केळदिनृपविजयम् ... ... ४०
७ चिकदेवराय वंशावळि ... ... ७४
८ चिकदेवराय विजय ... ... ७६
सूची
वंशावळी—( १ ) केळदिनायक ( २ ) म्हैसूर—ओडेयर


शिव चरित्र वृत्त संग्रह
१ कानडी विभाग
कनकगिरी
विजयानगर
गुत्ति
सवणूर
बंकापूर
सोंदे
रायदुर्ग
तवनिधी
कल्याणदुर्ग
हट्टी
नेडेहल्ली
पोन्नाळी
कुंदुरूपे
केळदी
अंबलिगोळ्ळ
बसवपट्टण
चित्रदुर्ग
इक्केरी
दुम्मी
सिमोग्गा
हिरियूर
बिदुरूरु
गुम्मनायकन्पाळें
होसंगडी
तरिकेरे
सीरे
कडूर
होळवनहल्ली
आडुवाळ्ळि
खांडय
दुरुगेरे
तुमकूर
कळस
बेलूरु
बागूर
बंगळूर
हासन
नागमंगल
केंगेरी
रुद्रपट्टण
होळल
चेन्नपट्टण
होसकूरू
श्रीरंगपट्टण
कोतत्ती
पिरियपट्टण
म्हेसूर
धर्मपुरी
सांबळ्ळी
सत्यमंगल
कालिकत

# शिवचरित्र-वृत्तसंग्रह

## खंड पहिला

### १ कंठीरवनरसराजविजयम्

या ग्रंथाचा कर्ता गोविंद वैद्य हा श्रीरंगपट्टणचा निवासी असून म्हैसूर राजांचा आस्थान कवि होता. कंठीरव नरसराज याचा दळवायि म्हणजे सेनापति नंजराजेन्द्र याच्या प्रेरणेनें हा ग्रंथ लिहिला असें यानेंच सांगितलें आहे. हा ग्रंथ शालिवाहन शक १५७० सर्वधारि संवत्सर किंवा इ. स. १६४८ यांत तयार झाला.

गोविंद वैद्य हा स्मार्त–ब्राह्मण असून संस्कृत व कन्नड या दोन्हीं भाषेंत पारंगत होता. हा सबंध ग्रंथ सांगत्य नांवाच्या लोकप्रिय वृत्तांमध्यें रचिला असून, याची गणना ऐतिहासिक काव्य या सदरांत होईल. याची शैली फार मनोहर आणि भाषा सरळ व लालित्यादिगुणमंडित आहे.

या ऐतिहासिक काव्याचा नायक म्हैसूरच्या राजांमध्यें अत्यंत शूर, चतुर व धीरोदात्त म्हणून नांवाजलेला कंठीरव नरसराज ( इ. स. १६३८–५९ ) असून, याचेंच चरित्र सविस्तरपणें यांत गोंवलेलें आहे. ग्रंथकर्त्यानें स्वतः या राजाच्या पदरीं राहून, याच्या कारकीर्दींतले अनेक प्रसंग प्रत्यक्षपणें पाहिलेले व अनुभवलेले असल्यामुळें, या ग्रंथांतील काव्याच्या भराऱ्या वगळल्या असतां राहिलेलीं इतर बहुतेक सारीं वर्णनें व वृत्तांत बहुतांशानें विश्वसनीय असले पाहिजेत.

रणदुल्लाखानाच्या दक्षिणेंतील स्वारीविषयीं मराठी व मुसलमानी वाङ्मयामध्यें अनेक ठिकाणीं उल्लेख आढळतात. पण ते त्रोटक व विस्तारहीन आहेत. या स्वारीचा सविस्तर वृत्तांत देण्याचें श्रेय या ग्रंथकाराकडे जात असून, ही सर्व माहिती आज प्रथमतः महाराष्ट्रीय अभ्यासूंपुढें येत आहे.

या ग्रंथाचे एकंदर सव्वीस ‘ संधि ’ आहेत त्यांपैकीं नऊ संधींमध्यें ( अकरा ते एकोणीस ) प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें मराठ्यांच्या इतिहासाशीं संबंध असलेले विषय आलेले आहेत. त्यांचा सारांश मूळांतल्या क्रमाप्रमाणें खालीं दिला आहे.

**अकरावा संधि—खान कर्नाटकांत येतो (पानें १९८ ते २२३.)**

इकेरीचा राजा व मानकरी केंग या दोघांमध्यें सरहद्दीच्या बाबत तंटा लागून वैमनस्य उत्पन्न झालें. पण आपल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर दोन हात करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें केंगेंद्रानें ( केंग नायकानें ) विजया( जा )पुराच्या बादशहाकडे

आपला दूत पाठविला. त्यानें पादशाहाचें मन वळवून, नजराणा देऊन, पैशाची आशा दाखवून त्याचें सैन्य आपल्या देशांत आणलें.

खानानें आपल्या मदतीला हनुमाचें बळ बोलावून घेतलें. इक्केरीच्या सैन्याचा पाडाव करावा या हेतूनें त्वरेनें चाल करून येऊन त्यानें हां हां म्हणतां शहराला वेढा दिला (१९८). तुरुकांच्या या हल्ल्यामुळें कावराबावरा झालेला इक्केरीचा राजा रानांत पळून गेला. शत्रूंनीं क्षणामध्यें किल्ला सर केला. त्यांनीं देवांची, गायींची व पतिव्रतांची विटंबना करून पुरामध्यें एकच हाहाकार उडविला. त्याचें काय वर्णन करावें! रणधुलिखानानें ठाणें देऊन हर्षभरानें राजवाड्यांतील सर्व वस्तु लुटून आणल्या. मग त्यानें पादशाहाकडे जाऊन नजराणा अर्पण केला.

अत्यंत आनंदभरित झालेल्या पादशाहानें खानाला सरलष्करी दिली व घोडदळ जमवून देऊन, विलंब न करितां कर्नाटक जिंकून आण जा अशी आज्ञा केली. पादशाहानें रणधूळीखानाबरोबर अंकुशखान इत्यादि खानांची पाठवण केली (१९९). खानाबरोबर पन्नास हजार घोडे, पांचशें हत्ती व चार लक्ष पायदळ असें सैन्य चाल करीत होतें. बसवपट्टणाला येऊन पूवल हनुमाची मैत्री संपादन करून, कर्णाटाच्या दळासमवेत त्या खळानें प्रयाण केलें.

त्यावेळीं हरुपनहाल्लि, कनकगिरी, सोंडूरु या किल्ल्यांचें व मोठ्या उज्जिनि राजांचें अपरिमित सैन्य एकत्र जमलें. रायदुर्गवाले, हट्टीचा वीरप्प नायक, दोड्डेरीचा राजा व विस्तृत असें कुंदुरुपेचें बल असा हा समुदाय ऐटीनें पुढें आला. आघाडीला झळपणाऱ्या बत्तीस आयुधांना पेलणारें हिरियूर तम्मणनायकांचें एकजुटीचें दळ आलें. चिकनायकनहळ्ळीच्या बैरनायकाचे व तुरुगेरेकरांचें सर्वदळ जुळवून पराक्रमी हनुमप्प नायक चालला (२००). बेलूरु, नरसिंहपूर, व पालुपरेकरांचें पायदळ व घोडदळ बरोबर घेऊन चालून येणाऱ्या हनुमप्प नायकाच्या आवेशाचें मी काय वर्णन करूं? दुर्ज्यानें आपल्या बरोबरीच्या अशा पन्नास खानांना घेऊन, सरंजामासह तोऱ्यानें चालून येणाऱ्या खानाच्या आडंबराचें मी काय वर्णन करूं? त्यांच्या चालण्यानें गिरिदुर्ग (हादरून) जमीनदोस्त झाले; पिण्यानें जलदुर्ग आटून गेले व त्याच्या शूर योद्ध्यांच्या क्रोधाच्या ठिणग्यांनीं वनदुर्ग जळून खाक झाले (२०१). आकाशांत उडणारे पक्षी त्या फौजेचा टप्पा ओलांडून जाण्यास असमर्थ झाल्यामुळें खालीं गळून पडत. रणधूळीखानाची अशी ही सेना मी काय वर्णूं! (२०२). या खानांच्या फौजा निरनिराळ्या जमावानें कूच करीत होत्या. हे खान हत्तीवरील हौद्यांत आपल्या स्त्रियांशीं आनंदानें खेळत खिदळत येत होते. त्यांच्या कांहीं स्त्रिया पालखींत बसून येत होत्या. या लष्करावरोबर नटलेल्या सुंदर वेश्यांगनाहि होत्या (२०३). गाड्यांवर लादलेल्या अगणित तोफाहि (फिरंगि) येत होत्या. बाणांनीं, भात्यांनीं व दारूच्या पिशव्यांनीं भरलेल्या गाड्यांची मोजदाद हजारांनीं होत होती. खेचरा-

वर लादलेल्या भांगेच्या थैल्या व मर्यांचीं पिपें किती होतीं तीं गणना करवत नाहीं. तसेंच अन्नसामग्रीचीं ओझीं वाहून नेणारे ते बैल व त्यांचे वाणी यांची गणती करणेंहि अशक्यच. या सैन्याबरोबर सुतार व लोहार होते. कुऱ्हाडी, कुदळी, अणकुचीदार पहारी, कोयते इत्यादि आयुधेंहि असंख्य होतीं (२०४). याप्रमाणें समस्त सन्नाहासमवेत रणधूळीखानानें कर्नाटक राज्यांत शिरून जिकडे तिकडे धुमाकूळ उडवून दिला.

सीरे सर करून, व तेथील राजाची यमसदनीं रवानगी करून आपल्या घोडदळाबरोबर रणधूळीखान मोठ्या उन्मादानें पुढें चालून आला. खानाच्या माऱ्यानें भांबावून गेलेला तुमकूरूचा राजा आपला सगळा प्रांत सोडून गिरिदुर्गाला पळून गेला. न नमतां तोंड देणारीं खेडींपाडीं व शहरें यांच्यावर खानानें हल्ला चढवून त्या सर्वांचा चेंदामेंदा करून टाकला. खानानें उध्वस्त केलेलीं पुरीं, खेडीं व अग्रहार यांमधील जनता भयभीत होऊन कोडगूच्या डोंगराळ प्रदेशांत आश्रयाला गेली (२०५). या दाणादाणींत मुलें एकीकडे तर आया दुसरीकडे,आणि नातेवाईक तिसरीकडे अशी कुटुंबांची वाताहत झाली. कोणी कणग्यांतलें सांठविलेलें विपुल धान्य सोडून गेले. शेतांत वाढून हातीं आलेल्या पिकांचा त्याग करून कांहींना निघावें लागलें. कोणास दुभत्या गाईम्हशींची आशा सोडावी लागली (२०६). गरोदर स्त्रिया व बाळंतिणी यांनाहि रानांवनांत पळून जाण्याची पाळी आली. मनांत खान, स्वप्नांत खान, डोळ्यासमोर खान, सर्वत्र खानाच्याच गोष्टी, सगळीकडे खानाचा जप. येणेंप्रमाणें लोकांची दैना उडाली.

खान मोरसु राज्यांत शिरला. तेथल्या गाई पकडल्या. लोकांच्या छातींत धडकी भरली. शरण आलेल्यांना आश्वासन देऊन खानानें पुढें चाल केली. बेंगलूरकराची खोडकी लवकर जिरवून टाकावी या हेतूनें खान आपल्या फौजेनिशीं शिवगंगेला आला व तेथें त्यानें तळ दिला. बेंगलूरूच्या राजानें खानाच्या या प्रचंड हल्ल्याची हकीकत ऐकून, आपल्या सैन्याची जुळणी करून त्याला तोंड देण्याची तयारी केली (२०७). तें पाहून तुरुकांनीं किल्ला व शहर यांवर हल्ला चढविला. शत्रूच्या माऱ्यानें हतबल झालेल्या किल्लेदारानें (गौड) शरण येऊन किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. रामगिरीचा दुर्ग इत्यादि बलिष्ठ प्रदेश त्या खळाच्या हातीं देऊन, शेजाऱ्यानें दिलेल्या कुणिगिल प्रदेशांत तो निघून गेला.

बल्लाळपुर, कोळाल, व विज्जावर येथील प्रभु (राजे) व मानकरी संत्रस्त झाले; आणि मागेल तें खानाला देऊन निघून गेले. चिकबळ्ळापुर, होळवनहळ्ळि व होसकोटे येथील नायक पराजित झाले; आणि आपलें सर्व सैन्य घेऊन खानाबरोबर चालले (२०८). बावलूरु, होसऊरु, कग्गोंदि, मास्ति, देवंडपुरी, सूरेबले,

सिडिलगट्ट यांचे राजेही आले. त्यानंतर पातशहाच्या आज्ञेप्रमाणें खानानें सहजीस (शहाजीस) बेंगलुरु देऊन पुढच्या राजकार्याचा मनसुबा केला.

'श्रीरंगपट्टण हें कर्नाटक सुंदरीच्या भालप्रदेशीं रत्नतिलकाप्रमाणें शोभत आहे. तें हस्तगत केल्यानें राजकार्य चांगलें साधेल. राजा राहात असलेल्या पट्टणाला वेढा देऊन सर केलें असतां, त्याचे सगळे खेळ बंद पडून, इतर सर्व शहरें आमच्या हातीं येतील.' येणेंप्रमाणें खानानें विचार करून, (इतर) खानांना अहेर पाठवून दिले व पुढील प्रयाणाचा निर्धार करून, येऊन बाहेर तळ दिला. सांकेतिक भेरी वाजूं लागल्याबरोबर सगळे खान मोठ्या हर्षानें सोन्याच्या पालख्यांतून किंवा हत्ती वगैरे वाहनांवर बसून आले (२०९). खानानें रामगिरिदुर्गास तळ दिला. खानानें इतर खानांना आपल्याजवळ बोलावून म्हैसूरच्या राजाचा पराक्रम आणि त्याचे सेनापति व मानकरी यांचा झुंजारपणा निवेदन केला.

"म्हैसूरचा अधिपति कंठीरव हा नरनारायणाप्रमाणें अत्यंत शूर आहे. लोकमाता चामुंडी त्याची कुलदेवता असून त्याच्यावर तिची कृपा आहे. द्वापार युगांत श्रीपति जसा नराचा (अर्जुनाचा) सारथि होऊन शोभला, तसा पश्चिमरंग हा नरपति कंठीरवाला प्रसन्न झालेला आहे (२१०). त्याच्या सरदारांबरोबर रणांगणांत उभा राहणारा कोणी शत्रुराजा नाहीं. मोठ्या सैन्यानिशींच त्याच्यावर गेलें पाहिजे. इतर राजांप्रमाणें लहान सहान दळ घेऊन भागणार नाहीं. याकरितां प्रथम मला आपल्या सैन्याची पाहणी केली पाहिजे. तेव्हां सर्व खान वजीरांनीं हिशेब करून आपापल्या दळाची नेमकी संख्या मला द्यावी. मग मी पुढें पाऊल टाकीन."

मग खानांनीं 'जी हुजूर' म्हणून आपआपल्या सैन्याचा तपशील सादर केला. आठ हजार घोडे, तीस मत्त हत्ती व दहा हजार पायदळ अशी सामुग्री खानाच्या सैन्यांत होती (२११). चार हजार घोडे, दहा हत्ती व अठरा हजार पायदळ असा हिशेब खानाचा बाप परात यानें दाखविला. सहा हजार पायदळ, आठ हत्ती व चार हजार घोडे इतकी संख्या कैरितिखानानें हाजर केली. आठ हजार उत्तम घोडे, वीस हत्ती व दहाहजार पायदळ इतकी फौज बलवंतखानानें निवेदन केली. आठ हजार कसलेले राऊत व तीस हत्ती अशी मुस्तफखानाची गणती होती. संध्या अबदुलखानाचा आंकडा सहा हजार घोडे, वीस माजलेले हत्ती व आठ हजार लढवय्ये असा होता. घोडे, हत्ती, पायदळ मिळून सहा हजार अशी यकलासखानाची मोजणी होती (२१२). बलिष्ठ अशा सहजींचें (शाहजींचें) दळ सहा हजार घोडे, लढवय्ये पंधरा हजार व दहा हत्ती यांचें

बनलेलें होतें. पांच हजार घोडे, वीस हत्ती व आठ हजार पायदळ अंबरखाना-जवळ होतें. दहा हत्ती, तीन हजार घोडे व सहा हजार पायदळ सिद्द रहिमाकडे होतें. ख्वाजीनें नवरत्नांनीं भूषित अशा घोड्यांची व पदातींची फौज खानाला दाखवून खुष केलें. नाचणारे चार हजार घोडे, उन्मत्त असे वीस हत्ती, व अगणित पायदळ असें आपलें सैन्य वेदोर्जीनें दाखविलें. रावत पंडिताच्या हाताखालीं तीन हजार घोडे, वीस हत्ती आणि पायदळ होतें (२१३). अंकुशखानापाशीं चार हजार घोडे, सहा हजार पायदळ व दहा हत्ती होते. नंतर सोलापुरचा सिद्दि मल्लिगेखान, बलशाली अह्मखान, व जिलहरखान यांनीं आपआपल्या फौजेचा आंकडा सांगितला. मामुदखान, गलियखान, पत्तेयखान यांनीं आपआपल्या सैन्याची माहिती सांगितली. गुज्जराती, कन्नोजी, सुरेसानी, पठाणी अशी अगणित फौज त्यांनीं विदित केली.

इकडे केंग मानकऱ्यानें कर्नाटकांत राज्य करणाऱ्या राजांच्या सैन्याचा वृत्तांत साविस्तरपणें खानास निवेदन केला. "हें पहा-हरुपनहळ्ळीचें दळ, हे इकडे सोंडूरचे वीर, हें गुडियकोटेचें सैन्य, ही उज्जिनीच्या योद्ध्यांची सेना (२१४), हे रायदुर्गचे, हे हद्दिच्या यलुप्प नायकाचे लोक, हे कुंदुरुपि दोड्डेरीचे लढवय्ये, हे हिरियूरचे, हे मत्तिगडाचे, हा चिक्कनायकपुराचा परिवार आणि हा तुरुगेरेवाल्यांचा तळ. हे बेलूरवाले, हे पालुपरेवाले आणि हा नरसिंहपूरच्या राजाचा जमाव, प्रलयकाळच्या समुद्राप्रमाणें पसरलेली बळ्ळापुर, बिज्जावर, कोळाल, होळवनहळ्ळि इत्यादींच्या राजांची ही सेना पहा. चिक बळ्ळापूर, बावलूरु, होसकोटे, कंगोंदि व मास्ती येथील हा वीरांचा समूह पहा."

रणधूळीखानानें याप्रमाणें सैन्याचा तपशील पाहिल्यावर, केंग नायकाची व खानांची सन्मानानें बोळवण केली (२१५). असें हें खानाचें लष्कर पन्नास हजार घोडेस्वार व पांचशें हत्ती मिळून [ एकंदर ] चार लक्ष इतकें भरलें.

'म्हैसूरवाले इतर राजांप्रमाणे नाहींत. ते कसलेले खंदे वीर आहेत बरें! त्यांच्याशीं जपून वागा' अशी खानानें खानांना ताकीद दिली.

हेरांनीं खान येत असल्याची बातमी गडकऱ्यांना दिली. त्यांनीं लगेच नरस राजाचा दळवायि नंजेंद्राकडे सेनापति चार (दूत) पाठविले (२१६). 'अफाट अशा सैन्यासमवेत खान आमच्यावर चाल करून आला आहे. त्यानें रामगिरि दुर्गालगत नदीकाठीं तळ दिला आहे. विदित असो. पुढील कार्य स्वामी जाणूनच आहेत.' अशी सेनापतीपाशीं दूतांनीं विज्ञापना केली. 'तो आला म्हणून काय झालें! तुम्ही सावधान राहून आपआपल्या दुर्गाचें रक्षण करा, जा.' अशी सेनापतीनें दूतमुखानें गडकऱ्यांना आज्ञा पाठविली.

मग दळपति नंजराज राजवाड्यांत आपल्या स्वामीच्या सन्निध आला व प्रमुख दासीकडून महत्त्वाच्या राज्यकार्याची वरदी पोंचविली. थळथळणाऱ्या शारदा मंडपामध्यें हंसतूलिकेच्या शय्येवर युवतिजनांबरोबर विद्याविनोदांत रममाण झालेल्या ( २१७ ) राजाच्या कर्णीं ही वार्ता पडली ! क्षणार्धांत त्याचे नेत्रप्रांत क्रोधानें आरक्त झाले. त्याच्या अणकुचीदार मिशा नाचूं लागल्या. मिशांवर बोट ठेवून त्यानें आपली तरवार उपसली. सिंहाप्रमाणें अत्यंत प्रतापशाली असा हा नरसिंह, खांबांतून उदय पावलेल्या संतप्त नरसिंहाप्रमाणें भासला ( २१८ ). दासीजनांना रजा देऊन, हुजऱ्याबरोबर सभागृहांत येऊन पोंचला. प्रणतहस्त दळपति नंजेन्द्राजवळ येऊन गर्जना करीत म्हणाला,

' खान आला काय ? आपला स्वामी पादशाहा याचें यश वाढविण्यासाठीं ? पुढें काय होईल याचा मुळींच विचार न करितां त्यानें आमची कुरापत काढलीच अं ! पट्टण इत्यादि सीमेवरच्या किल्ल्यांचा कडेकोट बंदोबस्त ठेवा ' अशी आज्ञा ऐकून नंजराजानें त्याप्रमाणें केलें ( २१९ ). दुर्गामध्यें शत्रुविध्वंसक अशा सर्व प्रकारच्या शस्त्रांचा व आयुधांचा संग्रह करण्यांत आला. बुरुजांवर तोफा (शतघ्नी) सज्ज झाल्या. गोलंदाजांनीं बंदुका तयार ठेवल्या. घंटा व झांज वाजवीत तळवारांचे ( पहारेकऱ्यांचे ) गट किल्ल्यामध्यें फिरूं लागले. अंगांत अस्वलाच्या कातड्याचें चिलखत व बाहूंना रक्षाकवच चढवलेले वीर डौलानें शोभूं लागले (२२३).

## बारावा संधि-श्रीरंगपट्टणचा वेढा.

इकडे रणधुल्लखान आपली सगळी फौज एकत्र करून वेढा देण्याच्या हेतूनें श्रीरंगपट्टणावर चालून आला. वाद्यांचा ध्वनि हाच मेघांचा गडगडाट, तलवारींची चमक ह्याच विजा, हत्तींच्या सोंडा याच मुसळधारा असा वर्षाकालचा देखावा भासूं लागला ( २२४ ).

खानाचें तें अपरिमित लष्कर अवलोकून ही तारकासुराची सेना कीं महिषासुराची झुंड असें वाटलें. सैनिकांच्या चालीनें वृक्षलतादिकांचा चक्काचूर उडवून वाद्यांच्या गजरानें जणूं काय ब्रह्मांडकटाहाचा भेद करीत त्या फौजेनें चेन्नपट्टणाच्या समोर तळ दिला. साल्वसेनेनें द्वारावतीला ज्याप्रमाणें वेढा दिला,त्याप्रमाणें खानानें श्रीरंगपट्टणास वेढा दिला ( २२५ ). पांचशें हत्ती व पन्नास हजार घोडदळ मिळून खानाचें लष्कर चार लक्ष होतें.

त्यानंतर एक लक्ष कर्नाटक बल घेऊन पूवल हनुम यानें तांतडीनें खानाच्या दक्षिणेस नदीकांठीं ठाणें दिलें. माजलेलें मोरस व बेलूरचे सैनिक यांनीं फार मोठ्या संख्येनें येऊन खानाच्या उत्तरेस तळ ठोकला ( २२६ ). मग तोफा व बंदुका यांची सरबत्ती सुरू झाली. महादेवाच्या तृतीय नेत्रांतून ठिणग्यांचा वर्षाव होत आहे कीं काय असें वाटलें. बाणांच्या चकमकीही झडूं लागल्या ( २२७ ).

मग सत्यप्रतिज्ञ कंठीरव राजा शत्रुबळाचें निरीक्षण करण्याकरितां आला. जसें आपल्या पुराला वेढलेल्या जरासंधाचें बळ श्रीकृष्णानें अवलोकिलें तसें यानें तुरुकांचे बळ अवलोकिलें ( २२८ ). चोहोंकडे पसरलेलें खळाचें तें सैन्य निरखून कंठीरव आपल्या आप्तमंत्र्यांना म्हणाला " अहो मंत्रिवर ! हा तो संग्रामशूर रणधूल्लिखान (२३०). याचा पराक्रम पाहून पादशाहानें याला सरलष्करी देऊन सन्मानून पाठविलें. त्याचें अत्यंत प्रीतिपात्र बनून प्रख्यात असा हा रणधूल्लिखान सर्व सेनेचा अधिपति जाहलेला आहे. पाणीदार अशा त्या घोडदळामध्यें तमासुराप्रमाणें शोभणारा तो कोण बरें ! "

मंत्री—" स्वामींच्या चरणीं विदित असो कीं तो खानाचा बाप; त्याला परातखान म्हणतात. "

कंठीरव—" दुस्तर अशा सेनासागराच्या मध्यभागीं प्रहस्ताप्रमाणें चालणारा तो कोण ?"

मंत्री—" प्रभो, त्याचें नांव मुस्तफखान. "

कंठीरव—" मंत्रिवर्य, अनेक घोड्यांच्या समूहामध्यें महिषासुराप्रमाणें येणारा तो कोण बरें ! "

मंत्रि—" महाराज तो **सहजि (शहाजी)** होय. " ( २३१ )

अशाच प्रकारें कंठीरवाच्या प्रश्नास उत्तरें म्हणून मंत्र्यानें शत्रुपक्षाकडील इतर सेनापति व सरदार यांची ओळख करून दिली. त्यांत बलवंतखान, यकलासखान, अंकुशखान, सिद्दराहिम, येकोतसारथि, अद्दमखान, चिलहरखान, मुलक, अंबरखान, कालेयखान, अब्दुलुखान, मामुद्दखान, घाटियखान, गालियखान, राघव पंडित, ' दुर्मति ' वेदोजी, खाजी, मल्लिगेखान हीं नांवें आहेत (२३४). तसेंच त्या लष्करांत कन्नोजी, पंडित सुरासानी, गुज्जराती, व वड्डीचे राऊत हे आहेत असें सांगितलें.

त्यानंतर ' समुद्र कितीही प्रवर्द्धमान झाला तरी अगस्त्यापुढें त्याची काय मातब्बरी ? ( २३५ ) खानाचें लष्कर केवढें कां असेना, आपल्यापुढें त्याचें काय चालणार ! वाऱ्यापुढें दिव्याची तशी त्याची अवस्था होईल.' असें बोलून मंत्र्यांनीं कंठीरवाच्या सामर्थ्याची स्तुति केली. नरसराजानें त्यांना अहेर दिले. मग त्यानें आपल्या सैन्याधिपतीच्या तोंडावर दृष्टि रोखली. तेव्हां बद्धांजलिपुट होऊन दळपति नंजेंद्रानें भाषण केलें, " स्वामीपर्यंत कशाला ! आपला हा सेवक सिद्ध आहे. रघुनाथसेवक सुग्रीवानें रावणसेनेचा धुव्वा उडविला त्याप्रमाणें मी या शत्रुसैन्याचा संहार करितों. मला विडा द्यावा. " सेनानायकाची ही उक्ति ऐकून कंठीरवानें हर्षानें मानकऱ्यांकडे आपला कटाक्ष फिरविला. तेव्हां त्यांनीं हात जोडून निवेदन केलें ( २३६ ).

• यानंतर निरनिराळ्या मानकऱ्यांनीं अनुक्रमानें ' मी लढून शत्रुपक्षाचा संहार करीन ' अशा अर्थाची प्रतिज्ञा केली. त्यांत हरद्पुर, चनपट्टण, सत्यागाल, कोटे, चेन्नरायपट्टण, तुरुगेरे, पिरियपट्टण, पट्टण, मळवाळिळ, नागमंगल, मैसूरू येथील मानकरी व अधिकारी यांचीं नांवें सांगितलीं आहेत ( २३८ ).

मग कंठीरव आपल्या या मानकऱ्यांचा सन्मान करण्यांत गुंतला असतां, रणधूळिखानानें पाठविलेले दूत त्याच्याकडे येऊन पोंचले. सलाम करून त्यांनीं खानाचा निरोप कळविला तो असाः "आमचे पादशहांच्या आज्ञेप्रमाणें वागून आम्ही कर्नाटकांतील राज्यें जिंकून घेतलीं. आपल्या शौर्याची वार्ता ऐकून आम्हांस फार आनंद जाहला आहे. तुमच्याशीं सख्य करावें अशी आमची मनीषा आहे. तुम्ही खंडणी घेऊन आपल्या सेनेसह आमच्याकडे यावें. मग आम्ही तुह्मांला घेऊन पुढील दिग्विजयार्थ प्रयाण करूं इच्छितों."

कठोर असे हे शब्द श्रवण करून, मंदहास्य करीत कंठीरव बोलला ( २३९ ) "तुमच्या मैत्रीची आम्हांला गरज नाहीं. आम्ही खंडणी मुळींच देणार नाहीं. आमची शक्ति पाहावयाची असेल तर सकल सरंजामासमवेत युद्धास या असें माझें उत्तर कळवा. सभोंवतालच्या गरीब बिचाऱ्या राजांवर चढाई केली; आम्हांलाहि तसेंच समजून येथें वेढा दिला काय ! आमच्यापुढें तुमचा पराक्रम आटला असें सांगा जा."

मग कंठीरवानें अहेर देववून त्या दूतांची बोळवण केली व सगळीकडे पहाऱ्याचा बंदोबस्त ठेवा अशी सेनापतीला आज्ञा दिली. ( २४० )

## तेरावा संधि—पट्टणावर चढाईची सिद्धता

कंठीरवाकडे पाठविलेले दूत परत खानाकडे येऊन पोंचले. कंठीरवाचा मनोदय काय आहे तें विलंब न करितां सांगण्याची खानानें त्यांना आज्ञा केली ( २४१ ). ' कंठीरव हा अत्यंत तेजस्वी व सुसज्जित आहे. देवाप्रमाणें पराक्रमी असलेल्या याच्याबरोबर दुराग्रहानें युद्ध चालविण्यापेक्षां संधान बांधून सख्य संपादन करणें हेंच हितकर आहे ' असें त्यांनीं सुचविलें. हें ऐकून खान त्यांच्यावर रागावला. त्यांना रजा देऊन तो आपल्या छावणींत आला. त्यानें आपल्या आप्त खानांना बोलावून घेऊन या शहराला निकराचा वेढा देऊन तें सर करणें फार कठीण कार्य आहे त्यांना म्हटलें.

त्यानंतर ते खान आपआपल्या शिबिरांत निघून गेले. यावेळीं सूर्यास्त होऊन सर्वत्र छावणीमध्यें दिवट्यांचा प्रकाश व वाद्यांचा गजर भरून गेला ( २४२ ). रोषाविष्ट खानानें खानांना पुन्हां बोलावून घेतलें. डोळ्यांतून जणूं काय आगीच्या ज्वाळा पाडीत असा तो त्यांना म्हणाला, " हा म्हैसूरचा राजा आमच्याशीं तडजोड न करितां युद्ध करूं पाहतो आहे. तुम्ही जोराचा वेढा देऊन

निकरानें त्याच्यावर तुटून पडा. " " जी हुजूर " असें बोलून खानवजीर निघून गेले व आपआपल्या सैन्याच्या सिद्धतेला लागले.

भानुमंडलाला मेघांनीं गराडा द्यावा त्याप्रमाणें खानाच्या फौजेनें दंगल माजवून चोहोंकडून पट्टणाला वेढा दिला ( २४४ ). ही गडबड ऐकून कंठीरव राजा आपल्या प्रचंड सेनापरिवारासह पुढें आला. त्याच्या वीरांच्या गर्जना व घोड्यांचें खेंकाळणें व हत्तींचे निनाद यांनीं बाहेरील छावणींतील लोकांच्या हृदयांत धडकी भरली.

म्हैसूरचें सैन्य पुढें आलेलें पाहून, खानानें हनुम याला त्याबद्दल माहिती विचारली. ( २४६ ) तेव्हां त्यानें कंठीरव राजा, सेनाधिपति नंजराजेन्द्र व इतर मानकरी वर्गाची माहिती सांगितली. व अशा या शूरांशीं सलोखाच करणें युक्त होय असें सुचविलें. खानानें त्याचें म्हणणें धुडकावून लावलें; व क्रुद्ध होऊन वजीरांना हुकूम सोडले. " किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालवा, खंदक बुजवून टाका, शिड्या उभारा, तुटून पडा, चढाई करा. "

" जी हुजूर " म्हणून एका क्षणाचाहि विलंब न करतां खानांनीं चढाईला सुरुवात केली. पण त्याच क्षणीं शहरांतील वीरांनीं त्यांना खालीं लोटून देण्याचा उपक्रम आरंभिला ( २४८ ). या झटापटींत अनेक खानांना दुखापती झाल्या. त्यांनीं रणधूळीखानाकडे तक्रार केली. आगीप्रमाणें लाल झालेले डोळे फाडीत खान ओरडून म्हणाला " आतां कसला विचार करतां ! आवळून टाका आतां या शहराला. "

शिड्या बांधून चढून येणारांची गर्दी पाहून कंठीरव सेनाधिपतीला जवळ बोलावून म्हणाला " अहो सेनापति, हें पहा, आमच्याशीं एकनिष्ठ असलेल्या सर्व मानकऱ्यांना उशीर न लावतां बोलावून घ्या. त्यांनीं तुरुकांच्या वाटा बंद करून त्यांचीं नाकें कापून काढावीं. असें केल्यानें त्यांच्या छावणीवर भीतीचा पगडा बसून हाहाकार उडून जाईल. मग आमच्याशीं लगट करून येणाऱ्या या चढेल तुरुकांना खूप हाणून पाडूं. "

" स्वामींची आज्ञा " असें ह्मणून नंजराजानें गडावरील आपल्या सर्व मानकऱ्यांना तांतडीनें बोलावून घेतलें; व आपलें ठाणें सोडून आसपासच्या खेडोपाडीं शिरून लूटमार करणाऱ्या तुरुकांच्या तुकड्यांचा एकदम पिच्छा पुरवा; व जेथें तेथें त्यांचीं नाकें कापून त्यांना सळो कीं पळो करून सोडा असा आदेश सोडला ( २४९ ).

मग काय विचारतां ! गडकऱ्यांनीं आपआपल्या सैनिकांची गट्टी करून एकच धुमाकूळ माजवून दिला. त्यापैकीं कांहींनीं अरकेरमध्यें तळ दिलेल्या तुरु-

कांची रात्रीच्या वेळीं लांडगेतोड करून दोन हजार नाकें कापून आणलीं. आणखी कांहींनीं होळलजवळ मुक्काम केलेल्या तुरुकांच्या फौजेवर तुटून पडून एक हजार नाकें कापून आणून स्वामीच्या चरणीं अर्पण केलीं. चेन्नपट्टणच्या वीरांनीं हालचाल करीत असलेल्या तुरुकांची पुढील वाट अडवून त्यांचा पाठलाग करून एक हजार नाकें कापून नेलीं. मद्दुरुवाल्यांनीं चारशें नाकें आणलीं. याद्‌-वादीजवळ आलेल्या शत्रूंचीं एकहजार नाकें नाहींशीं झालीं ( २५० ). नागमं-गलच्या योद्धयांनीं तीनहजार नाकें मिळविल्याचें यश संपादिलें. चनरायपट्टण-वाल्यांनीं दोन हजार नाकांची हजेरी दिली. किक्केरी व बूकनकेरेवाल्यांनीं एक हजार नाकांचे बळी घेतले. म्हैसूरच्या तलवारबहाद्दरांनीं चामुंडीच्या बेट्टाला ( डोंगराला ) आलेल्या तुरुकांचा समाचार घेऊन एकहजार नाकांची खंडणी हजर केली.

याप्रमाणें नासिकाविहीन झालेल्या बाराहजार शिपायांनीं विजया( जा ) पुराकडे पळ काढून पातशहाच्या चरणीं लोटांगण घालून रोदन केलें. हें दृश्य पाहून पातशहा आश्चर्यचकित झाला. त्यानें त्या सगळ्यांना जमिनी इनाम देऊन त्यांच्याकरितां शहरामध्यें एक स्वतंत्र ( नाककाप्यांची ) वस्तीच निर्माण करून दिली ( २५१). "नाक कापलें तें त्यांचें नव्हे तर माझेंच" असें म्हणून पातशहानें लगेच आपली राखीव फौज खानाकडे पाठवून दिली.

ह्यानंतर ठिकठिकाणाहून विजापुरास येणारे प्रवाशी नाककाप्यांची ती गल्ली पाहून बोलत, "काय हो या म्हैसूर राजाच्या शौर्याचें वर्णन करावें ? पूर्वींच्या युगामध्यें श्रीरामचंद्रानें एका राक्षस भगिनीचें नाक कान तेवढे कापले तर या युगामध्यें यानें या बारा हजार नरराक्षसांचीं नाकें कीं हो कापून टाकलीं ! याच्याशीं बरोबरी करणारा कोण आहे ?" अशाप्रकारें स्तुति करीत ते निघून जात असत.

इकडे कूर्म पातशहाच्या हेजीबांनीं सगळी हकीकत लिहून आपल्या धन्यास कळविली ( २५२ ). तो वृत्तांत ऐकून कूर्म पातशहा आश्चर्यानें स्तंभित झाला. व त्यानें आंतल्याआंत कंठीरवाच्या शौर्याची तारीफ केली.

आपल्या पराभवाची वार्ता कूर्माला पोंचली हें ऐकून पातशहा फार संतप्त झाला. व त्यानें 'पट्टणास वेढून घ्या; हा माझा आदेश खानाला सांगा' असें म्हणून दूत पाठवून दिले. पातशहा क्रुद्ध झाल्याची वार्ता दूतांनीं येऊन खानास कळविली.

हें ऐकतांक्षणीं खान सभागृहांतून एकदम उठून उभा राहिला. त्यानें रौद्रा-वेश धारण केला. त्याच्या ओठावरील मिशा नाचूं लागल्या. लाल झालेल्या त्याच्या नेत्रांतून अग्निकण उडूं लागले. त्यानें तलवार उपसून पुढें सरसावली.

हातघाईसाठीं तो उत्कंठित झाला ( २५३ ). इतक्यांत सूर्यास्त होऊन सर्वत्र अंधःकार पसरला. यानंतर पुढील मोठ्या चढाईच्या तयारीसाठीं वजीरखानांना आपल्याजवळ बोलावलें; व त्यांचीं त्यांचीं कामें नेमून दिलीं. मग ते सर्व फार आतुर झाले ( २५४ ).

## संधि चौदावा—श्रीरंगपट्टणावर चढाई ( पानें २५५ ते २७१ )

संग्रामाला सुरवात झाली, असें सुचविणारीं रणवाद्यें वाजूं लागलीं. तुतारींचा निनाद, धनुष्यांचा टणत्कर, वीरांच्या गर्जना, घोड्यांचा हुंकार यानीं आकाशमंडळ भरून गेलें. तोफांचे मोर्चे लावा, शिड्या चढवा ( २५५ ), हत्ती झुंजवून कोट खिळखिळा करून टाका, खोदा, ठोका, हाणा अशा प्रकारचे आवाज चोहोंकडे ऐकूं येऊं लागले. कोपानें लाल झालेले शशिकिरण जणूं शत्रूवर तुटून पडले आहेत असें भासणाऱ्या चंद्रज्योति शिबिरांमध्यें शोभूं लागल्या ( २५६ ). हत्तींना आठ, पायदळ सैनिकास दोन, घोडेस्वारास चार आणि बैलगाड्यास दहा अशा कोलती जिकडे तिकडे नाचूं लागल्या. आकाशाला भिडणाऱ्या शिड्यावर चढून खानाच्या शिपायांनीं बाणांचा व गोळ्यांचा वर्षाव केला ( २५७ ).

एका एका शिडीवर पांचपांचशें खान चढून गेले. वरून येणाऱ्या बाणांचा व गोळ्यांचा मारा यांची पर्वा न करितां प्रेतांना तुडवीत चढून जाऊन खानांनीं कोटाच्या पंजांना हात पोंचविले. ( २५८ ) अशारीतीनें क्रुद्ध झालेल्या मशकांनीं कुलगिरीवर तुटून पडावें त्याप्रमाणें, भूमंडलीं सुविख्यात जाहलेल्या पट्टणावर तुरुकांनीं चढाई केली. यकलासखान, मुस्तफखान यांनीं आपआपलें बळ एकत्र करून चातुर्यानें उठावणी करून वीरगर्जना ठोकण्यास सुरवात केली. किल्ल्याची एक भिंत चढून जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां त्यांना तेथें •आणखी दोन भिंतींचीं वलयें, खंदक, व चक्राकार सूत्रबद्ध यंत्रें आढळून आलीं.

तिकडे कारीतिखान, सहजी ( शाहाजी ), व अबदुलखान यांनीं मोठ्या सैन्यानिशीं आवेशपूर्वक हल्ला केला. दुसरीकडे अंकुशखान व अंबरखान हे पुढें सरसावले ( २५९ ). तिसरीकडे अहमखान, वेदोजी, मल्लिगेखान व सिद्दरहिम यांचा खटाटोप चालला. पूर्वेकडे, रणधूळीखानानें आपल्या सरंजामासह वणव्याप्रमाणें थैमान करीत चढाई केली. नंतर दक्षिणेकडे तळ दिलेल्या पूवल हनुमानें त्या खळाच्या आदेशाप्रमाणें त्या दिशेनें शह बसविण्याची तयारी केली. धनुष्यबाण, तलवार, भाले, बरच्या इत्यादि आयुधांनीं भयंकर दिसणारे असे सत्तर हजार वीर आपल्या नायकांसह चढून गेले. हरपनहळ्ळी, सुंडूर, गुडिगोटे, उज्जिनी (२६०), रायदुर्ग, येथील नायक व सैनिक हट्टीचा यल्लप्पनायक, कुंदुरूपींचे दळ, मत्तीघट्ट, चिक्कनायकहळ्ळी यांच्या आसपासचे लोक, पालुपरे, व बेलूरचे

शिपाई हे चढाई करण्यांत गुंतले होते. उत्तरेकडे ठाणें दिलेलें मोरसांचें सैन्य हनुमाच्या आदेशाप्रमाणें हजार शिड्या लावून आरोळ्या ठोकीत चढत होतें. होळवनहळ्ळी, बिज्जावर, कोळाल, बळ्ळापूर, मागडी येथील नायक आपल्या दळाबरोबर व चिक्कबळ्ळापुर, बावलुरु, होसकोटे, कंगोंदी व मास्ती येथील लढवय्ये आपल्या नायकाबरोबर गड चढत होते ( २६१ ). दक्षिणेच्या बाजूला हजार शिड्या अडकवून इक्केरीचें सैन्य वर वर जात होतें. केंगेंद्राच्या आदेशानुसार कर्नाटकच्या सेनेनें लगबगीनें किल्ल्याला आच्छादून टाकिलें. वरून होणाऱ्या आयुधांच्या टोकांच्या माऱ्याला न जुमानतां, शिरस्त्राण सांवरीत, शवांना तुडवीत शत्रूंचे वीर कंठीरवाच्या दुर्गावर चढून गेले ( २६२ ).

कंठीरवेन्द्रानें आपल्या गडावर चढून आलेल्या या शत्रूंना पाहिलें. आकाशांत झडप घालणाऱ्या सिंहाप्रमाणें गर्जना करीत तो नजेंद्राला म्हणाला, " आमच्या गडांच्या मानकऱ्यांना विलंब न करितां आज्ञा करा. आपल्यावर चढाई करून येत असलेल्या या शत्रुसेनेला यमपुराला पाठवून द्या. कदळीवनांत मत्त हत्तींचा कळप जसा त्याला उखडून टाकतो तसे तुम्ही या तुरुकांच्या झुंडीचा धुव्वा उडवा " ( २६३ ).

" प्रभूंची आज्ञा " असें म्हणून नजेंद्रानें तत्क्षणीं नायकांना चोहोंकडे रवाना केलें. चेन्नपट्टण, मद्दूरु, बेळ्ळूरु येथील नायक आपल्या पथकांसह जेव्हां चालून आले तेव्हां तुरुकांना दे माय धरणी ठाय झालें. नागमंगल, चेन्नरायपट्टण, होसहोळलु येथील खंद्या नायकांनीं आपल्या शौर्याची शर्थ केली, तिप्पूरु, कन्नंबाडी, मळलवाडी येथील नायकांनीं चढून येणाऱ्या खळांचा एकच खेळखंडोबा आरंभिला. मैसूरु, तेरकणांबी येथील रणशूर नायकांनीं धुमाकूळ माजवून सोडिला. हरदनहळ्ळी, सत्यागाल, मळवळ्ळी, तळकाड येथील नायकांनीं तुरुकांना खूप ठेंचून काढलें ( २६४ ).

कंठीरवेश्वर व मानकरी नायक यांनीं किल्ल्यांत चढलेल्या खानांना कापून काढून राहिलेल्यांना पळायास लावण्याचा एकच सपाटा आरंभिला. शिड्यांवर चढून येणाऱ्या झुंडींचीं मुंडकीं पटापट तुटूं लागलीं व त्यांचीं आंतडीं पिशाचांच्या गळ्यांतील माळा होऊन शोभूं लागलीं. कंठीरवाच्या सैनिकांनीं गर्जना करीत, उड्या मारून कोटांत उतरणाऱ्या खानांचीं मस्तकें धरून करकरा माना कापून खंदकांत फेंकून दिलीं ( २६५ ). कंठीरवानें पोसलेल्या एकांगवीर नायकांनीं ठिकठिकाणीं गडावर चढाई करणाऱ्या खानांना भोंसकून खालीं पाडलें. बंदुकवाल्या शिपायांच्या गोळ्यांनीं बारा हजार तुरुष्क

ठार झाले. एकाच वेळीं सुटून येणाऱ्या लक्ष बाणांनीं जेव्हां तुरुक शिपाई जमिनीवर लोटूं लागले तेव्हां त्यांची उडालेली दैना वर्णणें अशक्य. शिड्यांवर काठ्या रोखून त्यानां उडवून दिलें त्यामुळें किती तरी तुरुक प्राणांस मुकले ( २६६ ). गोफणींतून सुटणारे दगड व उचलून टाकलेले धोंडे यांच्या माऱ्यानें डोकीं फुटून, हातपाय मोडून खंदकांत पडून मेलेल्यांचा हिशोब नाहीं. बुरुजावर ठेवलेल्या तोफा पेटून उडालेल्या धडाक्याखालीं दहा हजार घोडे चेंगरून मेले ( २६७ ). मिठाच्या पोत्यांना बत्त्या लावून दिल्या तेव्हां तीनशें हत्ती कोसळले.

चढून येणाऱ्या शत्रुसैन्याचा मोड होऊं लागला. सैनिकांनीं पिछेहाट करून, दाही दिशांना पळ काढला. पळून जाणाऱ्या या कर्नाटकाच्या शत्रुसैन्याचा पाठलाग करून त्याला थोपविण्यांत आलें. " हाणा, मारा, ठोका, कापा, पाडा, लोटा, फेंका या अजागळ शत्रूंना " असें म्हणत कंठीरवाच्या अंगरक्षक भटांनीं गहजब उडवून दिला ( २६८ ). मी मी म्हणविणाऱ्या तुरुक वीरांची जेथें तारांबळ उडून गेली तेथें इतर दुबळ्या नायकांची कथा काय सांगावी ? ' मीच जातों हो ' ' मलाच पाठवा जी ' असें अहमहमिकेनें नायकांची मनधरणी करीत कंठीरवाच्या वीरांनीं वेढलेल्या वैऱ्यांचा क्षणांत धुव्वा उडवून दिला ( २६९ ). कर्णाटकाच्या शत्रूंचें सैन्य, प्रवाहाच्या तडाख्यानें कोसळणाऱ्या रेतीच्या ढिगाप्रमाणें कोलमडून पडलें. एक एक वीर शत्रूंला हजार होऊन भासूं लागला. खानांची सगळी गुर्मी जिरून गेली.मागें पाय काढून त्यांनीं आपलीं तोंडें लपविलीं.

वेढलेल्या छावणीची दाणादाण झाली. शिड्यांची अग्नीला आहुति देण्यांत आली. त्यानंतर बहिरक्षकांनीं किल्ल्याभोंवतालच्या सुरंगांचे खड्डे बुजवून टाकिले ( २७० ). सूर्यमंडलाला आच्छादलेल्या अंधकाराचा नाश करून शोभणाऱ्या किरणरूपी सेवकाप्रमाणें खळ्यांना पिटाळून लावलेले बाहेरचे रखवालदार चोहोंकडे शोभले. गुहेंतून उठलेल्या सिंहानें केलेली गर्जना ऐकून दूर पळून गेलेला गजयूथ पुन्हां जमून जसा तिकडे पहात राहतो, तसें तुरुकांचें लष्कर कांहीं अंतरावर दिसलें ( २७१ ).

संधि पंधरावा:--विषम युद्ध-( पानें २७२ ते २९३. )

अशा प्रकारें पराभूत होऊन दशदिशा पळून जाऊन फजीत पावलेले खान शहरापासून सहा मैलांवर ( अरेगावूड ) ठाणें देऊन राहिले. चोहोंकडे खचून पडलेल्या प्रेतांना उचलून टाकणेंहि त्यांना अशक्य झालें. पहांटेच्या प्रहर रात्रींच्या सुमारास हैराण होऊन एकत्र झालेला खळांचा तो सेनासमुद्र स्तब्धतेनें शोभूं लागला. यावेळीं नरसेंद्राच्या सेनापतीनें आपल्या चारांना बोलावून तुरुकांच्या छावणींत जाऊन त्यांची हालहवाल टेहळून कळवा अशी आज्ञा केली ( २७२ ).

आज्ञेप्रमाणें दूतांनीं जाऊन शत्रूंचा समाचार पाहून येऊन दळपतीला कळविला. त्यांनीं हात जोडून असें सांगितलें:—

" तुरुकांना हाणून पळवून लावण्याला आतांची ही फार उत्तम वेळ आहे. जिकडे तिकडे शत्रू घायाळ होऊन विवळत पडले आहेत. कांहीं सुरापानानें देह भान विसरून लोळत आहेत. कांहीं झोपेंत आहेत."

हें ऐकून किंचित् हास्य करीत, सेनापति नरसराजाकडे निघून गेला व त्यानें तलवारीवर अंजलिपुट ठेवून अशी विनंति केली. "प्रभुजी,माजलेल्या या खानाच्या फौजेची लांडगेतोड करून हाकलून देण्यास हीच योग्य वेळ आहे" ( २७३ ). यावर " बरें आहे " म्हणून आपली सर्व सेना जमविण्याला राजानें आज्ञा केली.

एका क्षणांत पुन्हां युद्धाची तयारी झाली. कंठीरव राजा स्वतः चिलखत चढवून, हत्यारबंद होत्साता पुढें चालला. जयघोष करीत राजतुरंगमावर आरूढ होऊन तलवार चमकावीत आघाडीवर निघाला. विजय भेरी वाजूं लागल्या. शुभशकून होऊं लागले ( २७४ ). सैन्याच्या दोन तुकड्या करून नंजराजेंद्र व लिंगेंद्र या दोन सेनानायकांच्या हाताखालीं देऊन आपल्या उजव्या व डाव्या बाजूला चालविल्या. " हें पहा, तुमचा चक्काचूर करण्यासाठीं येत आहों. हुषारींत असा " असें मानकरी नायकांनीं दूत पाठवून शत्रुपक्षाला कळविलें ( २७५ ).

रणधुमाळी माजली. एकच गोंधळ उडून गेला. सगळीकडे " हाणा, मारा, ठोका " याशिवाय दुसरी बात नाहीं. पराक्रमी रणधुल्लीखानानें कंठीरवाचें सैन्य चाल करून येत असलेलें पाहिलें. लगेच तो आपल्या वारूवर चढला. त्यानें मागें मागें पहात असलेल्या वजीरमुलुकांची चांगली कानउघाडणी केली. गर्जत सैन्यांत फिरून उत्साह आणला. " आमच्या लहान सैन्यानें मोठ्या सैन्याशीं लढून त्याचा मोड केला तर विजयलक्ष्मी आम्हाला प्रसन्न होईल " इ. बोलून त्यांना झुंजण्यास तयार केलें ( २७६ ).

मग रणधुल्लीखान व खान यांना रणावेश चढला. त्यांनीं कंठीरवाच्या सेनेशीं निकराचा सामना केला. खानाच्या छावणीच्या संरक्षणार्थ सिद्ध असलेल्या घोडेस्वारांनीं हल्ला करण्याकरितां पुढें सरसावणाऱ्या बाहूंनीं लगेच थोपवून धरलें. "तेव्हां शहराच्या चढाईत मार खाऊन माघारीं न जातां तुम्हीं आमच्याशीं पुन्हा तोंड घावयास धजतां काय ! डोकें उडालें तरी धड आपलें लढतच आहे अं ! " असे कंठीरवांचे लोक गरजून बोलले. "जखमा घेऊन दांत विचकत सलाम म्हणून तोंड वेंगाडणाऱ्या भ्याड शिपायांनों, तुम्हांला कशाला हा भाऊबंदांचा हट्टवाद !" असें म्हणत म्हैसूरच्या वीरवृंदानीं तुरुकांना गराडा घातला. ( २७७ ) ... ... चांदीच्या पट्ट्यांनीं मढविलेलें धनुष्य पेलणाऱ्या वीरांनीं बल-

वान अशा खान व खानांना तीरांनीं मारमारून जखमा करून त्यांची त्रेधा उडवून दिली (२७८). प्रळयकाळचा दावाग्नि चोहोंकडे पसरून जसा अरण्याला जाळूं लागतो, तसा त्या योद्ध्यांनीं वर्षाव केलेल्या बाणांचा अग्नि खव्यांच्या सैन्यांत प्रवेश करून त्यांचा नाश करूं लागला. पटाईत निशाणबाजांनीं सोडलेल्या बंदुकीच्या गोळ्यांनीं अत्यंत क्रुद्ध असलेल्या रुद्राच्या डोळ्यांतून बाहेर पडणाऱ्या आगीच्या ठिणग्यांचा समूहच जणूं काय अशा प्रकारें शत्रुसैन्यांत हाहाकार माजविला (२७९). सर्वत्र विनाशसत्र पेटलें. जिकडे तिकडे लोटांगण घालणारे, कण्हणारे, पळणारे, लोळणारे, बोटें चावणारे, विनवणी करणारे, काळीज व आंतडीं लोंबणारे खानच खान, रणांगणांत दिसूं लागले (२८०).

कंठीरवाच्या खाशा हत्तींनीं तर कहर उडवून दिला. रक्ताचे पाट वाहूं लागले. रामचंद्राच्या शरांनीं खर-दूषणांच्या झुंडींना ज्याप्रमाणें लोळविलें, त्याप्रमाणें कंठीरवाच्या वीरांच्या शौर्यापुढें तुरुकांची फौज नामशेष झाली (२८१). सर्वत्र पसरलेल्या विकराळ शवांनीं रणभूमि भेसूर भासूं लागली (२८२). कावळे, घुबड, कोल्हे आदि प्राणी त्यांना ओढून खाण्यासाठीं तेथें संचार करूं लागले (२८३). पिशाच, डाकिनी व शाकिनी रक्त-मांसांचें सेवन करून उन्मत्त होऊन नृत्य करूं लागल्या.

शत्रुपक्षाचा व आपला झालेला भयंकर संहार अवलोकून कर्नाटकाचे सैनिक मार्गे परतले. खानांचे मुलगे, जावई इत्यादि आप्तेष्ट धारातीर्थीं पतन पावले. बलवंत खानाचे पोटचे गोळे ठार झाले. मुस्तफखानाचे नातू मृत झाले. करियितिखान, जिलहरखान, शहजी, मल्लिगेखान, यांच्या जावयांचा रणांगणांत वध झाला (२८४). पातशहाच्या पंक्तींत जेवणारे पांच हजार खानप्रवर यमपुरांत निवासाला गेले. खानाच्या अंगरक्षकसेनेपैकीं दहा हजार लढाऊ मरण पावले. अंबरखानाच्या लष्करापैकीं नऊ हजार रणांत हत झाले असा हिशोब निघाला. करियितिखान, अहमखान व वेदोजी यांच्या ओळखीचे दहा हजार घोडेस्वार पडले. याप्रमाणें इतर खानांच्या हाताखालचे किती लोक मेले याचा नीट पत्ता लागला नाहीं. या कत्तलींत एकंदर पालखींत बसणारे तुरुकांचे पन्नास शूर नायक व पन्नास हजार लढवय्ये नाहींसे झाले (२८५).

हरपनहळ्ळी, सोंडूरु येथील नायकांचे दोन हजार शूर शिपाई प्राणास मुकले. कुंदुरुपे, रायदुर्ग, मत्तिवीड येथील किती सैनिक नष्ट झाले हें सांगतां येत नाहीं. हनुमाचे अंगरक्षक वीर, बेलूरच्या राजाचे खासे योद्धे, पालुपरेच्या राजाचे खंदे वीर यांचा चेंदामेंदा होऊन गेला. होळवनहळ्ळी, बिज्जावर, कोळाल, बळ्ळापुर येथील राजांचें अपरिमित सैन्य नाश पावलें. चिक्कबळ्ळापुर, बावलूरु-

होसकोटे, कंगोंदि, मास्ती येथील नायकांचें दळ लयास गेलें. सीरे, बेंगळूरु, इक्केरी येथील राजांचे सैनिक कंठीरवाच्या पराक्रमापुढें जर्जर होऊन मागें हटले ( २८६ ). अशा प्रकारें कर्नाटकाचें वीस हजार सैन्य मृत्युमुखीं गेलें.

मग जिकडे तिकडे पळपुट्यांची एकच दंगल माजून राहिली. कावरे बावरे होऊन शिपाई पळूं लागले. त्यांना कशाचेंही भान राहिलें नाहीं. शेंपटीला लगाम व तोंडावर खोगीर करून तुरुकांनीं पळ काढला ( २८७ ). कोणी वारुळावर चढले, कोणीं दांतीं तृण धरलें, कांहींनीं उघड्या अंगांनीं पाण्यांत उडी घेतली. कांहींनीं घोडे टाकले, तलवारी, भाले, फेंकून दिले, हात जोडले, कांहीं शरण आले, कांहींनीं याचना केली. " आमचे प्राण वांचवा " अशी दीनवाणीनें करुणा भाकली ( २८८ ). नरसिंहाच्या दिव्य नामाचें स्मरण केल्यानें ज्याप्रमाणें पापें धूम ठोकून पळून जातात, त्याप्रमाणें प्रभु कंठीरवेंद्राच्या शौर्यापुढें हार खाऊन खळांनीं पलायन केलें ( २८९ ).

या प्रकारानें चढाईंत खानांचा संहार झालेला पाहून स्तुतिपाठकांनीं कंठीरवाची एककंठानें स्तुति केली. " चंड विक्रम, त्रैलोक्यांतील वीरांचा अग्रेसर, जयलक्ष्मीचा पति, पुंडरीकाक्षसदृश, कंठीरवाचा जयजयकार असो " अशी भाटांनीं प्रशंसा केली. त्यावेळीं आनंदित झालेली विजयलक्ष्मी त्याच्या शौर्यामुळें प्रसन्न होऊन त्याच्या भुजांचे ठायीं वास करून शोभूं लागली ( २९० ).

नंतर कंठीरवाच्या नायकांनीं खानांचीं भूषणें, हत्ती, घोडे, आयुधें, तोफा, सांपडलेल्या चीजवस्तु आणून त्याच्या पायाशीं अर्पण केलें. मग कंठीरवानें युद्धांत शौर्य दाखवून यशस्वी झालेल्या वीर मानकरी नायकांना उत्तमोत्तम वस्तु वांटून दिल्या. हें संपल्यावर कंठीरव आपल्या नगराला परत आला. ( २९१ ) तेथें अंतःपुरांतल्या अंगनांनीं आरती ओवाळून त्याला शुभाशीर्वाद दिले.

इकडे रणधूळिखान रणांगणांत मेलेल्या आपल्या शिपायांना मूठमातीहि न देतां फार चिंताक्रान्त होऊन परतला. गाईचा वध करणारे असे ते पापी जीव त्या पुण्यभूमींत श्रीरंगपट्टणाच्या वीरांकडून पतन पावल्यामुळें स्वर्गलोकांत गेले; व तेथें त्यांनीं तो लोक भरून टाकला. निराश्रितपणें पडलेल्या असंख्य अशा तुरुकांच्या प्रेतांना कोल्हेकुत्र्यांनीं ओढून आणून नदीजवळ टाकून दिलें. व तीनशें हत्ती, दहा हजार घोडे व पन्नास हजार फौज हातची गमावून खिन्न झालेला खान माघारा निघाला. पालखींत बसणाऱ्या पन्नास खानवजीरांना रणवाले देऊन उद्विग्न झालेला खान परत चालला ( २९२ ). वाद्यांचा गजर व स्तुतिपाठकांचीं स्तोत्रें इत्यादि सर्व आवाज थांबवून मौनव्रताची दीक्षा घेऊन खान आपल्या पुराला परतला.

मेघ सरल्यावर सूर्य जसा पुन्हां तेजानें तळपूं लागतो, तसें वेढा निघाल्यावर श्रीरंगपट्टण पुन्हां शोभूं लागलें. नंतर कंठीरवानें पीडापरिहारार्थ संप्रदक्षिणा व शांति करविली; व ब्राह्मणभोजनें घालून व अनेक प्रकारचीं दानें देऊन विप्रांना सन्मानिलें ( २९३ ).

**संधि सोळावाः—रामगिरी नगर जिंकून घेतो ( पानें २९४–३१० )**

नंतर रणधूळीखान आपलें उरलेलें सैन्य घेऊन त्वरेनें विजयापुरास जाऊन पोंचला व त्यानें लगेंच पातशहाची भेट घेतली. पातशहानें त्याच्याकडे न पाहतां तोंड फिरवून गालावर हात ठेवून आपल्या आप्तमंत्र्याला बोलावून म्हटलें " कर्नाटकांत शिरून श्रीरंगपट्टण जिंकून घ्यावें म्हणून याची निवड करून मी याला पाठविलें. पण या खानानें आम्हांला अपकीर्ति आणली ( २९४ ). पन्नास हजार घोडेस्वार व चार लक्ष पायदळ यांना घेऊन हांसत हांसत ( श्रीरंगपट्टण ) जिंकून घे म्हणून सांगितलें असतां, यानें आमच्याच फौजेला मार खावविला कीं हो! आमच्या ओळखीचे ते खान कोठें गेले? आणि आमचे ते खासे हत्ती आणि ते घोडेस्वार हे सर्व काय झाले? आमच्या वैभवाला केवढा हा कलंक लागला बरें! पालखींत बसून येणारे ते वजीर आणि न चुकतां आनंदानें पंक्तींत भोजन करणारे ते मल्ल यांचें काय झालें ! जे येऊन सभेंत बसले असतां पाहणारांना शोभा वाटे अशा वजीरांना मृत्युमुखीं लोटून हा भ्याड येथें पळून आला आहे ! याचें काळें तोंड मी पहाणार नाहीं. ज्यांचीं नाकें कापलेलीं आहेत असे दहाहजार तुरुक जेव्हां माझ्याकडे आले तेव्हां मीं लाजेनें मान खालीं घातली. हा आमचा केवढा बरें अपमान! ज्यास्त बोलून काय उपयोग ! या खानानें केलेलीं मूर्खपणाचीं कृत्यें मला सहन करणें शक्य नाहीं. " असें बोलून पादशहा कोपांत बुडून गेला ( २९५ ).

तेव्हां खान मनामध्यें कांपत पादशहाच्या चरणीं विनम्र होऊन हात जोडून कंठीरवनरसराजाचा अतुल पराक्रम वर्णूं लागला. " हुजुरांनीं चित्त देऊन ऐकावें. कंठीरव या भूतलावरचा कोणी यःकश्चित् मनुष्य नव्हे. पर्वतावरच्या चामुंडीनेंच त्याच्या वीरांना अतुल-बलसंपन्न केलें आहे. त्याच्या योद्ध्यांचें शौर्य अवर्णनीय आहे. त्यांचा एकेक शिपाई लढतांना आम्हाला हजार शिपायांसारखा भासला ( २९६ ). आम्हीं काय साहस केलें, केवढा प्रताप गाजविला हें आपल्यापुढें सांगून उपयोग काय ! आम्ही अभागी हेंच खरें. आम्हीं दाखविलेले नानाप्रकारचे पराक्रम सर्वच कंठीरवाच्या त्या वीरांपुढें निष्फळ ठरले. अखेरची एक बात निवेदन करतों. कूर्माबरोबर (?) हुजूरांची स्वारी स्वतः त्याजवर निघाली तरी तो भ्यावयाचा नाहीं " ( २९७ ). हें ऐकून पातशहाचा राग ओसरला.

इकडे काय गोष्टी घडल्या तें सांगतों. पूवल हनुमाची खोडकी मोडावी म्हणून केरीच्या राजानें पैशाची लालूच दाखवून एकदम तुरुकांच्या लष्करास बोलावलें.

"जा, आतां तरी शौर्य गाजवून कर्नाटक सर कर" असें बोलून व सन्मान करून, पातशहानें रणधूळीखान यास सेनेसह पाठविलें. पातशहानें दिलेलें तें अफाट, सैन्य घेऊन खान लगेच निघाला. ह्यानें हेब्बेय होळे ( हेब्बे नदी ) ओलांडून पुढें चाल केली. आपल्यावर स्वारी करण्याकरितां खान येत असल्याचें केंगेंद्रानें पाहिलें. त्याला तोंड देण्यासाठीं त्यानें सैन्य जमविलें.

तो त्वरेनें पुढें, निघून बसवपट्टणाला आला व वेढा देऊन तें सर केलें ( २९८ ). मागाहून खान तेथें आला. त्यानें हल्ला चढविला तेव्हां किल्ल्यांतील लोक किल्ला सोडून निघून गेले. तेव्हां खान तेथून चाल करून रुद्रपट्टणाला ( रुद्र पोळल् ) आला. खानानें तें स्थळ सर केलें. तेथील राजाला कैदेंत टाकलें व त्या पुरामध्यें आपले लोक ठेवले. खान तेथून पुढें निघाला. केंग हनुमानें निकरानें त्याच्याशीं युद्ध केलें. पण खानानें त्याचा पराभव करून त्याला कैद केलें. खानानें पुढें चाल केली.

पुनश्च तुरुक आपल्यावर स्वारी करण्यासाठीं झपाट्यानें चालून येत आहेत हें वर्तमान ऐकतांच कंठीरव नरसेन्द्रानें आपल्या सेनापतीबरोबर सल्ला-मसलत केली.

" 'कर्नाटकाला पुन्हां येणार नाहीं' असें यानें आम्हांस वचन दिलें होतें. अशा रीतीनें वचनभंग करून विश्वासघात केलेल्या या तुरुकाचा सूड उगविला पाहिजे. रामगिरीचा दुर्ग फार नांवाजलेला आहे. तो आम्हीं सर करून घेऊं. म्हणजे आमची कीर्ति स्वर्गलोकापर्यंत जाऊन पोंचेल ( २९९ ). तुरुकांच्या हातीं गेलेला तो किल्ला हस्तगत झाला म्हणजे आमचे बरेचसे श्रम वांचतील. म्हणून त्वरेनें वेढा देऊन तो जिंकून घ्या" अशी कंठीरवानें सेनापतीला आज्ञा करून पाठवून दिलें.

रामगिरीला वेढा पडला. चोहोंकडे नायकांनीं आपआपल्या सैन्यानिशीं गराडा घालून मोर्चेबंदी केली. किल्ल्यांतील एक हजार खान आपल्या शूर शिपायांबरोबर जय्यत तयारीनें किल्ल्याचें रक्षण करूं लागले. बाहेरच्या छावण्यांतून तोफांचे व बंदुकांचे गोळे सुटून आंतील लोकांचे प्राण पटापट उडूं लागले ( ३०० ). तेव्हां तुरुक वीर किल्ल्याच्या बुरुजावर येऊन उलट गोळ्यांचा मारा करूं लागले.

इकडे यावेळीं खान बेंगलूरला होता. त्यानें हें वेढ्याचें वर्तमान ऐकलें. तेव्हां तो क्रोधानें तत्क्षणीं मोठें सैन्य घेऊन वेढा उठविण्याकरितां निघाला. त्यानें रामगिरीच्या उत्तरेस येऊन किल्ल्यांतील लोकांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आपल्या फौजेची छावणी दिली; व अनेक सांकेतिक खुणा करून त्यांना कळविलें.

दळवायि नंजेंद्रानें लगेच आपल्या सेनेचे चार भाग करून त्वरेनें तुरुक फौजेस गराडा घातला. त्यानें कापाकापी करून हजार वीरांचे बळी घेतले ( ३०१ ). " शरण येतील त्यांचें रक्षण करीन. भिऊं नका " असें सांगून त्यानें धर्माचा डंका वाजविला.

एका रात्रीं नंजेंद्रानें मोठ्या जोराची चढाई करून रामगिरीचा किल्ला सर करून घेतला. तेव्हां त्यानें एकाच वेळीं एक हजार तुरुक घोडेस्वार कैद केले. त्यानें पांचशें घोडे पकडविले व शत्रूंचीं शस्त्रें हिसकून घेतलीं. युद्धांत जिंकलेलें सर्वहि त्यानें नरस राजेन्द्राला भेट म्हणून अर्पण केलें. तेव्हां तो राजा आनंदित होऊन त्याचा सन्मान करता झाला. ही बातमी दूतांनीं खानास पोंचविली. तेव्हां " वाहवा " म्हणून त्यानें म्हैसूरच्या राजाची तारीफ केली. " असंख्य लष्करासह आम्ही येथें असे जवळ असतांना, त्यानें एका क्षणांत तो किल्ला जिंकून घेतला. धन्य आहे त्या वीराची " असे त्यानें उद्गार काढले ( ३०२ ).

त्यानंतर भयभीत झालेल्या खानानें मागें पाय काढला. त्यानें मुक्काम करून बेलूरला वेढा दिला व तो जिंकून घेतला. त्यानें चिकनायकन् हळ्ळीवर हल्ला करून तो गांव स्वाधीन करून घेतला.

इतक्यांत चेन्नपट्टण पहावयाकरिता म्हणून कंठीरव नरसराज आपल्या सेनेसह वेगानें तेथें आला. त्यावेळीं खानाचा दळपति अबदुल यानें हुलियुरूजवळ आपल्या फौजेचा तळ दिला होता. नरस राजानें विलंब न करतां त्याजवर हल्ला चढविला. अबदुल्लखानाच्या सर्व लष्कराचा मोड करून, त्याला ठोकून काढून पळावयास लावलें; व त्याचे घोडे पकडून कीर्ति मिळविली ( ३०३ ). अबदुल्लखान दिग्भ्रांत झाला. कोणीकडे पळावें हें त्याला सुचेना. त्यानें आपल्या फौजेची छावणी उठवून पलायन केलें.

येणेंप्रमाणें संपादिलेल्या जयवधूबरोबर श्रीरंगपट्टणास येऊन कंठीरव आनंदानें राहूं लागला. एकदां त्यानें नंजेंद्राला बोलावून म्हटलें, " असमान साहसीखान अजून सरहद्दीवर आहे. इतक्यांत आम्ही वेढा देऊन बागूर जिंकून घेतलें तर आमचा लौकिक गाजेल व खानाच्या छातींत धडकी भरेल." आपल्या प्रभूचें हें बोलणें ऐकून त्याच्या चरणीं मस्तक नम्र करून नंजेंद्र निघाला. त्यानें घोडे, शिपाई इत्यादि सैन्य जमवून त्या पुराला वेढा दिला ( ३०४ ). कुंपण, मोर्चे, सुरंग यांची रचना करून त्या पुराला जखडून टाकलें. तेव्हां आंतील लोक भीतीनें घाबरून गेले.

इकडे दूतांनीं हें वर्तमान येऊन खानास ऐकविलें व बागूरला वेढलेल्या शत्रूला कापून काढा म्हणून विनविलें. यावर खान असें बोलला " याउपर

मैसूरच्या राजांबरोबर लढाई म्हणून आम्ही करणार नाहीं. एकदां पाठ दाखव-पळून येऊन, आतां तलवार धरून परत कसें जावें ! रणधूळीखान म्हटल्याबरोबर जेथें स्त्रियांचे गर्भपात होत असत त्या आम्हाला कंठीरवानें तृणवत् तुच्छ करून टाकलें आहे." असें म्हणून खानानें वेदोजीला बोलावून त्याचा सन्मान करून "पुढील राजकार्य तुमच्यावर सोंपविलें आहे. तुमच्या मनास येईल तसें करा" असें सांगून पाठविलें.

"लांडगेतोड करून बागूर जिंकून घेतों व आंत प्रवेश करतों" असें म्हणत वेदोजी त्वरेनें मोठें सैन्य घेऊन आला. पण पराभूत होऊन तोंड वेंगाडून त्याला परत फिरावें लागलें.

पुढें दळवायी नंजेंद्रानें एका क्षणांत त्या पुराला सर केलें व तेथें आपलें ठाणें स्थापून तो परत आपल्या राजाकडे आला. कंठीरवानें मोठ्या हर्षानें त्याचें स्वागत केलें. व "आतां तुरुगेरे जिंकून घ्या" अशी आज्ञा केली. "आपल्या पुण्यप्रभावाच्या बळानें सुप्रसिद्ध असा तो किल्ला माझ्या कसा स्वाधीन होतो हें आपण पहावें" असें बोलून दळवायी नंजेंद्र लगेच तेथून निघाला व त्यानें तुरुगेरेस वेढा दिला (३०६). बाणांचा व बंदुकाच्या गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. त्यांनीं किल्ल्यांतील लोक दग्ध होऊं लागले. वेढा उठवून लावूं म्हणत खानांच्या तुकड्या येऊं लागल्या. त्यांनीं नोणबन केरे (तळें)च्या जवळ छावणी दिली. तुरुकांचे घोडेस्वार हल्ला करण्यासाठीं आले आहेत, असें सेनापतीनें ऐकलें, तेव्हां त्यानें त्यांच्यावर चढाई करून त्यांना कापून काढण्यास सुरवात केली (३०७). पांचशें घोडस्वारांना ठार करून तीनशें घोडे पकडले. मग तो परत आपल्या छावणीस आला.

इकडे शहर स्वाधीन न करतां खानानें किल्ला तसाच लढवीत ठेविला. तेव्हां सेनापतीनें क्रुद्ध होऊन आपला भाऊ लिंगेन्द्र यास आज्ञा केली "उशीर न करतां नायकांना शिड्या उभारण्यास सांगा; व किल्ल्यावर चढून जा" (३०८) लिंगेंद्रानें तसें केलें. नायकांनीं चोहोंकडून गराडा घालून त्या पुरावर चढाई केली. हां हां म्हणतां पुर हस्तगत झालें. लिंगेंद्रानें गांवांतील खानांना कैद केलें. घोडे व हत्ती यांना खेचून आणून आपल्या भावाच्या चरणीं अर्पण केलें. आपल्या भावाचें हें शौर्य पाहून नंजेंद्र फार हर्षित झाला. त्यानें त्या पुरामध्यें ठाणें स्थापिलें व घोडे व हत्ती यांचा नजराणा कंठीरवाला अर्पण केला, तेव्हां कंठीरवास फार आनंद झाला व त्यानें त्या दोघांही बंधूंस सन्मानिलें (३०९).

"श्रीरंगपट्टण खळांच्या स्वाधीन होऊन कर्नाटकाचा सत्यानाश होऊन आमची राज्यलक्ष्मी भ्रष्ट होण्याची वेळ आली होती, पण या नृपवरानें तें संकट

ह्मणून पाडलें" म्हणून राजे लोकांनीं कंठीरवाची प्रशंसा केली. "यानें श्रीरंगपुर तुरुकांच्या हातीं जाऊं दिलें नाहीं, यानें आमचें रक्षण केलें" असें म्हणून तीन घराण्यांच्या राजांनीं कंठीरवाची स्तुति केली. "यानें पुण्यक्षेत्रांनीं भरलेलें राज्य पापी लोकांच्या हातीं जाऊं दिलें नाहीं. या भूपतीनें देव-ब्राह्मणांचें फार रक्षण केलें" असें लोकांनीं त्याचें गुणगान केलें (३१०).

**संधि सतरावा:-सांबळीचें ग्रहण** (पानें ३११ ते ३२५)

सांबळीच्या मुदालियाराचा ज्येष्ठ पुत्र पट्टद्य्य याला आपल्या बळाचा गर्व होऊन त्यानें म्हैसूरकराशीं सरहद्दीबाबत तंटा उपस्थित केला. त्याला मदुरेच्या नायकाचें पाठबळ व सहाय होतें. कंठीरवानें या दोघांचा पराभव करून त्यांची चांगलीच खोडकी मोडली. हा वृत्तांत या संधीमध्यें विस्तारानें वर्णिला आहे.

**संधि अठरावा:-पिरियपट्टणावर चढाई**(पानें ३२६-३५७).

याप्रमाणें गर्विष्ठ व आग्रही राजांचा मद उतरवून कंठीरव नरसराजा राज्य करीत होता.

इतक्यांत नरसिंहपुराचा राजा खंडणी देईनासा झाला. त्यानें तुरुकांशीं संधान बांधून आपला हेका चालविला. आपली मर्यादा सोडून खंडणी मागण्यास आलेल्या दूतांवर क्रुद्ध होऊन अपशब्द बोलून त्यांना परत पाठविलें. हें वर्तमान दूतांनीं येऊन कंठीरव राजाला सांगितलें (३२६).

तें ऐकून कंठीरवानें दळवायी नंजराजाला बोलावून नरसिंहपुराच्या राजाच्या विरोधाचें वर्तमान सांगितलें. "गरीबाचा राग त्याच्या दाढेच्याच मुळावर म्हणतात त्याप्रमाणें या नरसिंहपुराच्या नायकाची गत आहे. तो खंडणी देऊं इच्छीत नाहीं म्हणे! बरें आहे. त्याचें राज्य काढून घेऊन त्याला दूर लावून या. पूर्वीपासून आमचा विश्वस्त नायक म्हणून आम्ही दम धरला. आमच्याशीं अशी हरामखोरी काय! नरसिंहपुर हस्तगत करा, जा."

"प्रभूंची आज्ञा" असें म्हणून नंजेंद्रानें, नायकांचें मोठें सैन्य घेऊन, त्या पुरास वेढा घातला. तो राजा वेढा दिलेल्या सैन्याला चोहोंकडून उपद्रव देत बेपर्वाईनें शौर्योन्मत्त होऊन वागूं लागला (३२७). नंजराजाच्या लोकांनीं चोहोंकडे सुरंग पेरून दारूगोळ्यांच्या साह्यानें तो किल्ला उडवून देण्याची तयारी केली. इतक्यांत एके दिवशीं कांहीं तुरुक सरदारांनीं बारा हजार सैन्यानिशीं येऊन त्या पुरांत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. पण नंजराजेन्द्रानें त्यांना भोसकून पिटाळून लाविलें. कंठीरवाच्या सेनेच्या शौर्यापुढें नरसिंहपुरवाल्यांचा टिकाव लागेना. खंडणी देऊन ते कंठीरवेंद्राला शरण आले (३२८). येणेंप्रमाणें हां हां म्हणतां नंजेंद्रानें नरसिंह-

पुराचा प्रांत हिसकून घेतला व कंठीरवाला खंडणी अर्पण केली. कंठीरवाला फार आनंद झाला.

पिरियपट्टणावर नंजुंड नांवाचा दुष्ट व शहाजोग राजा राज्य करीत होता. तो फार गर्विष्ठ होऊन इक्केरीकरांशीं मैत्री जोडून वितुष्ट करूं लागला. त्यानें खंडणी देणें बंद केलें. भेटीस येण्याचें नाकारलें. शेफारून हेकेखोरपणानें वागूं लागला. हें पाहून कंठीरवानें नंजराजाला तांतडीनें बोलावून घेऊन म्हटलें ( ३२९ ). " ठिक-ठिकाणचे नायक व राजे आम्हाला वश होऊन आमच्या सांगण्याप्रमाणें वागत आहेत. तर याचे हे खेळ चांगले नाहींत. तुरुक, आंध्र, बेड, मळ्याळ हे सर्व आम्हांला नमून आहेत. तीन घराण्याचे नायक आम्हांला भिऊन हत्ती, घोडे इत्यादिकांचा नजराणा पाठवून देत आहेत. याचीच काय एवढी शेखी ? अहो सेनापति, उशीर न करतां नायकांचें व मांडलिकांचें मोठें सैन्य जमवून पिरियपट्टण व पालुपरे घेऊन त्याला डोंगरी मुलखाची वाट दाखवा ( ३३० ). इक्केरीच्या, तुरुकांच्या स्नेहामुळें चढून जाऊन धुंदींत असणाऱ्या त्याचा ताठा उतरवा. त्याचें राज्य हिसकून तेथें आमच्या सैन्याचें ठाणें बसवा. "

ही आज्ञा ऐकून, " प्रभूची इच्छा " असें बोलून सेनापति नंजराज तेथून निघाला. त्यानें शुभ दिवशीं सैन्यासह प्रयाण केलें. हरीची कृपा ज्यानें संपादन केली आहे त्यानें मनांत आणलेलीं सर्व कार्यें त्वरित हस्तगत होतात. ज्याच्या खड्गाच्या धारेंत देवी चंडिकेचें अधिष्ठान आहे त्याच्या प्रतापापुढें इतरांची काय कथा ! पर्वतावरची चामुंडी ज्या नृपालाचे इष्टार्थ पूर्ण करण्यास अत्यंत वात्सल्यानें वाट पहात आहे त्याच्या शौर्याची बरोबरी कोणी करूं शकेल काय !

आतां, पालुपरेचा तो दुर्ग दृष्टीसहि दुर्गम होता. तो डोंगराळ प्रदेशांत असून त्याच्या भोंवतीं दाट रान माजलेलें होतें ( ३३१ ). बाभूळ आदि नानाप्रकारचीं काटेरीं झाडें व वेली यांच्या गगनचुंबी अशा भक्कम कुंपणानें त्याला वेष्टलेलें होतें. वेळू आदि वृक्षसमूह स्वैरपणें वाढून विस्तार पावून, जाण्याचे मार्ग विघ्नमय झाले होते. कोणत्याही दिशेला हेरून पहा. भीषण भयानकता भेडसावीत माणसांच्या हृदयांत धडकी भरत असे. विंचू, साप, सरडे इत्यादि विषारी प्राणी इतस्ततः संचार करीत होते ( ३३२ ). वाघ, लांडगे, काळवीट, रानमांजर, मुंगूस इत्यादि श्वापदांनीं तो वनप्रदेश भरून गेला होता. रानहत्ती, कोल्हे, घुबड यांनीं तो प्रदेश आपलें विहारस्थळ बनविलें होतें. जिकडे तिकडे दऱ्या, खोरीं, गुहा, गह्वर हीं पसरलेलीं दिसत होतीं ( ३३३ ). अशा प्रकारें दुर्जय झालेला तो दुर्ग नंजराजानें जिंकून घेतला. कंठीरवाच्या चतुरंगबलानें त्याला वेढा दिला व पराक्रम

गाजवून सर करून घेतला. तेथें आपलें ठाणें बसवून, सैन्यानें पिरियपट्टणाकडे कूच केलें ( ३३४ ).

तेथें पराक्रमी असे राजकुमार होते. शूर नायक व मानकरी होते. पण त्यांची क्षिति न बाळगतां नंजराजानें वेढा दिला. किल्ला फार उंच व भक्कम असून पाहणाऱ्याच्या हृदयांत धडकी भरत असे. या किल्ल्याला वेढा देऊन पूर्वी कोणीही हस्तगत केला नव्हता ( ३३५ ). किल्ल्यांत नाना प्रकारचीं आयुधें व दारूगोळा यांचा भरपूर सांठा होता. शूर लढवय्यांचीहि कमतरता नव्हती ( ३३६ ). थोड्याच वेळांत ईशान्येच्या दिशेला म्हैसूरच्या सेनापतीचा मोर्चा लागला. उत्तर दिशेला लिंग राजेन्द्रानें मोर्चेबंदी उभारली ( ३३७ ). या दोन्ही पक्षांमध्यें तुंबळ युद्ध माजलें ( ३३८ ). किल्ल्यांतील लोकांनीं दिलेल्या उपद्रवांस न डगमगतां बाहेरील छावणींतल्या सैनिकांनीं नेटानें लढा चालविला.

इतक्यांत वेढा उठवून देऊं असें म्हणत तुरुक वीरांनीं इक्केरीच्या सैन्यासह उन्मत्तपणानें तेथें आगमन केलें. मोठें घोडदळ घेऊन वेदोजी आला. त्याच्या मागोमाग हजार घोडेस्वारानिशीं अंबरखान आला. याचप्रमाणें गालीहि आपल्या एक हजार घोड्यांसह तेथें आला ( ३३९ ). आपल्या अश्वदळासह मुलुक रहिमही आला. अंकुशखान आपले हजार घोडेस्वार पुढें दामटीत आला. असंख्य अशा या घोडेस्वारांच्या सैन्यानें व हत्तींनीं तो प्रदेश भरून गेला ( ३४० ). त्यांच्या सैन्यांत आठ हजार घोडेस्वार व पंधरा हजार पायदळ होते.

थोड्याच वेळांत मैसूरच्या व या सैन्यामध्यें धुमश्चक्री सुरू झाली. ते वीर एकमेकांवर आवेशानें तुटून पडले. कापाकापीस रंग चढला. " अरे भांचोद्दु गंडिपकु कुच् नाहि देतु, सिर मारु मारु मारु ! " ( ३४१ ). " दिल्करन साहेबु अब् तुमे जानपर [ खिल्की ] आसबी चोड्के उल्क तलवारिमे मरगये तो हमे हल्क होयेंगे राजाकु " अशा प्रकारचे तुरुक बोलींत उच्चारलेले आवाज ऐकूं येऊं लागले.

रिपुराय-निकर-शरभ-भेरुंड-कंठीरवेशाच्या चंडविक्रम दळपतीनें शत्रूंनीं केलेला हल्ला अवलोकन केला. त्यानें निशाण मारण्यांत पटाईत अशा निधड्या नायकांना निवडून काढले. आपल्या सैन्याच्या सहा सात तुकड्या काढून त्यांना शत्रूंवर चढाई करण्यास आज्ञा केली. घोड्यास घोडा, पदातीस पदाति, हत्तीस हत्ती अशी झोंबाझोंबी सुरू झाली ( ३४२ ). भीषण रणकंदन माजलें. शत्रूंचा वाढता जोर पाहून कंठीरवाच्या कसलेल्या योद्धांनींहि शिकस्त केली. थोड्याच वेळांत त्यांनीं शत्रूवर निकराचा हल्ला चढवून त्यांना पळवाट दाखविली ( ३४३ ). दोन कोसपर्यंत या पळपुट्या सैन्याचा पाठलाग करून सेनापति नंजराज आपल्या छावणीकडे परतला. त्यानें दोन हजार शत्रुपक्षाच्या लोकांना कैद करून आणलें.

इकेरीच्या सैन्याची वाताहत झाली. त्याचा सगळा गर्व गळून गेला. समरांगणाला असंख्य शिरांची आहुति देऊन, पुन्हां या दिशेला फिरकणार नाहीं असें म्हणत ते निघून गेले ( ३४४ ). सहजी (शहाजी) अंकुशखान, अंबरखान, मुलुक रहिम, वेदोजी सुत यांनींहि रणांगणाला रामराम ठोकून आपआपल्या परिवारासह पोबारा केला ( ३४५ ).

इकडे किल्ल्यांतील हालहवाल काय होती हें पाहूं. तेथील राजा नंजुंडानें आतां आपली धडगत नाहीं, किल्ला निश्चयानें शत्रूच्या स्वाधीन होणार असें पाहिलें. तो फार काळजींत पडला. तेव्हां त्याची राज्ञी आपल्या सेविकांसह त्याच्याकडे आली ( ३४६ ). तिनें कंठीरवाच्या अचाट पराक्रमांची, त्याच्यापुढें हार खाऊन शरणागत झालेल्या राजांची व नायकांची त्याला आठवण करून दिली ( ३४७ ). कर्नाटकाचें वाटोळें करावें या उद्देशानें चालून आलेल्या तुरुकांची काय अवस्था झाली हें सांगितलें. तुरुकांचे रामगिरि, बागुरु, तुरुगेरे हे दुर्ग त्यानें लढून कसे सर केले हें सुचविलें ( ३४८ ). कंठीरवाला नमून ज्यांनीं आपलें अस्तित्व टिकविलें अशा नरसिंहपुराचा राजा इत्यादिकांचीं उदाहरणें निवेदन केलीं (३४९). शेवटीं अशा या लोकोत्तर वीरापुढें वांकून त्याला शरण गेल्यास तो आमचें रक्षण करील असा आपला आशय प्रकट केला. नंजुंड राजानें आपल्या राणीचा हितोपदेश मानला नाहीं. त्यानें क्रूर भाषण करून तिला तेथून घालवून दिलें. त्यानें चिंतातुर हृदयानें किल्ला तसाच लढवीत ठेविला ( ३५० ).

दलपति नंजराजानें आंतील लोकांचा हा दुराग्रह जाणला. " या लोकांकरितां इतका विचार कशाला करा ? हां हां म्हणतां हल्ला चढवून किल्ला मुठींत आणतों " असें बोलून त्यानें आपल्या सर्व नायकांना व सरदारांना एकत्र केलें व दिवसा चढाई करण्याची आज्ञा कळविली. गिरिशिखरांवर विजा कडाडून पडाव्या त्याप्रमाणें सैनिकांनीं चोहोंकडून किल्ल्यावर मारा सुरू केला. कोटाच्या भिंतीवर शिड्या लोंबूं लागल्या. बंदुकीचे बार व वीरांच्या गर्जना यांनीं किल्ल्यांतील लोकांचीं धाबीं दणाणलीं ( ३५१ ). सुरुंग उडून बुरूज पडूं लागले. आगीचे लोळ आंत पसरले. कंठीरवाचे वीर आंत घुसले ( ३५२ ). नंजुंडराजाच्या कुमारानें त्यांना थोपविण्याकरितां शौर्याची पराकाष्ठा करून रणक्षेत्रीं शयन केलें ( ३५३ ). किल्ला कंठीरवाच्या हातीं आला. "याप्रमाणें दिवसा हल्ला चढवून किल्ला जिंकून घेणारा कोण आहे !" असें म्हणत लोकांनीं प्रशंसा केली. दळवायी नंजराजेंद्रानें नंजुंड राजा व त्याचे मुलगे यांना कैद केलें. कंठीरवाच्या पराक्रमावर लुब्ध होऊन पुरलक्ष्मी त्याला वश झाली ( ३५४ ).

पुढें नंजराजानें राजवाड्यावर पहारा ठेवून झालेला सर्व वृत्तांत पत्रद्वारें कंठीरवास कळविला. कंठीरवानें मोठ्या समारंभानें तेथें आगमन केलें ( ३५५ ).

नंद्राजानें सामोरें जाऊन त्याची भेट घेतली व त्याला नजराणा अर्पण केला. किल्ल्याच्या रक्षणाकरितां अधिकारी नेमून व शूर वीरांचा उचित मानसन्मान करून त्यानें पुन्हां श्रीरंगपट्टणास प्रयाण केलें ( ३५६ ).

## संधि एकोणिसावा-नंजराजय्याचा संग्राम ( पानें. ३५८-३७४ )

कंठीरव नरसराजानें पिरियपट्टणावर दिवसाढवळ्या चढाई करून खेचून घेतल्याची बातमी विजापुराच्या पातशहानें ऐकली. तेव्हां त्यानें विस्मित होऊन वजीर खानांसमोर कंठीरवाच्या शौर्याची तारीफ केली ( ३५८ ). " पराक्रमांत याची बरोबरी करणारें कोणी दिसत नाहीं. त्याच्या वीर नायकांनीं आम्हांला सळो कीं पळो करून सोडलें आहे. श्रीरंगपट्टणाला वेढा दिलेल्या रणधूळीखानाला यानें खडे चारले. आमच्या ताब्यांतले रामगिरि, तुरुगेरे, बागूर, हे किल्ले यानेंच जिंकून घेतले. दिवसां ढवळ्या हल्ला चढवून याप्रमाणें किल्ला सर करणारा कोण आहे ? यानें प्रचंड अशा चंगल्व राजाचें नगर हिसकून घेतलें. आमच्या सरदारांपैकीं कोणीं पुढें येऊन कंठीरवाचा प्रदेश हस्तगत करून विजयी होऊन येईल तर मी त्याला सप्तांगाचा स्वामी करीन " ( ३५९ ).

पातशहाचें हें भाषण ऐकून मुस्तफखान उठून उभा राहिला; व सलाम करून आपल्या शौर्याचें प्रदर्शन करीत म्हणाला. " हुजूरांच्या हृदयाला लागलेली काळजी आमच्या हातून दूर झाली नाहीं तर आम्ही असूनहि काय प्रयोजन ! आमच्यापाशीं कशाची कमतरता आहे ! वाटेल तेवढी फौज आहे. पैशाचें पाठबळ तर आहेच. एकापेक्षां एक वरचढ, युद्धांत कसलेले खानमल्लूक आहेत. आमच्याशीं सामना करणारा शत्रु या लोकांमध्यें नाहीं. अधिक बोलून काय उपयोग ! हुजूरांनीं विडा देऊन मला पाठवावें. कर्णाटक पादाक्रांत करून तुमच्या स्वाधीन केलें नाहीं तर हुजूरांनीं या सेवकाला आपल्या दरबारांत स्थान देऊं नये. "

मुस्तफखानाचें निवेदन ऐकून पातशहाला फार आनंद झाला. त्यानें त्याला विडा व अहेर देऊन " शपथपूर्वक कर्णाटक जिंकून आण " असें सांगितलें. " जी हुजूर " असें बोलून खानानें पातशहाचा निरोप घेतला. संगरोत्सुक होऊन प्रस्थानभेरी वाजविण्याची त्यानें आज्ञा केली ( ३६० ).

नंतर मुस्तफखान ईर्ष्येनें आज्ञांकित अशा खानांसह मोठी फौज घेऊन त्वरेनें चाल करून कर्नाटकाच्या प्रदेशांत शिरला. सरहद्दीवरील किल्ल्याच्या ठाणेदारांना सैन्यासह बोलावून घेतलें. तुरुगेरेपासून दोन कोसांवर तळ्याच्या कांठीं तळ दिला. त्याच्या छावणीचा डामडौल फार चित्ताकर्षक होता ( ३६१ ).

मुस्तफखानाचें सैन्य येऊन उतरल्याचें वर्तमान गडकऱ्यांनीं, लगेच हेर पाठवून, नंजेंद्रास कळविलें. आपआपले गड व किल्ले यांचें मोठ्या खबरदारीनें रक्षण

करा अशी आज्ञा देऊन दळपतीनें लगेच त्यांना परत पाठविलें. नंतर सेनापतीनें कंठीरवाची भेट घेतली ( ३६२ ). प्रणाम करून मुस्तफखानाचें सैन्य येऊन तळ दिल्याचें वर्तमान सांगितलें. आणि म्हटलें " मुस्तफखानाच्या सेनेचे तुकडे करून रणबलि देण्यास प्रभूंची आज्ञा व्हावी. " नंजराजाचें हें बोलणें ऐकून कंठीरव म्हणाला " या भ्याड गुलामांचा समाचार घ्यावयास तूंच कशास पाहिजे ? तुझ्या लोकांना पाठवून तुरुकांचा सप्पा उडवून टाक " ( ३६३ ). यावर " आपल्या कृपेनें माझ्या नायकांच्या करवीं मी या राक्षसांचा संहार करावयास समर्थ होईन " असें नंजराज बोलला. तेव्हां कंठीरवानें पुन्हां नंजराजाला " युद्धकार्यीं फार सावधानतेनें वागून खान मुलुकांना ठेचून काढा " असें सांगून पाठवून दिलें ( ३६४ ).

तेथून निघून सेनापति नंजराज आपल्या सैन्याच्या ठाण्याकडे आला. सर्व प्रकारें सिद्ध झालेली सेना घेऊन दळपतीनें तुरुगेरेच्या ज़वळ तळ दिला ( ३६५ ). ही बातमी ऐकून सचिंत होऊन मुस्तफखान आपल्या लोकांना म्हणाला " आमची फौज चालून जाण्याचा पुढील मार्ग बंद करून म्हैसूरचा सेनापति आपल्या सैन्यासह येऊन ठेपला आहे. शत्रूवर तुटून पडून त्यांची लांडगेतोड करण्यांत हे म्हैसूरवाले फार नांवाजलेले आहेत. याकरितां आतां आम्हीं आमच्या स्वाधीन असलेल्या किल्लेकोटांचा आश्रय करून राहणें हेंच श्रेयस्कर वाटतें.

यावर मुस्तफखानाच्या सल्लागारांनीं असें सांगितलें " एकदां दिलेला तळ उठवून मागें परतणें ठीक नाहीं. त्यामुळें आमच्या सैनिकांच्या मनांत भीतीचें ठाणें बसेल; व शत्रूंना अधिकच उत्साह चढेल. यासाठीं तुम्हीं आतां मागें जाण्याचा विचार न करितां पुढें चाल करून झपाट्यानें सामना करणें हेंच राजकारणाच्या दृष्टीनें युक्त आहे." हें भाषण ऐकून मुस्तफखानानें मोठ्या आनंदानें आपल्या सल्लागारांची संभावना केली; व तो आपल्या खानांच्या फौजा युद्धास सन्नद्ध करण्याच्या खटपटीस लागला. त्यानें आपल्या सैन्याचे चारपांच विभाग करून एकीकडे चार हजार, उत्तरेकडे एक हजार, दक्षिणेच्या बाजूला दोन हजार (३६७) पश्चिमेकडे सहा हजार, अशा चोहों दिशांस चार तुकड्या उभ्या केल्या.

इकडे सेनापति नंजेंद्रानें आपल्या सेनेचे नऊ भाग करून खानांच्या सैन्यास गराडा घातला व सगळीकडे प्रलय मांडला ( ३६८ ). त्यांच्या वीरांचा मारा फार भयंकर होता. त्याचे धनुर्धारी, भालेकरी, व घोडेस्वार यांनीं खानांच्या दळांचा सप्पा उडवीत हलकल्लोळ माजविला. मैसूरकरांच्या हल्ल्यापुढें खानांची मात्रा मुळींच चालेना. त्यांचा जोर असह्य होऊन खानांनीं मागें पाय काढला. तेव्हां अशा पळपुट्या लोकांची निर्भर्त्सना करीत मुस्तफखान पुढें सरसावला. तेव्हां

त्याच्या शिपायांत पुन्हां उत्साह उत्पन्न झाला. उत्साहित झालेले दहा हजार शिपाई उचल करून शत्रूंवर तुटून पडले.

दळपति नंजेंद्रानें खानांचा तो जमाव आवेशानें चढाई करून येत असल्या- चें अवलोकन केलें ( ३६९ ). क्षणार्धांत उसळी मारून तो शत्रुसेनेशीं जाऊन भिडला. "आमच्या आघाडीच्या सैनिकांना तुटून पडूं द्या. एकाहि शत्रूला हातचा जाऊं देऊं नका " असें ओरडत त्या दळपतीनें तुरुकबल-समुद्राचा ठाव ठेतला. रणवाद्यें मोठ्यानें गर्जना करूं लागलीं: घोड्यांचें खेंकाळणें, व टापांचा प्रतिध्वनि, हीं त्यांत मिसळून शत्रूंचीं हृदयें धडधडूं लागलीं. या रणकंदनांत नंजेंद्रानें फारच शौर्य गाजवलें. त्याची तीक्ष्ण तलवार यवन राऊतांचीं मस्तकें पटापट तोडूं लागली ( ३७० ). त्यानें त्वेषानें दक्षिणेच्या बाजूला उचल करून येणाऱ्या खानांचा समाचार घेतला. चोहोंकडे पसरलेल्या शत्रुपक्षाचा धुव्वा उडवून त्यांना पळावयास लाविलें. त्याचा हा अद्भुत प्रताप पाहून " भले, शाबास, वाहव्वा " असे प्रशंसोद्गार निघूं लागले. जखमांनीं भरलेला त्याचा देह फुललेल्या पळसा- प्रमाणें शोभूं लागला.

विमानारूढ झालेल्या श्रीशंकरांनीं नंजराजाचें हें अलौकिक शौर्य अवलो- कन करून गिरिजेला दाखविलें. श्रीशंकर म्हणाले " मी ह्याच्यावर प्रसन्न झालेलों आहें. याला माझें सायुज्यपद देतों " ( ३७१ ). असें बोलून श्रीशंकरांनीं नंजराजापुढें प्रत्यक्ष होऊन " तुला पाहिजे तो वर मागून घे " असें सांगितलें. तेव्हां नंजराजा म्हणाला " प्रभूनीं आपल्या पदारविंदीं स्थान देऊन माझ्य जन्माचे पाश तोडून माझें रक्षण करावें हीच माझी प्रार्थना आहे. " नंजराजाची ही विनंति मान्य करून श्रीशंकरांनीं त्याला आपल्या विमानांत बसवून घेऊन प्रयाण केलें.

दळवायी नंजराजानें धारातीर्थीं प्राण अर्पण केल्याचें वर्तमान इतरांनीं कंठीरवास पोंचविलें. तेव्हां त्यानें त्याच्या शौर्यादि गुणांची आपल्या मंत्र्यांपुढें फार प्रशंसा केली. " आमच्या कार्याकरितां यानें आपला देह अर्पण केला. याच्यासारखा वीर भूमंडळांत कोणी नाहीं. याच्यामुळें पिरियपट्टण, सांवळ्ळी आदि स्थलदुर्ग व जलदुर्ग आमच्या हस्तगत झाले. यानें बलिष्ठ अशा मदुरेच्या नायकाची खोडकी जिरविली ( ३७३ ). असहाय शूर, पराक्रम धीर, असम कीर्तिविस्तार, यशःकीर्ति धुरंधर असा नंजराजेंद्र इहलोक सोडून गेला!" असें बोलून त्यानें त्याच्या जागीं लिंगेंद्र यास सेनापतित्वाचा अधिकार द्यावयाचा विचार कळविला.

शुभलग्नीं लिंगराजेंद्रास सेनाधिपत्य देण्यांत आलें. लिंगराजाच्या कामगिरी- मुळें कंठीरवाला विजयलक्ष्मीचा लाभ झाला ( ३७४ ).

## २ चिकदेवराजविन्नपम्

या ग्रंथाचा कर्ता चिकदेवराज. हा मैसूरचा राजा. यानें इ. स. १६७२ पासून १७०४ पर्यंत राज्य केलें. विन्नपि म्हणजे 'विज्ञापना'. या राजाचें कुलदैवत यादवगिरीचा नारायण. यानें त्याच्या पदकमलीं 'विज्ञापना' रूपी ही माळ गुंफून वाहिलेली आहे. यांत अशा या 'विज्ञापना' एकंदर तीस आहेत. यांत विशिष्टाद्वैत मताचीं तत्त्वें व वेदांत गोंवलेला आहे. या प्रत्येक विज्ञापनेच्या सुरुवातीस एक एक कंदपद्य असून पुढील मजकूर गद्यांत सविस्तर वर्णिलेला आहे.

या ग्रंथाच्या प्रास्ताविक भागामध्यें चिकदेवराजाचें कर्तृत्व व दिग्विजयादि पराक्रम कृत्यें यांचें गद्य-पद्यांत वर्णन केलें आहे. त्यांत ऐतिहासिक माहिती सांपडते. (यांतील बरींच पद्यें 'अप्रतिमवीर चरितां' त उदाहृत झालेलीं आहेत.) येथें उपयोगिलेली प्रत कर्नाटक काव्यकलानिधि नं. १५ इ. स. १९०५ ची आहे.

पान १:—

हा मय आहे, कीं शंबर, किंवा इंद्रजित्, अथवा मारीच असें म्हणत भीतीनें दिल्ली व भागानगर येथील नायकांनीं 'जी हुजूर' म्हणून अर्पण केलेल्या खंडणीनें चढून जाऊन चालून आलेल्या शिवाजीची रग जिरवून चिकदेव राजानें 'अप्रतिमवीर' हें नांव धारण केलें. (पद्य ४)

दिल्लीच्या दरवाजांत घुसून, लूट मिळवून, गोलकोंड्याचा खूप फडशा पाडून, विजयापुराला ठोकून काढून रिकामे करून गर्वानें उपद्रव देणाऱ्या शिवाजीचा मुलगा शंभुजी याचा डौल, तोरा व ताठा हीं चिकदेवराजानें आपल्या अद्भुत पराक्रमानें वितळवून टाकलीं. (पद्य ५)

पान २:—

एसवंतराव याचें नाक कापून, त्याला शस्त्रसंन्यास करावयास लावलें. जैतजी घाटी याला लोळवून, ठेंचून ठेंचून मारलें; तेव्हां लोकांनीं फार वाखाणणी केली. हां हां म्हणतां दादजी काकडा याचा गळा चिरून टाकला. याप्रमाणें सर्व देशाची भीति घालवून, या 'अप्रतिमवीरा' नें या पृथ्वीचें राज्य केलें. (पद्य ६)

गट्टी करून चालून येणाऱ्या (सामान्य) शत्रुराजांना यानें एका क्षणांत पाडलें यांत काय यानें मोठेसें केलें! अप्रतिम अशा याच्याबरोबर सामना देण्यास सरसावलेले बलिष्ठ असे कुतुपशाह व एदुलशाह यांना यानें धुळीस मिळवून कीर्ति संपादली असें सांगितल्यास या चिकदेवराजाचा खरा मोठेपणा वर्णिल्यासारखें होईल (पद्य ८)

त्वरा करून दिल्लीच्या पातशहाला बोलावून आणून, त्याच्याकडून कडे-तोडे मिळविलेले जे भागनगर व विजयापुराचे राजे त्यांना जिवंत प्रेताप्रमाणें पकडून आणून, मोठ्या अटीतटीनें हा अभेय विक्रम चिकदेव राजा राज्य करतो आहे. (पद्य १)

स्वस्ति श्रीमन्महाराजाधिराज राजपरमेश्वर प्रौढप्रताप अप्रतिमवीर नरपति श्री चिकदेवमहाराय श्रीरंगपट्टणामध्यें सिंहासनारूढ होऊन, साम्राज्यदीक्षा वाहून (पान ३) देवब्राह्मणपरिपालन हें मुख्य करून सकल प्रजेचें पालन करीत होता. तिकडे उत्तरेकडील देशांत उच्छृंखलपणानें वागणाऱ्या शिवाजीनें साठ हजार घोडे व एक लक्ष शूर पदाति बरोबर घेऊन चाल करून दिल्लीचा सगळा प्रांत लुटून लुबाडून उध्वस्त केला. विजयापुराच्या राजाचा पराभव करून, त्याचा प्रांत व ठाणीं जिंकून घेतलीं. गोलकोंडेच्या राजाला जर्जर करून त्यानें देऊं केलेल्या खंडणीचा स्वीकार केला. या गर्वामुळें फुगून शिवाजी ताडकन् कन्नड देशांत घुसला. तेव्हां चिकदेवरायानें युद्धांत त्याला हतबल केलें. त्याचा सेनापति जैतजी काटकर यांस घोड्याच्या टाचाखालीं खूप तुडविलें. त्याचें नाक, कान, मान, हात, पाय तोडून, त्या तुकड्यांनीं भूत-प्रेतांना संतुष्ट केलें. तसेंच दादजी काकडे याचा गळा चिरून, त्याच्या ओल्या शिराची मिरवणूक काढली. पुढें त्यानें आवेशानें शंभोजी यास भीतीच्या समुद्रांत बुडविलें. त्याच्या सहायार्थ आलेल्या एकोजीला जन्म नको नकोसा केला. त्याचा महाप्रधान असा जो एसवंतराव त्याचें नाक कापलें.

त्यानंतर गोलकोंडेकरानीं व विजयापुरकरांनीं शंभोजीला खंडणी देऊन व नजराणा पाठवून त्याचा मोठेपणा वाढविला. यास्तव चिकदेवराय त्यांच्यावर रुष्ट झाला. त्यानें त्यांची खोड मोडण्यासाठीं दिल्लीचा महापातशहा अवरंगजेब यास बोलावून आणलें. त्याच्याकडून त्या दोघांचे प्रांत हिसकून घ्यावयास लावले. त्याचप्रमाणें मोरस, तिगुळ, कोडग, मलेयाळ या प्रांतांच्या नायकांनीं मराठ्यांच्या शौर्यावरे भिस्त ठेवून पुढें सरसावून दोहो बाजूंनीं लढून याला त्रास दिला. पण यानें त्यांचींच हाडें खिळखिळीं केलीं. अशा प्रकारानें, अष्टदिग्विजय करून चिकदेवराय सुखसंकथा विनोदांत राहात होता. (पान ४).

या ग्रंथाच्या लांबलचक समाप्ति वाक्यांत चिकदेवरायांचीं अनेक बिरुदें व विशेषणें सांगितलेलीं असून, त्यांत त्याचे विजय व पराक्रमादि प्रमुख कृत्यें यांची यादच दिलेली आहे. त्यापैकीं कांहीं येथें उद्धृत करतों.

"......संगर भीम, उद्वृत्त हुरत्राण, चमू विक्षोभण विचक्षण विकट मराट शिवाजि वाजि सेनाधिप जयतजि काटकर दादजि काकड प्रमुख कंठ-नाळोच्छलद्रक्तधारारिक्त कृपाण संदर्शन विलीन हराजि संताजि

मुख्य महाराष्ट्र नृपप्रवेक.................................................
शाहजि मुख मराट नृप राजधानी कृता भंगुर बेंगळूर हरण निष्प्राणित शंभुजि साहजि संताजि हरजि प्रमुख महाराष्ट्र नृपालजाल,............
अप्रतिम वीर नरपति श्री चिकदेवमहाराज विरचित........"

---

## ३ अप्रतिमवीर चरितम् ।

याचा कर्ता तिरुमलार्य. हा कवि मैसुरचा राजा चिकदेवराय (१६७२-१७०४) याच्या पदरीं होता. या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय अलंकार (figure of speech) हा असून, या शास्त्रावरील प्रौढ व प्रमाणभूत अशा ग्रंथांत याची गणना होते. चिकदेवराय याला 'अप्रतिम वीर' असें एक बिरुद होतें. या ग्रंथांतील मुख्य भाग या चिकदेवरायाच्या कारकीर्दीतील अनेक घडामोडीला अनुलक्षून लिहिलेले असल्यामुळें या ग्रंथाला हें नांव देण्यांत आलेलें आहे. विशेषतः नियमाला लक्ष्य (उदाहरणें) म्हणून उद्धृत केलेल्या बहुतेक सर्व उताऱ्यांत या राजाचें पराक्रमादि गुण स्तुत झालेले आहेत. हीं उदाहरणें सामान्यतः तिरुमलार्य यानेंच स्वतः रचिलेलीं अशीं आहेत.

ग्रंथांचा मूळ प्रतिपाद्य विषय निराळाच असल्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें उद्धृत झालेल्या उताऱ्यांत निश्चित अशी ऐतिहासिक माहिती अत्यल्प सांपडते. ऐतिहासिक घटनेविषयीं वारंवार अनेक उल्लेख येतात. पण त्यांत पुनरुक्ति व मोघमपणाच फार आहे. या ग्रंथांतील शक्य तितके अधिक स्पष्ट व निश्चित अशी ऐतिहासिक माहिती पुरविणारे असे उदाहरणात्मक कांहीं उतारे येथें निवडून देत आहे.

संदर्भाचे तपशील 'कर्णाटक काव्यमंजरी' मालेंतील १८९३च्या जुन्या आवृत्तींतले आहेत.

चिकदेवरायाचें दिग्विजयवर्णनः—

याचें उत्तर प्रदेशांतील सीमेवरील रखवालदार यांनीं गोलकोंड व विजयापुर यांना हादरवून सोडलें. त्यांनीं मराठ्यांच्या सेनेला कापून काढलें. याप्रमाणें भूमीचा भार हलका करून त्यांनीं कीर्ति मिळविली. (पा. २)

तीन प्रतीच्या काव्यापैकीं (शेवटच्या) साधारण काव्याचें अनुप्रासप्रधान उदाहरणः—

**एकीकडे तुरुक लोक; दुसरीकडे मोरस; तिसरीकडे आरे यांचा (मराठ्यांचा) समुदाय; इकडे तिगुळ (तामिळ), तिकडे कोडग, तर पलीकडे**

मलेय ( डोंगरी ); या सर्वांनीं दाटी करून रणांत याच्यावर चाल केली. पण यानें त्या सर्वांच्या गर्दना छाटून त्यांचीं मुंडकीं दिशांना बलि म्हणून अर्पण केलीं. इ.

यमकप्रधान ( साधारण ) काव्याचें उदाहरण:—

चिकदेवाचें रणकंदन पाहून जग आश्चर्यचकित झालें. यानें मराठ्यांच्या सैन्याला प्रतिज्ञेनें अंतास पोंचविलें; व दादजी काकडे याला उभा करून त्याचें डोकें कापलें. (पा. ६ )

" सौकुमार्य " याचें उदाहरण:—

भयभीत होऊन याच्यापुढें नमते घेतलेल्या सर्व राजे लोकांनीं तेथून निघून जातांच संगनमत करून शिवाजीची भेट घेतली. त्यांनीं त्याच्यापुढें याचें ( चिकदेवरायाचें ) मर्म सांगितलें. तेव्हां त्यानें त्या राजे लोकांना बरोबर घेऊन कपटानें पुढें चाल केली व सामना आरंभला. तेव्हां यानें, गरुडानें सापांचा फडशा करावा त्याप्रमाणें, त्यांचा संहार केला. इ. (पा. १० )

" ओजस " या काव्यगुणाच्या पांच प्रकारांपैकीं चौथ्याचें उदाहरण:—

मैसुरच्या वीरांनीं वैऱ्यांचा खरपूस समाचार घेतला. वेडांचीं ठाणीं हादरून सोडून त्यांचीं डोकीं कापून काढलीं. जगांत प्रसिद्धि पावलेल्या तुरुक वीरांना लोळवलें. मोरसांना मार दिला. तेलुंगांचा पराक्रम जिरविला. मराठ्यांच्या जमावाला जेरीस आणलें.

" ओजस " याच्या पांचव्या प्रकाराचें ( साभिप्रायाचें ) उदाहरण:—

" हे चिकदेवनृपा, दिल्ली पादाक्रांत करून आमच्यासमोर उभे ठाकणारा कोणी नाहीं असें समजून आम्हीं इकडे आलों. पण काय सांगावें या मैसुरवाल्यांनीं आम्हांला या कांटेरी कुंपणांत लोळवून जर्जर करून सोडलें. तोबा तोबा! यापुढें या मैसुरवाल्यांचें नांव म्हणून केव्हांही काढणार नाहीं " असें म्हणत मराठे लोक पळून जातात. (पा. १४ )

करुणरसाचें उदाहरण:—

हे अप्रतीम, शत्रुपक्षांत हाहाकार माजविणाऱ्या वीरा! तुझ्या हल्ल्यांचें काय वर्णन करावें! यामुळें देशोधडीं लागलेल्या मराठ्यांच्या स्त्रिया "ब्रह्मदेवानें आमचें हे दुष्ट स्तन कां उत्पन्न केले? रानावनांत हिंडणाऱ्या आम्हांला मांड्यांचें हें वैभव घेऊन काय करावयाचें! आमची ही कटि तो बदलीत कां नाहीं! दे माय धरणी ठाय " असा शोक करीत अरण्यांत पडून लोळत आहेत. (पा २४-२५ )

शांतरसाचें उदाहरण:—

" हे अप्रतिम, आम्हीं जन्मलों कां! जन्मल्याबरोबर मेलो कां नाहीं! शिवाजी व शंभु यांच्या सेवेंत राहण्याचें आम्ही कां पत्करलें! आणि मैसुर-

करांच्या सरहद्दींत पाऊल कां ठेविलें" असें म्हणत मराठ्यांनीं तोंड वेंगाडून, उद्विग्नपणानें भगवे कपडे परिधान केले. (पान २६)

'भयानका' चें उदाहरणः—

चिक्कदेवराय, ऐकावें. तुमच्या माऱ्यांत सांपडलेले चढेल मराठे भय-भ्रान्त होऊन "रावु रावु जीवु जीवु गावु मी तुझा घुरे। देवु देवु चारु पायि दोनु सिंग भेवु भेवु। जीवु रावु" असें म्हणतात. (पा. २८)

अर्थालंकार प्रकरणामध्यें 'वाचकोपमेय लुप्ता' चें उदाहरण म्हणून एक कंदपद्य दिलेलें आहे. त्याचें स्पष्टीकरण पुढें गद्यांत केलें आहे तें असें:—

पूर्वीं रामावतारामध्यें "आत्मानं मानुषं मन्ये" असें म्हणून आपण मनुष्य आहों अशा भावना करून वागलात तरी शिवधनुर्भंग, परशुराम पराजय इत्यादि कृतीवरून आपण श्रीमन्नारायणच आहांत हें प्रकट झालें. आतां या चिक्कदेव राजाच्या अवतारामध्यें आपणांस एक नरपति असें मानून चाललें तरी दानवांशानें जन्म घेतलेले जैतजी, दादजी, हरजी, शाहजी, शंभुजी इत्यादि मराठ्यांचें समूळ उत्पाटन केलेलें अवलोकन केलें असतां आपण साक्षात् तो नारायणच आहात हें व्यक्त होतें (पा. ३५-३६)

'धर्मोपमान वाचक लुप्ता' चें उदाहरणः—

मंदबुद्धीचा यशवंत आपण पोसऊरु यास वेढा घालणें; मैसूरचे वीर आपणावर चढाई करून येणें व हां हां म्हणता आपलें नाक कापलें जाणें हें सर्व काकतालीय (कोकिलाम्र) न्यायानें घडलें असें म्हणाला (पा. ३८).

'न्यूनताद्रूप्यरूपका' चें उदाहरण:—

या मनुजरूपी उपेन्द्रानें (विष्णूनें) बाणपुरामध्यें सामना द्यावयास आलेले शंबु व बसव यांचा मद उतरविला (या कंदपद्याचें तिसरें चरण मिळत नाहीं) (पा. ४३)

संदेहालंकाराचें उदाहरण:—

"हा मयासुरच आला, कीं शंबर, कीं इंद्रजित, किंवा मारीच?" असा विचार करीत भयग्रस्त झालेल्या आग्रा, दिल्ली व भागानगर या प्रांतांतल्या लोकांनीं 'जयजी' म्हणून अर्पण केलेल्या खंडणीमुळें चढून जाऊन चढाई करून आलेल्या शिवाजीचा मद उतरवून चिक्कदेवरायानें 'अप्रतीम वीर' अशी पदवी संपादन केली. (पा. ४६)

प्रतिवस्तूपमा अलंकाराचें उदाहरण:—

भागानगर व विजयानगर (विजापुर) येथील शहा चिक्कदेवरायाबरोबर युद्ध करून हतवीर्य झाले. आणि ते मराठेही याजबरोबर लढून लढून थंड पडून त्याची वाट सोडून त्वरेनें निघून गेले. (पा. ६०)

निदर्शना अलंकाराचें उदाहरणः—

आघाडीवर येऊन तुटून पडलेला जैतजी काटकर याला जेव्हां चिकदेवरायानें कापून फेंकून दिलें तेव्हां तें पाहून जाणत्यांनीं साम्य ओळखून " यानें आज इंद्रजिताला लोळविलें " असें म्हटलें.

पर्यायोक्त अलंकाराचें उदाहरणः— ( पहिला प्रकार )

चिकदेवानें एकाच हत्तीवर बसून आलेले इक्केरीचे कूपखान व चेन्नबसव यांच्यापैकीं एकाच्या ( पहिल्याच्या ) पत्नीचें सौभाग्य मालवून टाकलें ( त्याला ठार केलें ); व दुसऱ्याच्या प्रियेच्या ओष्ठाचें सौष्ठव हरण केलें ( दांत पाडले ) ( पान ७२ )

पर्यायोक्त अलंकाराच्या दुसऱ्या प्रकाराचें उदाहरणः—

नरपते ! ऐक. तुझ्याशीं सामन्यास ठाकलेल्या मावळ्यांच्या सैन्याचा तूं संहार केलास; आणि या निमित्तानें तूं त्यांचें पाप नाहींसें करून त्यांना स्वर्गलोकीं पाठवून त्यांना सुखी केलेंस ( पा. ७४ ).

आक्षेप अलंकाराच्या तिसऱ्या प्रकाराचें उदाहरणः—

" चला, चिकदेवाच्या चरणीं वंदन करावयास तुम्ही जात असाल तर मी तुमच्या आड येणार नाहीं. पण त्याच्याशीं दोन हात करण्यास जात असाल तर मीहि तुमच्याबरोबर येतें " असें जैतजीची पत्नी तो बाहेर निघाला असतां त्यास बोलती झाली. येथें तुम्ही त्याच्याबरोबर संग्रामास जाऊं नका हा निषेधरूपी आशय तुम्ही जाऊन या अशी संमति सुचवून, पण युद्ध कराल तर मी अनुगमन करीन असें बोलून व्यक्त केला आहे. ( पान ७७ )

असंगति अलंकार, दुसऱ्या प्रकाराचें उदाहरण :

हे अप्रतिम, तुझे खंदे वीर धर्मपुरीमध्यें निकरानें झुंजत असतां दुष्टबुद्धीचे ते मराठे दक्षिणेच्या धर्मपुरीप्रांतांत घुसले. याचें स्पष्टीकरण केलेलें आहे तें असें:—

हरजी, जैतजी, दादजी आदि मराठे पूर्वेच्या प्रदेशांतल्या धर्मपुरी नांवाच्या किल्ल्यास आठ महिनेपर्यंत वेढा देऊन मोर्चे व कुंपण बांधीत असतां, तेथील महिशूरच्या शूर सैनिकांनीं बाहेर पडून ते मोर्चे व कुंपण उखडून टाकलें. या कारणानें संताप पावलेले मराठे त्या किल्ल्यावर हल्ला चढवून तो हस्तगत करावा अशा इरायानें दक्षिणेच्या प्रदेशांत असलेल्या धर्मपुरी नांवाच्या संयमिनीपट्टणाकडे चाल करून गेले असें येथें सांगितल्यामुळें हा असंगति अलंकार ( पा. ८४ ).

विषमालंकाराचें उदाहरणः—( पहिला प्रकार )

हे अप्रतिम, दिल्लीच्या शाहाचे सुभे ( प्रांत ) उद्ध्वस्त करण्यास समर्थ अशी आपली शक्ति कोठें ! आणि खेडोपाडीं हिंडणाऱ्या अनाथांना पाहून द्रवणाऱ्या आपल्या हृदयाची कोमलता कोठें ! ( पा. ८५ )

५

विषमालंकाराच्या तिसऱ्या प्रकाराचें उदाहरण:—

मैसूरवाल्यांना चोहोंकडून चांगला शह बसला आहे, आतां ही नामीधीसें लाभली आहे असें म्हणून यशवंत चाल करून आला. एकोजीनें ( वंकोजीनें ) पोसऊरूस ( नव्या गांवास ) वेढा देऊन जुना गांव हातचा गमावला.

याचें स्पष्टीकरण:—

वेंकोजीनें ( एकोजी ) पोसऊरूच्या किल्ल्याविषयीं अभिलाष बाळगित' बाळगितां जुनें असें बेंगळुरु हातचें घालविलें. ( पा. ८६ )

सारालंकाराचें उदाहरण:—

युद्ध करण्यांत मोगल हे श्रेष्ठ होत. आणि त्यांच्यापेक्षां ते मराठेअधिक. आणि अप्रतिमराज चिकदेवराय यानें या सर्वांना झोडपून नामोहरम करून प्रसिद्धि मिळविली. ( पा. ९७ )

काव्यार्थापत्ति अलंकाराचें उदाहरण:—

कपटी मराठे महिशूरच्या वीरांबरोबर विरोध करून, सामना देऊन हतवीर्य होऊन नष्ट झाले. मोगलही त्यांच्यापुढें नम्र झाले. मग आतां या भणंग केळदी मदुरेच्या राजांचा काय पाड ? ( पा. १०४ )

प्रौढोक्ति अलंकाराचें उदाहरण:—

चिकदेवानें मंद अशा मराठ्यांच्या दुर्यशामुळें मलिन झालेली कर्नाटकाची कीर्ति आपल्या यशाच्या सामर्थ्यानें पाजळून उजळ केली. ( पा. १०७ )

ललितालंकाराचें उदाहरण:—

“ अरेरे, आम्हांला कांहींच न कळून आम्हीं या कन्नड देशामध्यें कसे बरें शिरलों ! गुहेमध्यें निद्रित असलेल्या सिंहाला कीं हो आम्ही डंवचून उठविलें ' असे मराठ्यांनीं उद्गार काढले. ( पा. १०९ )

उल्लास अलंकार, चौथा प्रकार—दोषावरून गुणाचें निरूपण. उदाहरण:—

“ हत्तीवरून उतरून मी पळूं लागलों तर माझ्याबरोबर असलेला हा कूपुखान मला तसें करूं देणार नाहीं ” म्हणून चिन्ताग्रस्त झालेला चेन्नबसव तो मारला गेल्याचें पाहून निर्धास्त जाहला.

स्पष्टीकरण:—

कूपुखान जिवंत राहिला तर तो आपल्याला पळून जाऊं देणार नाहीं या कारणामुळें कूपुखानाच्या वधरूपी दोषामुळें चेन्नबसवाला पलायन हा गुण लाभला. अशा प्रकारें हा उल्लासालंकार जाणावा. ( पा. ११४ )

व्याजोक्ति अलंकाराचें उदाहरण:—

नाक कापलेला यशवंत आपण होऊन लोकांना बोलावून असें सांगूं लागला “ लोक हो, हें पहा, आतांच मी आपलें नाक कापून तुळजाभवानीला वाहिलें आहे ”

स्पष्टीकरणः—

येथें महिशूरवाल्यांनीं आपलें नाक कापलें असें न सांगतां, त्यांच्यावर विजय मिळावा म्हणून आपण होऊन आपलें नाक कापून भवानीला वाहिलें अशी बतावणी केल्यामुळें हा व्याजोक्ति अलंकार जाणावा. (पा. १२७)

निरुक्त्यलंकाराचें उदाहरणः—

बेड (बेडर) तुरुक व मराठे हे महिशूरकरांकडून मार खाऊन माघार घेऊन केळदीच्या सैन्यांत मिसळून, दांतीं तृण धरून, ही सगळी एकच बसवसेना आहे असें भासवीत शोभूं लागले.

स्पष्टीकरणः—

इक्केरीच्या बसवनायकाची मनधरणी केल्यामुळें बेड, तुरुक व मराठे यांच्या सहाय्यास पाठविण्यांत आलेल्या सैन्यास एकूण बसवसेना असा प्रयोग अन्वर्थक आहे. पण 'दांतीं तृण धरून' याच्याशीं त्याचा संबंध जोडल्यामुळें बसवसेना या पदाला दुसरा एक अर्थ ("बैलांचा कळप") येथें अभिप्रेत होतो. येणेंप्रमाणें हा निरुक्ति अलंकार जाणावा. (पा. १३७)

प्रतिषेध अलंकाराचें उदाहरणः—

"अरे अरे मराठ्यानो! चला चला येथून निघून जा. तुमचे खेळ खेळण्यास क्रीडांगण असा हा कांहीं भागानगर किंवा विजयापुरचा प्रदेश नव्हे. या प्रांतावर अप्रतिम वीर राज्य करीत आहे बरें!" (पा. १३७)

रसवदलंकार रसभावाचें अंग झाल्याचें उदाहरणः—

बिन नाकाचा यशवंत आपल्या घराच्या दाराशीं आला. तेव्हां लहान मुलें भीतीनें "जोगी आला" असें ओरडूं लागलीं. चिकदेवरायाशीं विरोध करणारे फजीत पावल्याशिवाय राहतील काय! येथें चिकदेवरायाबद्दल कवीच्या मनांत वागत असलेल्या प्रीतिभावाला "जोगी आला" यावरून व्यक्त होणारा भयानक रस अंगत्व पावलेला आहे. (पा. १४१-४२)

ऊर्जस्वल अलंकाराचें उदाहरणः—

हे अप्रतिम! तुझे शूर सैनिक स्वारीवर निघाले तेव्हां "बायानों ही तुमची कंबर इतकी कां रोडावली! तुम्हांला पोटभर खावयास मिळत नाहीं काय! तुमची ही वेणी अशी कृश व अस्ताव्यस्त कां बरें! केवढी बरें चिंता लागून राहिली आहे तुम्हांला! अशा प्रकारें रानांतल्या स्त्रियांनीं विचारलेल्या प्रश्नास मराठ्यांच्या बायांनीं उत्तर न देतां भीतीनें मौन धारण केलें. (पा. १४३)

भावशबलत्वालंकाराचें उदाहरणः—

याचें स्पष्टीकरण गद्यांत केलें आहे तें असेः—

जैतजी मैसूरच्या प्रदेशांत शिरला तेव्हां मैसूरवाल्यांनीं त्याचा प्रतिकार केला. त्याप्रसंगीं एकजण जैतजीचा वृत्तांत काय असें दुसऱ्यास विचारतो. तेव्हां त्या दोघांमध्यें पुढीलप्रमाणें संभाषण झालें.

दुसराः—प्रतिकार करणाऱ्या मैसुरच्या सैन्याशीं जैतजी सामना करण्यास सरसावला.

पहिलाः—मग त्यानें सेनापतीला उचित तेंच केलें म्हणावयाचें.

दुसराः—तो आवेशानें पुढें आला खरा, पण लगेच उसळी मारून निसटला.

पहिलाः—मग काय त्यानें पट्ट्याचा वार चुकविला अं ! खरोखर हे मराठे म्हणजे मोठे वस्ताद खरे !

दुसराः—तसें नव्हे. तो पळून जात असतां मैसुरच्या सैनिकांनीं **कोत्तत्ती** गांवाच्या जवळ त्याला थोपवून हाणून पाडलें.

पहिला ( शत्रु पडला असें कळून हर्षित होऊन ):—वा ! मग आमच्या लोकांचे प्राण वाचले. आतां ते सुखानें राहतील. ( पा. १४६–१४७ )

---

## ४ गुम्मनायकन पाळ्याचे पाळेगार

श्री. एम्. एस्. पुट्टण बी. ए. यांच्या पाळेगार ग्रंथमालेपैकीं ( Palayagar Series ) हा एक ग्रंथ आहे. याची प्रकाशनामिति इ. स. १९२६ आहे. या पाळेगारांची कैफियत मूळ तेलगूमध्यें लिहिलेली सांपडते. इ. स. १८६३ त श्री. अरकलगुड कृष्णप्प यांनीं कन्नडमध्यें त्याचें भाषांतर केलें. हा ग्रंथ ही मूळ कैफियत व इतर साधनांच्या आधारें रचिला आहे असें याचे लेखक सांगतात.

कांहीं लोकांची समजूत आहे कीं पाळेगारांची संस्था विजयनगरच्या अमदानींत निर्माण झाली. पण ही चूक आहे. पाळेगार ही संस्था विजयनगराचें राज्य स्थापन होण्याच्या पूर्वींच्या काळापासून अस्तित्वांत होती असें स्पष्टपणें दिसून येतें. याला या गुम्मनायकन पाळ्याचें उदाहरणच पुरेसें आहे. हें पाळें इ. स. १२४२ मध्यें स्थापन झालें. विजयनगरच्या स्थापनेनंतर हे लहान लहान पाळेगार विजयनगर राज्याला अंकित होऊन त्या साम्राज्यांत समाविष्ट झाले.

या पाळेगारांमध्यें अधिकार पदास आलेले एकंदर पंचवीस नायक होऊन गेले. या सर्वांनीं मिळून स. १२४२ पासून १८०३ पर्यंत राज्य केलें. यांचे वंशज बागेपल्ली तालुक्यांत नल्लचरवु येथें अद्याप राहात आहेत.

नववा राजा वसंत नायक याची कारकीर्द इ. स. १४५७ ते ६७ (पा. ३७-४१). याच्या कारकीर्दींमध्यें कलबुर्गी संस्थानाच्या राजानें वीस हजार सैन्यासह विजयनगरकरावर चाल केली. त्यानें चक्रवर्ति देवरायाचा धिक्कार करून पाळेगार नायक वगैरेकडून विजयनगराकडे जात असलेली खंडणीची रकम मध्येंच धरून बलात्कारानें लुटण्याचा क्रम आरंभिला होता. विजयनगरकरांच्या गांवांची नासधूस करून प्रजेला पीडा दिली. याचें परिपत्य करण्यासाठीं देवरायानें मोठी सेना पाठविली. तिच्या सहाय्यास यावें असा देवरायाकडून नायकास निरोप आला.

तेव्हां नायक सैन्यासह निघाला. वसंतनायकाबरोबर दहा हजार सैन्य होतें. गंडीकोटच्या पेम्मसानी तिम्मनायकाचें आठ हजार व विजयनगरचें पन्नास हजार अशी सेना होती.

देवरायानें पुढील युद्धाबद्दल वसंतनायक व तिम्मनायक यांस सल्ला मसलत विचारली. तेव्हां "राजधानीहून आलेलें आपलें सैन्य युद्ध करून फार थकलें भागलें आहे. उद्याचा दिवस त्यास विश्रांति घेऊं द्या. उद्याचा सर्व भार आमच्यावर टाका. आम्ही दोघे आमच्या सैन्याच्या बळावर संग्राम देऊन शत्रूचा नाश करून टाकतों" असें यांनीं सांगितलें. हें ऐकून देवराय हर्षित झाला. त्यानें यांच्या सांगण्याप्रमाणें केलें. दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वी सन्तम्मनायक यांचीं सैन्यें कलबुर्गीच्या किल्ल्याजवळ पोंचून पूर्वेच्या व पश्चिमेच्या बाजूनें वेढा देण्यांत आला. गुम्मनायक पाळेवाल्यांनीं फार मोठा पराक्रम गाजविला. कलबुर्गीचें सैन्य फार नाश पावलें. शेवटीं तेथला राजा ढाल तलवार घेऊन बाहेर पडला. तिम्मनायक त्याला पकडण्याची खटपट करीत असतां तो वसंतनायकास म्हणाला "माझी फौज सगळी मारली जाऊन असहाय असा मी लढण्यास आलों आहे. तूं आपणांस शूर म्हणवितोस तर आपल्या सैन्यास मागें ठेवून एकटाच माझ्याबरोबर द्वंद्व युद्धास तयार हो." वसंतनायकानें त्याचें म्हणणें मान्य केलें. या द्वंद्वयुद्धांत वसंतनायकाचे घाव वर्मीं लागून प्रतिपक्ष्यानें प्राण सोडला.

जयभेरी बाजूं लागल्या. विजयनगरचा ध्वज किल्ल्यावर फडकूं लागला. तें शहर हस्तगत करून नायकानें सर्वत्र चौकी पहारे बसविले व रायाच्या जवळ जाऊन झालेला सर्व वृत्तांत साविस्तर निवेदन केला. रायानें आनंदभरित होऊन नायकाला आलिंगन दिलें. पुढें देवरायानें नगरांत प्रवेश करून योग्य ती राज्यव्यवस्था केली व वसंतनायक यास बहुमान व बक्षिसें देऊन मोठा गौरव केला.

अठरावा राजा वीर दासप्पनायक याची कारकिर्द (सन १५४८–८४). याच्या कारकीर्दींत विजयनगरचे महाराज व कलबुर्गी संस्थानवाले यांच्या मागें पूर्वीपासून चालत आलेलें वैर विकोपास गेलें. बीदर, अहमदनगर, गोलकोंड व विजापूर येथील चौघेही नबाब एकत्र झाले. त्यांनीं आपलें संयुक्त सैन्य घेऊन विजयनगरच्या राज्यांत विध्वंस आरंभिला. तेव्हां रामराय यानें विजयनगरचें व पाळेगारांचें सैन्य एकत्र करून तुरुकावर चाल केली. दोन्हीं सैन्यें तालीकोटे गांवाजवळ एकमेकांस भिडलीं. भयंकर रणकंदन जुंपलें. विजयनगरकरांचा जय होण्याचा समय आला असतां, तुरुकाकडील विजापूरचा आदिलशहा यानें 'तह करूं इच्छितों' असें सांगून, रामराय यास अंबारींतून खालीं उतरवून बोलावून नेलें व घाटेंत त्याचा वध करविला. अंबारी रिकामी पाहून विजयनगरच्या सैनिकांचें धैर्य खचलें. तिकडे तुरुकांचीं विजयी वाद्यें वाजूं लागलीं. हें युद्ध इ. १५६५ मध्यें झालें.

पूर्वीपासून राजनिष्ठेनें राहून विजयानगरची सेवा करीत आलेल्या या गुम्मनगरच्या पाळेगारांनीं या प्रसंगींही आपलें कर्तव्य बजावलें. वीरदासप्पनायकानें या युद्धांत आपलें शौर्य चांगलेंच प्रकट केलें.

विजयनगरकरांचा संपूर्ण पराभव करून तुरुकांनीं त्यांच्या राज्यांत व राजधानींत लुटालुटीस आरंभ केला. ही संधि पाहून विजयनगराला अंकित असलेले सर्व पाळेगार स्वतंत्र होऊं लागले व तुरकांचा उपसर्ग आपल्या प्रांताला पोंचूं नये अशी त्यानें खबरदारी घेतली. त्याप्रमाणें वीरदासप्प नायकानेंही केलें. त्यानें आपली फौज वाढवून आपली सरहद्द आंखून घेऊन त्याचा पक्का बंदोबस्त केला (पा. ६२-६३).

एकोणिसावा राजा तिसरा वसंतनायक ( १५८८-१६४४ ).

याच्या कारकीर्दींत उत्तरेकडील दिलावरखान नांवाचा सरदार आठदहा हजार सैन्य घेऊन दक्षिणेंत आला; व त्यानें विजयनगरकरांच्या प्रांतांत लुटालूट आरंभिली. हा मोगलाई चक्रवर्तींच्यातर्फे राजप्रतिनिधि म्हणून सीर्य येथें राहिला. चित्रदुर्ग पाळेच्या बखरींतहि मोगलाकडच्या दिलावरखान नांवाच्या सरदारानें देशी राज्यांवर हल्ले केले व भरमप्प नायकाच्या कारकीर्दींत चित्रदुर्गाच्या सैन्यानें याला मारून पिटाळून लाविलें असें वर्णिलें आहे. इक्केरीच्या इतिहासांतहि याच्या पुंडाईचें वर्णन स्पष्टपणें आलेलें आहे.

याप्रमाणें डोईजड झालेल्या या खानाची दांडगाई मोडणें आवश्यक झालें. तेव्हां महाराय रंगराय यानें, या आडदांड तुरुकांचा समाचार घेण्याकरितां, गुम्मनायक पाळ्याचा वसंतनायक यास बोलावणें पाठविलें. तो पाळेगार आपल्या बंधूंसह मोठें सैन्य घेऊन विजयनगरास आला. त्याच्या मदतीस रंगराजानें दहा हजाराचें सैन्य व अमरसिंग नांवाचा सरदार यास पाठविलें. हीं दोन्हीं सैन्यें शोध करीत निघालीं. मलापहारी नदीच्या दक्षिणेस राय ( म ? ) दुर्गाच्या जवळ दिलावरखानाचें सैन्य उतरलें होतें. रंगराजाच्या सैन्यानें दिलावराला गराडा घातला. वसंतनायकाचा मार सहन न होऊन दिलावर पळून गेला. त्याच्या पक्षाचे दोन मराठे व दोन तुरुक सरदार यांना पकडून त्यांची रग जिरविली. याकरितां एकसारखे चार महिने सामना चालवावा लागला. याप्रमाणें या शत्रूचा नाश करून त्याच्याकडून तीस लक्ष वराह सोनें, चांदी, वस्त्रें इ. सगळें घेऊन वसंतनायक परत आला व त्यानें दिलावरखानाच्या पुंडाईमुळें त्रस्त व व्यथित झालेल्या प्रजाजनांना सहाय करून त्यांचे कष्ट निवारण केले. राहिलेली चीजवस्त व इतक्यांत हातीं सांपडलेला दिलावरखान यांना घेऊन वसंतनायक रंगराजाकडे आला व त्यांना त्याच्याकडे सोंपविलें. श्रीरंगराय वसंतनायकावर फार प्रसन्न झाला. त्यानें दिलावरखानास हत्तीच्या पायीं देऊन मारविलें. याचे साथी अशा त्या चौघांचाहि शिरच्छेद करविला ( पा. ६४-६५ ).

# ५ चित्रदुर्गचे पाळेगार

पूर्वोक्त श्री. पुट्टण्ण यांच्या पाळेगार ग्रंथमालेंतील हा आणखी एक ग्रंथ आहे. याचा प्रकाशनसन १९१४. हें संस्थान विजयनगरकालीं प्ररूढ झालेल्या सरंजामी पद्धतीला अनुसरून निर्माण झालें. विजयनगराच्या पडत्या काळांत या संस्थानाचा उदय झाला. तिम्मण्णनायक यानें श. १४८० (इ. १५५८) च्या सुमारास हें संस्थान स्थापिलें. हें संस्थान पुढें मात्ति व बळिचोडु या दोन घराण्यांत मिळून एकंदर २११ वर्षे चाललें. येथील नायक अत्यंत शूर व साहसी होते. यांनीं फ्रेंच इंजिनियरांना आपल्या नोकरींत ठेवून त्यांच्याकडून भक्कम किल्ले व इतर सार्वजनिक इमारती बांधवून घेतल्या. हैदरअल्लीनें इ. स. १७७८ मध्यें या संस्थानाचा विनाश केला. हे पाळेगार कुरुब म्हणजे धनगर जातीचे होते. या संस्थानाची उत्पत्ती सांगतात ती अशीः—

उत्तर देशांतील जडकल्लु दुर्गाहून वाल्मीकिगोत्री, दिल्ली प्रांताचे तळवार असे कामगेती वंशाचे तीन बंधु प्रतिकूल काळ प्राप्त झाल्याकारणानें आपलें घरचें दैवत अशा अहोबल नरसिंहमूर्तीची पेटी, गाई, मेंढ्या इत्यादि घेऊन दक्षिणेंत आले. हे तिघे बंधु व त्यांची संतति नीरुतडि गांवच्या आसपास वसाहत करून राहिली. सबगडि ओबनायकाचा मुलगा तिम्मण्णनायक हा मात्ति गांवांत राहिला तिम्मण्णनायकानें स्वपराक्रमानें शेजारच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापिली व आपल्या अधिकारक्षेत्राचा विस्तार केला. हें पाहून शके १४९५-९६ (इ. १५७३-७४) मध्यें विजयनगरकरांनीं चित्रदुर्गाची नायकगिरि त्याच्याकडे सोंपविली (पा. ४ ते ६).

एकदां कलबुर्गीकरांचा बंदोबस्त करावा म्हणून साळ्‌वो नरसिंगरायानें त्या शहराला वेढा घातला. सहा महिने झाले पण किल्ल्यांतील लोक खंबीर असल्यामुळें त्यांची कांहीं मात्रा चालेना. तेव्हां आनेगुंदीच्या राजानें तिम्मण्णनायकाला बोलावून तिकडे पाठविलें. तिम्मण्णनायक शके १५०४ च्या चित्रभानु संवत्सरांत वैशाखमासीं (इ. १५८२ मे) कलबुर्गीवर निघाला. त्यानें किल्ल्यावर हल्ला चढविला. शत्रूंना चिरून रक्ताचे पाट वाहविले तेव्हां सूर्योदयापूर्वीं किल्ला हस्तगत झाला. या पराक्रमाबद्दल विजयनगरच्या रायांनीं नायकाचा फार सन्मान केला व खूप आहेर देऊन गौरविलें (पा. १२-१३).

## चिक्कण्णनायकाची कारकिर्द

(श. १५९७ ते १६०८)

पैंगळ संवत्सरीं बंधरखानाची फौज हरिहरास वेढा देण्याच्या हेतूनें येत आहे असें तेथील सुबेदार बम्मानाकडून कळालें. बंधरखानानें चित्रदुर्गास येऊन नायकाला

सगळी हकीकत निवेदन केली. इतक्यांत षेरखानानें ६००० घोडे व १२००० पायदळ बरोबर घेऊन हरिहरास वेढा दिला. ही बातमी ऐकून नायक षेरखानास घेऊन तो वेढा उठविण्यास निघाला व बारेगुड्डास जाऊन त्यानें सैन्याचा तळ दिला. त्या रात्रीं त्यानें तेथील सर्व झाडांना दिवट्या बांधल्या. तसेंच बैलांच्या शिंगानाहि दिवट्या बांधल्या. नगारे, शिंग इत्यादि वाद्यवाल्यांना डोंगरांत बसवून एकाच वेळीं वाजविण्यास सांगितलें. गवत पसरून त्याला व शें दोनशें बाणांना एकदम आग लावून दिली. सगळीकडे पसरलेली ही आग पाहून हें सबंध सैन्यच आहे असें समजून गनीम भयभीत झाले.

नायक सर्व सैन्य घेऊन रात्रीच्या वेळीं नदीच्या कांठानें निघाला. हरिहराच्या पश्चिमेस कोडेयालजवळ जाऊन कुंपणें तोडून टाकलीं व रोज गांवांत शिरून व बाहेर येऊन युद्ध करीत राहिला. हा उपद्रव सहन न होऊन षेरखानाचें सैन्य पळून गेलें. हरिहर किल्ल्याची व्यवस्था पूर्वीप्रमाणें पुन्हां षेरखान याच्याकडे सोंपविण्यांत आली (पा. २८).

रौद्रि संवत्सराच्या माघमासीं विजापूरच्या रणदुल्लाखानाचें लष्कर आलें. हरपनहल्लीवाल्यांनीं मोळगोंडनहल्लीला वेढा दिला. नायकानें सैन्यासह चाल करून वेढा उठविला. रक्ताक्षि संवत्सरामध्यें बूदीहाळला वेढा यावा या हेतूनें दळवायी चिक्कप्प, होरकेनायक, कुंजप्पन दासय्य यांच्याबरोबर सर्व सैन्य देऊन पाठविलें. या सैन्यानें चाल करून जाऊन बूदीहाळास वेढा दिला. इतक्यांत गोवळकोंड्याच्या नबाबाकडील पोदालि लिंगप्प याचें सैन्य येत आहे असें समजल्यामुळें नायकानें बूदीहाळचा वेढा काढून तेथील सैन्य चित्रदुर्गास बोलावून घेतलें. गोवळकोंड्याचें सैन्य आलें व त्यानें रामगिरीस वेढा दिला. तेव्हां चित्रदुर्गाहून सैन्य आलें व त्यानें शत्रूंना पळवून लाविलें (पा. ३१).

---

## ६ केळदिनृपविजयम्

हें ऐतिहासिक काव्य असून प्रौढ अशा चंपूशैलीमध्यें लिहिलें आहे. याचा कर्ता लिंगण्ण कवि. या ग्रंथाचा काळ इ. स. सुमारें १७७०. या ग्रंथांतील मुख्य विषय ऐतिहासिक कसोटीला जास्त उतरतो. यांत काव्याच्या विलासापेक्षां ऐतिहासिक कथनाकडे अधिक लक्ष दिलेलें आहे. यांत जागोंजाग नेमक्या तारखाहि नमूद केल्या आहेत.

केळदीच्या राजांचीं चरित्रें निवेदन करणें हा या ग्रंथाचा प्रधान उद्देश असून, इतर राजे व नायक यांचे वृत्तांत तदनुषंगानें आले आहेत. यांत दिल्लीचे सुलतान, दक्षिणेंतील मुसलमानी राजे व मराठे यांच्याबद्दल प्रसंगानुरोधानें

माहिती सांगितली आहे. ही माहिती विशेषतः ऐकीव गोष्टींवर भर देऊन लिहिलेली असल्यामुळें यांत विश्वसनीयतेचा अंश फार कमी प्रमाणांत सांपडतो. यांतील निवडक भाग येथें अनुवादित केले आहेत.

द्वितीयाश्वासम्—( पानें २९ ते ३८ )

केळदि राज्याचा मूळ संस्थापक चौडप्पनायक, याचा पुत्र सदाशिवराव नायक. याच्या राज्यारोहणाची मिति, शक १४३६, श्रीमुख संवत्सर श्रावण शुद्ध तृतीया ( ५ जुलै १५१३ ).

एकदां विजयनगरचा कृष्णराय आपल्या सेनेसह या दिशेकडे आला असतां सदाशिव नायकानें त्याची भेट घेतली. रायानें नायकाचा फार आदर करून, " आमच्याशीं स्पर्धा करणाऱ्या शत्रूंची खोड मोडून ये " अशी आज्ञा केली. " मी तिकडे येईपर्यंत तूं पुढें जाऊन कल्याण कलुबुरगि हे किल्ले जिंकून घे " असें रायानें आणखी सांगून कांहीं घोडे, हत्ती व पायदळ असें सैन्य त्याच्या मदतीला दिलें.

नायक चाल करून येत आहे ही वार्ता ऐकून ताम्रतुंडाग्रेसर अमदानगरचा भैरी निजाम पातुशाहा याच्या अनुमतीनें फेरोजीखान, तालीतखान, संजरखान, शाठेखान, मुनिलखान, दस्तुरखान, वज्रखान, रावुतखान, बोक्कसिंग असे हे अत्यद्भुत पराक्रमशाली वजीर एकत्र होऊन अपरिमित सैन्याबरोबर निघून जंबुखंडीजवळ त्याच्या येण्याची वाट अडवून रणास तोंड देऊन उभे राहिले. उभय सैन्यामध्यें युद्धास आरंभ झाला. रायाच्या दळाकडून निभाव लागत नाहीं असें पाहून नायक पुढें सरसावला. तेव्हां धुमश्चक्री माजली. त्यांत बोक्कसिंगाच्या तलवारीचा वार लागून ( २० ) नायकाचें चिलखत फाटून खांद्यापासून पाठीच्या मध्यापर्यंत जखम झाली. त्याची क्षिति न बाळगतां नायक शत्रूंवर आवेशानें तुटून पडला. तालीतखान, फेरोजीखान, संजरखान इत्यादि आठ वजीरांनीं एकदम याच्यावर चढाई केली. पण नायकानें आपली तलवार, भाला व बाण यांच्या साह्यानें त्या सर्वांचा चांगला समाचार घेतला ( २१ ). याप्रमाणें तौरुष्कपतीच्या खानांची दाणादाण उडवून बोक्कसिंगाला कैद करून रायापाशीं सोंपविलें. रायानें फार संतुष्ट होऊन याचा सन्मान केला.

यानंतर नायकानें प्रख्यात अशा कल्याणदुर्गावर चढाई करून तो हस्तगत केला. याबद्दल त्याला रायाकडून इम्मडि सदाशिवेंद्र अशी पदवी मिळाली. नायक कल्याणदुर्गावरील स्वारीहून, परत फिरून, कृष्णराय याजबरोबर कांहीं काळ राहिला. पुढें त्यानें आपल्या स्वाधीन असलेल्या जमवाडन किल्ल्याकडे कूच केलें ( २२ ). कृष्णदेवरायानें आपल्या सरदारमानकऱ्यांस बोलावून त्यांच्यापुढें कलुबुरगीचा किल्ला जिंकून घेण्याची गोष्ट काढली. पण त्यांना ती गोष्ट अशक्य वाटून ते तेथें तसेच विचार करीत राहिले. तेव्हां नायकानें पुढें जाऊन हां हां म्हणतां

तो किल्ला सर करून कृष्णरायाला संतुष्ट केले. तेव्हां त्यानें याला 'कोटे कोलाहल' अशी पद्वी दिली.

तेथून कृष्णराय 'जालेय पाळू' (बाभळीचें रान) नांवाच्या गांवाकडे आला. तेथें एडव मुरारी नांवाचे शूर लोक त्याच्याशीं सामना करण्यास आले. रायानें त्यांचा मोड करून त्यांचा किल्लाही हस्तगत केला. पुढें एकदां कृष्णरायानें सदाशिव नायकास बोलावून आपल्याशीं वैर करणाऱ्या 'बरीद पातुशहाचा उन्माद उतरवून ये' असें सांगितलें. तें ऐकून नायक स्वारीवर निघाला. नायकाच्या हल्ल्याचें वर्तमान ऐकून, बरीदशहा, शूर असे आपले सेनापति व सेना यांसह, रणांगणांत याच्याशीं तोंड देण्यास उभा राहिला. तुमुळ युद्ध माजलें (३३). अरि-बळ नायकावर तुटून पडलें. पण नायकानें शौर्याची शर्थ करून त्यांचा मोड केला (३४). हें पाहून स्वतः बरीदशहानें आपला मद गज याजवर सोडला. नायकानें शत्रुसमूहांत घुसून त्याला मागें रेटलें (३५). मग नायक कापाकापी करीत बरीदशहाशीं जाऊन भिडला. त्यानें आपला घोडा याच्या हत्तीवर घालून त्याला जेर केलें. दुसरा हत्ती घेऊन व आपली फौज जमवून शहानें पुन्हां जोराची उठावणी केली. पण सरते शेवटीं त्याला नायकाच्या पराक्रमापुढें हार खावी लागली (३६). नायकानें शहाला व त्याच्या शूर सरदारांना कैद करून छत्र ध्वज, मोहेंची आंगठी इत्यादि लुटीसह कृष्णरायाकडे नेऊन सोंपविलें (३७). हें पाहून राय फारच आनंदित झाला. त्यानें नायकाचा सन्मान करून मेघडंबर, दिवाप्रदीप इत्यादि बिरुदें व शहाच्या हातांतली शिक्याची अंगठी हीं याला दिलीं. तेव्हांपासून 'बरीदसप्तांगहरण सदाशिवरायनायक' ही गौरवाची पद्वी याला प्राप्त झाली.

पुढें एकदां विजया (जा) पुराधिपाच्या बळावर रायाशीं ताठ्यानें वागणाऱ्या शाठेय नांवाच्या वजिराला नायकानें वठणीवर आणलें. तसेंच आणखी एकदां यानें मोठ्या गर्वानें रायाशीं समर मांडणाऱ्या अमदानगरच्या निजामशहाचाहि पराजय करून पळवून लाविलें. त्याबद्दल रायानें याला 'एकांगवीर' असें बिरुद बहाल केलें (३८).

तृतीयाश्वासम् (पानें ४३ ते ५५).

सदाशिव नायकाचा ज्येष्ठ पुत्र दोड्ड संकण्णनायक शके १४८६ विश्वावसु(?) संवत्सराच्या वैशाख शुद्ध पंचमीस राज्यासनावर बसला.

हा एकदां देशसंचार करावा म्हणून जंगमाचा वेष घेऊन व नागर मरि (नागाचें पिल्लू) नांवाची तलवार बाळगून निघाला (४६). अनेक देश व तीर्थक्षेत्रें फिरून दिल्लीस जाऊन पोंचला. तेथें आपल्याशीं बरोबरी करणारा शूर कोणी नाहीं अशा गर्वानें उन्मत्त झालेल्या अंकुशखान नांवाच्या सरदारानें नगरद्वारावर आपल्या बिरुदासह तलवार बांधून ठेविली होती (४७). यानें तें खड्ग

काढून घेऊन त्या खानाला युद्धास पाचारण केलें. बादशहासमक्ष जमलेल्या दरबारामध्यें मोठ्या कौशल्यानें खानाशीं लढून त्याला ठार केलें व सर्वांकडून वाहवा मिळविली (५५).

**पंचमाश्वासम्** (पानें ७० ते ७४).

दोड्ड संकण्ण नायकाचा धाटका मुलगा वेंकटप्पनायक शके १५०५ चित्रभानु संवत्सरीं मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस (इ. स. १५८२ नोव्हें. २०) गादीवर बसला. तो राज्य करीत असतां विजापुराचा तुरुष्क पातुशाह यानें दक्षिणेंत मुलुखगिरी करावी या उद्देशानें मंजुळखान, महमुद्दखान, बहिलिमखान, संजरखान, शाठेयखान, सलाबितखान, अंबरखान, अंकुशखान, अंमद्खान या वजीरांना बोलावून फौजेनिशीं स्वारीवर निघण्याची आज्ञा केली. हैदर मल्लिनायक व बारिगीचा देविनायक हेहि त्यांना येऊन मिळाले (७१). या सर्वांनीं मिळून प्रचंड सेनेसह कूच करून जडेयांच्या किल्ल्याला (जडेयर कोटे) वेढा दिला. ही बातमी ऐकून वेंकटप्पनायक आपलें पायदळ बरोबर घेऊन शत्रूंशीं भिडला. त्यानें सर्व खानांना पराजित करून त्यांच्या सैन्याचा मोड करून वेढा उठविला. तसेंच यानें हनुमनरेन्द्राच्या पायदळासह तुडुगुणीच्या किल्ल्याला वेढा देणाऱ्या यवन सैन्याचीही दाणादाण उडविली (७२). त्याचप्रमाणें यानें हानगल व गुत्ति यांना गराडा घातलेल्या मोठ्या तुरुष्क फौजेलाहि चरचरा कापून काढलें.

पुढें एकदां रामरायानें पूर्वीं दूधलोण्याची उंबळी (इनाम) म्हणून दिलेला मासूर प्रदेश गिळंकृत करावा म्हणून मंजुळखान चालून आला. नायकानें त्याचा पराभव करून, त्याचें एंजलखान (म्हणजे उष्टा खान) असें नांव ठेविलें. एवढ्यावरच न सोडतां यानें त्याचा पाठलाग करून त्याला सीमेच्या पलीकडे हाकलून देऊन व प्रतिकार करणाऱ्या सैन्याचा संहार करून हानगल येथें अचल असा आपला विजयस्तंभ उभा केला.

अशा प्रकारें अत्यंत शौर्याचीं कृत्यें करून आपल्या भुजबळ पराक्रमानें राज्य चालविणाऱ्या नायकाचा प्रतापातिशय विजापूरच्या पातशहानें श्रवण केला. तेव्हां त्यानें चिडून जाऊन 'त्याचें राज्य जिंकून घ्या' असा हुकूम देऊन त्याजवर मोठ्या लष्कराची रवानगी केली. हें सैन्य आपल्या राज्याच्या हद्दींत घुसून अगदीं जवळ आलेलें आहे अशी वार्ता नायकाला पोंचली. क्रुद्ध झालेल्या नायकानें शत्रूवर हल्ला केला. त्यानें दोन्ही हातांत तलवारी घेऊन शत्रुसैनिकांचे यथेच्छ बळी घेतले. यावरून याला दोखंडेराय असें बिरुद प्राप्त झालें (७३).

त्यानंतर आणखी एक प्रसंग. तुरुष्काबरोबर संग्राम चालला त्यासमयीं नायकानें एकट्यानेंच, तेल माखलेल्या डोक्यानें, नग्न घोड्यावर आरोहण करून

शत्रूंवर चढाई केली व पातशाही फौजेचा धुव्वा उडवून विजय संपादन केला. याच युद्धामध्यें यानें दुष्ट अशा बारिद्‌ग वजीराला त्याच्या हत्तीसह कैद केलें.

येणेंप्रमाणें वेंकटप्पनायकानें दोन तीन वेळा पातशहाच्या फौजेचा विध्वंस करून व तीस पळवून लावून प्रसिद्धि मिळविली ( ७४ ).

**षष्ठाश्वासम्**—( पानें ९३ ते १०३ )

मागील आश्वासांत वर्णिलेल्या थोरल्या वेंकटप्प नायकानंतर शके १५५२ शुक्र संवत्सर, मार्गशिर्ष शुद्ध १ ( इ. स. १६२९ नोव्हेंबर ५ ) या दिवशीं त्याचा पौत्र वीरभद्र नायक इक्केरीच्या राज्यपदावर आला ( ९३ ). याच्या कारकीर्दींत राज्याबद्दल तंटे उपस्थित होऊन दोन तट उत्पन्न झाले.

एकदां वीरभद्रनायक इक्केरी सोडून पुण्यक्षेत्र तीर्थराजपुराला गेला. ही संधि साधून मृत्युंजयदेव, लक्ष्मीपति व ठाणेदार तिम्मण्ण यांनीं मसलत करून कैदेंत असलेल्या वीरवोडेयराला सोडवून इक्केरीच्या सिंहासनावर बसविलें. हा वीर वोडेयर वीरभद्रनायकाचा पिता जो भद्रप्पनायक त्याचा थोरला चुलता रामराज याचा पुत्र होय ( ९४ ). ही बातमी कळतांच वीरभद्रनायक त्वरेनें कौलिय दुर्गाला गेला व त्यानें तो किल्ला स्वाधीन करून घेतला. नंतर तो तेथून आनंदपुराला जाऊन तेथील किल्ल्यांत राहूं लागला.

पुढें कांहीं दिवसांनीं इक्केरींत राज्य करीत असलेला वीर वोडेयर मृत जाहला. ही वार्ता पोंचून वीरभद्रनायक आनंदपुराहून तिकडे (इक्केरीला) निघाला. इतक्यांत वीरभद्रनायकाचा भाचा सदाशिव नायक यानें पुढें होऊन, वीरवोडेयरचा धाकटा भाऊ बसवलिंग याला लुला करून इक्केरीची गादी बळकावली. वीरभद्रनायकानें जोरानें त्याच्यावर चाल केली हें पाहून सदाशिव नायक गर्भगळित होत्साता पळून गेला. सोंदे व बीळगीच्या नायकांनीं त्या पळपुट्यास आश्रय दिला. त्याला आपल्याकडे सोंपविण्याकरितां वीरभद्रनायकानें निरोप पाठविला. पण त्यांनीं तें नाकारलें. तेव्हां वीरभद्रनायक क्रुद्ध होऊन त्यांच्यावर सैन्यानिशीं चाल करून गेला. इतक्यांत सदाशिव नायक मरण पावला. वीरभद्रनायकानें सोंदे बीळगी-वाल्यावर मोर्चा फिरवून, त्यांना पराभूत करून, त्यांचा प्रदेश जिंकून घेतला ( ९५ ).

अशा प्रकारें राज्यभ्रष्ट झालेले सोंदे व बीळगीचे नायक विजापूरच्या पातशहाकडे गेले. त्यांनीं वीरभद्र नायकावरील द्वेषामुळें अनेक खोट्या नाट्या हकीकतींचा पाढा वाचून त्याचे कान भरले. " यानें आपला भाचा सदाशिवनायक याला अन्यायानें हाणून पाडलें. आमचे किल्ले हिसकावून घेतले. तो तुमचीहि पर्वा करीत नाहीं. फार माजला आहे. याकरितां हुजुरांनीं मेहेर नजर करून, सदाशिवनायकाच्या मुलास राज्यपदावर बसवावें व आमचे जिंकलेले प्रदेश आम्हांला

परत देववावेत " या प्रकारें त्यांनीं मनधरणी करून पातशहाचे पाय धरले. व त्याजकडून मदतीची फौज मिळवून ते परत निघाले.

वीरभद्रनायकास हा सर्व वृत्तान्त विदित जाहला. तेव्हां त्यानें रायसद शंकर नारणय्य नांवाच्या आपल्या अधिकाऱ्यास विजापुरीं पाठविलें व मुरारीपंत (१६) नांवाच्या मंत्र्याच्या मुखानें आपल्या संस्थानाची इत्थंभूत हकीगत पातशहास निवेदन करविली. ती खरी हकीकत ऐकून पातशहा संतुष्ट झाला. सैन्य पाठवण्याचा हुकूम त्यानें परत फिरविला. इक्केरीच्या राज्याला वीरभद्रनायक हाच रास्त हकदार आहे अशी त्याची खात्री झाली. त्यानें रायसद शंकर नारणय्य यास शरजाराय असा किताब दिला व त्याचा योग्य प्रकारें सन्मान केला. वीरभद्रनायकाला हिरवें राजछत्र, पताका, अलंकार इत्यादि मानमरातब देऊं केले. वीरभद्रनायकानें त्यांचा स्वीकार केला. पुढें नायकानेंहि पातशहाच्या सांगण्यावरून सोंदे-बीळिगीवाल्यांना त्यांचा त्यांचा प्रदेश परत दिला. अशा प्रकारें राज्य करीत असतां, पुढें एकदां तरीकेरेच्या नायकानें बाणावरच्या वेंकटपतीची दुष्ट मसलत ऐकून पातशहाच्या फौजेस आमंत्रण दिलें त्याचें नेतृत्व रणदुल्लाखानाकडे होतें. त्यानें हां हां म्हणतां इक्केरी राज्याचा (१७) फन्ना उडविला. तेव्हां वीरभद्र नायकानें कौलिय दुर्गाचा आश्रय घेतला.

रणदुल्लाखानाच्या स्वारीमुळें शालिवाहन शक १५६० ईश्वर संवत्सर पुष्य वद्य दशमी (इ. स. १६३७ डिसें. ३०) या दिवशीं इक्केरी राजधानी विस्कळित झाली तेव्हां तेथें राहणें अशक्य झाल्यामुळें वीरभद्रनायक आपल्या कुटुंबासह भुवनगिरि येथें जाऊन राहिला. रणदुल्लाखानानें तसाच त्याचा पाठलाग करून, केंगे हनुमनायकाच्या सैन्यासहवर्तमान भुवनगिरीच्या किल्ल्याला वेढा दिला. "दैवानें आणलेल्या या संकटांत धैर्य खचूं न देतां कसेंही करून आपला बचाव करून घेतला तर पुढेंमागें शत्रूचा नाश करतां येईल" ही राजनीति जाणणाऱ्या नायकानें विचार करून आपल्या अधिकाऱ्यामार्फत रणदुल्लाखानाबरोबर तडजोडीचें बोलणें लावलें व वेढा उठवून परत फिरावें असें खानाचें मन बळविलें. नंतर आपण वेणुपुराला (बिदुरूर) जाऊन राहिला.

येणेंप्रमाणें वीरभद्रनायकानें राजनीतीनें वागून आपल्या राज्याचा बचाव केल्यानंतर शालिवाहन शक १५६१ बहुधान्य संवत्सर मार्गशीर्षमासीं (इ. स. १६३८ डिसें.) बिदुरूर किल्ल्यांतील राजवाड्यांला आपलें निवासस्थान बनविलें. मग त्यानें तरीकेरेच्या नायकानें केलेला अपकार मनांत आणून रामकृष्णप्प नांवाच्या अधिकाऱ्यास विजापुराला पाठवून पातशहाला प्रसन्न करून घेतलें. मग मोठ्या सैन्यासह रणदुल्लाखानास पुन्हां बोलावून आणून (१८) हरिहराजवळ त्याची गांठ घेतली. शिवप्पनायक व रामकृष्णप्पय्य यांच्याबरोबर सैन्य देऊन पाठविलें. त्यांनीं रणदुल्लाखानासह चाल करून तरीकेरेच्या प्रदेशावर हल्ला

चढविला व त्याचा निःपात केला. पुढें, पूर्वी आनेवळ्ळी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या बसवापट्टणच्या किल्ल्याला वेढा देऊन तो सर केला. रणामध्यें केंगेय हनुमप्प नायकाच्या भावांना कैद करून पातशहाकडे पाठविलें. मग शिवप्प नायक व रामकृष्णय्य यांना रणदुल्लाखानासह सैन्यानिशीं मायावादीच्या ( मैसूरकरांच्या ) राज्यावर पाठविलें. त्यांच्याकडून पातशहाचीं तिकडचीं सर्व कार्यें साधून दिलीं व पातशहानें पाठविलेल्या आहेराचा स्वीकार केला.

यावर कांहीं काळ लोटला. मध्यें राज्यांत अनेक भानगडी उपस्थित झाल्या. शिवप्पनायक व वेंकटप्पनायक हे वीरभद्रनायकाचे चुलते असून त्यांच्यावर नायकाचा फार विश्वास होता. नायकानें त्यांच्याकडे राज्यांतील अनेक अधिकाराचीं कामें सोंपविलीं होतीं. ही गोष्ट सेनेदिवान पुट्टण्ण इत्यादि कांहीं उपद्व्याप्यांना सहन झाली नाहीं. त्यांनीं शिवप्पादिकांना आपल्या जाळ्यांत ओढण्याचा प्रयत्न केला. शिवप्पनायक वेळींच जागा होऊन ( ९९ ) निसटून सागरला गेला. तेव्हां सेनेदिवाण पुट्टण्ण हा पट्टगुप्पेला जाऊन राहिला. तेथून त्यानें इक्केरींत राहात असलेला पातशहाचा वकील जन्नोपंत याला नजराणा पाठवून आपलासा करून घ्यावा व शिवप्प नायकाला हस्तगत करावा म्हणून अनेक लटपटी केल्या. शिवप्पनायक सागर येथील बादामी लिंगप्प वगैरे लोकांच्या साह्यानें पार झाला. तेव्हां वीरभद्र नायकानें शिवप्प नायकाला बोलावून घेऊन त्याला चंद्रावर दुर्ग प्रदेशाचा अधिकार दिला. पुढें वीरभद्रनायक कांहीं काळ होसंगडि ( १०० ) व कोल्लूर येथें राहिला व पुढें कंडलूर किल्ल्याला जाऊन तेथें राहूं लागला ( १०१ ). मध्यें आणखी कांहीं कुलंगडीं उपस्थित झालीं. नायकानें त्या सर्वांचा बंदोबस्त करून शिवप्प याला मुख्याधिकार देऊन फार सावधगिरीनें राज्याचा कारभार चालविला.

यावेळीं, विजापूरच्या पातशहानें दक्षिणेच्या दिग्विजयाची तयारी केली. त्यानें आपला मुलगा रुस्तुंजमान याजबरोबर मोठी फौज देऊन या स्वारीवर ठविलें. त्याजबरोबर अंबरखान, महमुद्दखान, कूबरखान, अंकुशखान, शाजीखान, पत्तेखान, परातखान हे वजीर होते ( १०२ ). त्यांनीं मोठ्या आवेशानें चाल करून येऊन सिमोगेच्या किल्ल्याला वेढा दिला. हें पाहून वीरभद्र नायकानें मोठें सैन्य जमवून शिवप्पनायकाच्या हाताखालीं तें देऊन त्यांवर पाठवून दिलें. शिवप्पनायक आपला धाकटा भाऊ वेंकटप्पनायक याच्यासह मोठ्या धडाडीनें निघाला व यवन सैन्यावर तुटून पडला. त्यानें सगळ्या खानांचा मोड करून तुरुष्क सेनेची दाणादाण केली. रुस्तुंजमानाला वेढा उठवून पिछेहाट करावी लागली. हें ऐकून क्षुब्ध झालेल्या पातशहानें बंकापुराला येऊन मैदानांत तळ दिला. तेव्हां नायकानें शरजाराय याला ( पातशहाकडे ) पाठविलें

व शिवप्प नायकाकडून तहाचें बोलणें लावून पातशहाला परत फिरावयास लाविलें ( १०३ ).

सप्तमाश्वासम्—( पानें १०६ ते ११६ )

वीरभद्र नायकानंतर शा. श. १५६८, पार्थिव सं., मार्गशीर्ष शु. १२ ला ( इ. स. १६४५ नोव्हें २० ) चिक्कसंकण्ण नायकाचा नातू शिवप्प नायक वेणुपुराच्या ( बिदुरूरु ) राजवाड्यांत राज्यपदावर बसला. यानें चौदा वर्षे नऊ महिने वीस दिवस राज्य केलें ( १०६ ते ११६ ).

त्यानंतर शिवप्प नायकानें दुर्मुख संवत्सरांत विजापुराचा पातशहा मृत जाहला असें वर्तमान ऐकून, ताम्रमुखांनीं हस्तगत केलेले इक्केरी, सोरब, बुडुगाणि महादेवपुर, अंबालिगोळ्ळ इत्यादि किल्ले जिंकून घेतले ( ११० ).

विजयनगरच्या चौथ्या ( अरवीडु ) घराण्यांतील ( सहावा ) श्रीरंगराय शत्रूंच्या ( विजापूर व गोवळकोंडें ) स्वाऱ्यांमुळें देशभ्रष्ट झाला असतां, रायसंस्थानाचा उद्धार केला पाहिजे असा विचार करून व शिवप्प नायकानें सोंदे बीळिगे, तरिकेरे, हरपुर इत्यादि प्रदेशांच्या नायकांचें व स्वतःचें सैन्य जमवून चाल केली व बेलूरु हस्तगत करून श्रीरंगरायाला देऊन राय संस्थान स्थिर केलें. याबद्दल रायानें त्यास अनेक बिरुदें, रामबाण नांवाचा हत्ती वगैरे सन्मान बहाल केले.

मग नायकानें ( श्रीरंग ) पट्टणाकडे चाल करून गांवाच्या जवळ तळ दिला. तेव्हां म्हैसूरच्या राजानें मोठ्या सैन्यानिशीं त्याच्यावर हल्ला चढविला. निकराची लढाई झाली. तींत नायकानें म्हैसूरचा सेनापति हंप यास पकडलें. ( ११४ ) शत्रूंचीं शिरें कापलीं.सिंहासनावर बसून त्यांच्या सैनिकाकडून सलाम घेतले. कावेरीला पूल बांधून, सैन्य पलीकडे नेऊन पट्टणाला वेढा दिला. यावर आपली धडगत नाहीं असें जाणून मैसूरवाल्यांनीं आपल्या मदतीला विजापुराहून बल्लुलखानाच्या हाताखालीं सैन्य बोलावलें. हें पाहून नायकानें सामोपायानें बलुलखानाला परत पाठविलें. आणि किल्ला सर करण्याच्या बेतांत असतां, त्यांनीं घाबरून जाऊन वेढा चालविणारे गोलंदाज व सैन्यांतील कांहीं अधिकारी यांना लांच देऊन फोडले. शिवाय अभिचार–होम इत्यादि दुष्ट मार्गांचाहि अवलंब केला. ह्यामुळें नायकाच्या प्रकृतींत बिघाड झाला. तेव्हां शत्रु–परिवेष्टित अशा या प्रदेशांत राहणें बरें नव्हे असा विचार करून नायकानें वेढा उठविला व आपलें सैन्य परतवून वेणुपुराला प्रयाण केलें. ( १५५ ).

अष्टमाश्वासम्—( पानें ११८ १३० )

शा. श. १५८४ प्लव संवत्सर भाद्रपद शुद्ध १५ ( स. १६६१ ऑगस्ट २९) शिवप्पनायकाचा ज्येष्ठ पुत्र भद्रप्प नायक वेणुपुराच्या राजवाड्यांत गादीवर बसला ( ११८ ).

यानें पितृपरंपरेनें प्राप्त झालेल्या राज्याचें धर्मानें परिपालन केलें व मायावींचा (मैसूरकरांचा) पराभव केला. मैसूरच्या सेनापतीचा पराभव करून त्यालाही पळवून लाविलें. सुधापुर (सोंदे) करांचा गर्वभंग करून त्यांचें राज्य व राष्ट्र हिरावून घेतलें. सैन्यासह सबनीस कूसप्पय्यास पाठवून, दिवाणाची वकिलात असलेल्या सीरेडे किल्ल्याला वेढा दिला (११९).

तेव्हां सोंदेकरांनीं विजापुराच्या आदिलशहाकडे गाऱ्हाणें नेलें. तें ऐकून पातशहानें शाजि (शहजी), बलुलखान, सैद विलास, शरजाखान यांच्या बरोबर सैन्य देऊन पाठविलें. त्यावर भद्रप्पनायक जातपन (जातपाचा मुलगा) यास मोठ्या सेनेसह पाठवून आपण भुवन गिरीच्या किल्ल्यांत राहिला. अंबलिगोळ्ळाजवळ दोन्ही सैन्यामध्यें हातघाई होऊन भयंकर युद्ध माजलें. त्यांत तुरुष्क फौजेनें जातपन भद्रप्पाचा पराभव केला. नंतर तिनें फार त्वरेनें चाल करून विलुसागराच्या खोऱ्याच्या मार्गानें आंत शिरून तोडासिहोळे प्रदेशांत तळ दिला. मग वेणुपुराच्या किल्ल्याला वेढा देऊन तो हस्तगत केला. मागाहून पातशहानें येऊन शोभकृत् संवत्सराच्या कार्तिक कृष्णपक्षामध्यें वेणुपूर किल्ल्याच्या राजवाड्यामध्यें ठाणें दिलें. मग त्यानें शाजी (शहाजी), सैद विलास, शर्जाखान इत्यादि वजीरांची सैन्यासह रवानगी केली. त्यांनीं येऊन भुवनगिरीच्या दुर्गाला वेढा घातला (९).

भद्रप्पनायकानें धैर्य न सोडतां नेटानें टिकाव धरून बरीच सेना जमविली. वाटा, खिंडी व खोरीं यांचा बंदोबस्त केला. घनचक्कर रण जुंपलें (१२०). त्यांत त्यानें यवन फौजेचा चक्काचूर उडविला. तोफखाना वगैरेंच्या साह्यानें तिला लोळवून प्रेतांचा गालिचा पसरून दिला. शरजाखान, सैद विलास व शाजी (शहाजी) यांना मागें रेटून पळावयास लाविलें. मग हूवय्य प्रभृति अधिकाऱ्यांना पाठवून तह घडवून आणला. अशा प्रकारानें पातशहाला मागें परतवून, मोठी कीर्ति मिळविली. नंतर भुवनगिरी दुर्गांतून नायक निघून वेणुपुराला पोंचून भुजबल पराक्रमानें राज्य करूं लागला (१२१).

भद्रप्पनायक मरण पावल्यावर शा. श. १५८६ शोभकृत संवत्सर फाल्गुन शुद्ध १० स (इ. स. १६६३ फेब्रु. ७) भद्रप्प नायकाचा सहोदर थोरला सोमशेखर नायक यास वेणुपुराच्या राजवाड्यांत सिंहासनाधिकार प्राप्त झाला. यानें पुढें विरोधिकृत् संवत्सराच्या मार्गशीर्ष शुद्ध ११ (इ. १६७१ डिसें. २) पर्यंत म्हणजे एकूण ७ वर्षें व नऊ महिने धर्मानें राज्यप्रतिपालन केलें (१२४). यानें कोट्टिपुराचा सिद्दप्पशेट्टी याची कुमारी चेन्नम्माजी हिच्याबरोबर मोठ्या वैभवानें विवाह केला.

यानें मैसूरकरांची खोडकी मोडावी या हेतूनें त्यांच्या राज्यांत स्वारी करून, विध्वंस मांडून बेक्कोड, बेट्टगोरू, कणतूरू, अब्बिण व बेलूरु हीं गांवें घेतलीं.

१२५ ). यानें गर्वानें मातलेल्या तुळुव मानकरी नायकाची रग जिरवून त्याच्या-कडून पैसा वसूल केला.

अशा रीतीनें सोमशेखर नायक सद्धर्मानें राज्याचा प्रतिपाळ करीत असतां बरमे मावुत नांवाच्या एका नीच माणसानें 'आपण हत्तीचा मद सेवन केल्यास आपल्या अंगांत सर्व प्रकारचें बळ प्राप्त होईल' असा उपदेश केला. दैवदुर्विलासानें नायकानें त्याचा दुष्ट सल्ला ऐकून हत्तीचा मद सेवन केला. त्यामुळें त्याला उन्माद झाला व तो नेहमीं भ्रमिष्ट राहून अव्यवस्थित चित्तानें वागूं लागला आणि हलकट लोकांच्या सहवासांत, ख्यालीखुशालींत स्वैरपणें वर्तन करूं लागला.

हा प्रसंग पाहून संस्थानच्या उपद्यापी अधिकाऱ्यांनीं कारस्थान रचून फितुरी माजविली. विजापूरच्या मुजबरखानानें जिन्नोपंताला तिकडे पाठविलें (१२६). त्यानें सैन्यासमवेत त्वरेनें येऊन महानवमीच्या मैदानांत ठाणें दिलें. पुढें त्यानें दुष्टांच्या मसलतीच्या भरीं पडून सोमशेखराला ठार केलें. हें वर्तमान राणी चन्नमाजी हिला समजतांच, तिनें जिन्नोपंताच्या सैन्यांतलि प्रमुख अधिकाऱ्यांना पकडून यमभटांच्या हवालीं केलें. मग तिनें केंगेय हनुमप्पाच्या तलवारीनें शेख बाब नांवाच्या त्याच्या नांवाजलेल्या वीराचें मस्तक कापवून आपला दरारा बसविला.* कारस्थानी लोकांना बहुतप्रकारें शिक्षा करविली व कोडंसीच्या मैदानांत असलेल्या जिन्नोपंताला शौर्यानें घालवून देऊन किल्ला लुटला. बरमे मावूत व मसूद यांना एका क्षणांत पळवून लाविलें व महाधूर्त मोळेयपाचा ताठा मोडून, कांहीं दुष्टांच्या कंपूंना शासन करविलें ( १२७ ).

याप्रमाणें उपद्याप्यांचा बंदोबस्त करून चेन्नमाजी राज्य करूं लागली. पण या उपायानें राज्यांत शांतता स्थापित जाहली नाहीं. पुनश्च अनेक लटपटी व कारस्थानें यांना पीक आलें. चेन्नमाजी हिच्या हातून राज्यकारभार काढून घ्यावा असा व्यूह रचला गेला. अंधक वेंकटय्य याचा रक्षापुत्र शिवप्प याला राजा म्हणून उभा केला. हें वर्तमान बरमे मावूत इत्यादि पाताळयंत्र्यांच्या कारस्थानाला भिऊन ( १२८ ) बीळगीच्या प्रदेशांत राहात असलेला कासरगोड तिम्मण्ण सब्बुनीस कृष्णपय्य यांनीं ऐकलें व त्यांनीं जातप्पाचा पुत्र भद्रय्य याच्या मुलाला राज्याधिकारी करावें असा विचार केला आणि पूर्वी आलेल्या जिन्नोपंत याला सहायाला बोलावून, बीळगीकरांच्या सैन्यासमवेत तयारींत राहिले.

तिकडे अंधक वेंकटय्य याच्या मार्फत राज्याधिकार चालवीत असलेले मरेबोवि कंदाचारद लक्ष्मय्य व वीरभद्रय्य प्रभृतींनीं सामना केला पाहिजे असें ठरवून

---

* या वाक्यांतला मजकूर 'पोथी' ( ओले ) प्रतींत नाहीं.

लोकांची जमवाजमव करून चिटणीस गिरियप्प याला पाठवून दिलें. उभयपक्षां मध्यें हातघाई होऊन, तींत गिरियप्प पतन पावला. तेव्हां पराभूत झालेले हळे पैकद हेम्मे वीरभद्रण्ण आदिक परत आले. त्यांपैकीं मरेबोडि याचा चेन्नमाजीनें शिरच्छेद करविला. अशा या आणीबाणीच्या परिस्थितींत तेथें राहणें बरें नव्हे असा विचार करून चेन्नमाजीनें वेणुपुराच्या राजवाड्याचा त्याग करून भुवनगिरि दुर्गाच्या प्रासादाचा आश्रय केला.

तेथें राणीनें कासरगोडु तिमण्ण नायक व सब्बुनीस कृष्णप्पय्य यांना विश्वासानें बोलावून घेतलें. त्यांची व भुवनगिरीच्या परिवारी लोकांची गट्टी जमली. सर्वांनीं मिळून रागद्वेष विसरून एकमतानें मसलत केली. जातप्पाचा भद्रय्य याच्या कुमाराचा राज्याधिकाराशीं संबंध पोंचत नाहीं असें ठरविलें. अंधक वेंकटय्य व त्याचा मुलगा यांना पूर्ववत् होसंगडीच्या किल्ल्यास पाठवून दिलें. त्या वेंकटय्याचा मुलगा कुत्सित असा जो शिवप्पनायक त्याला अंगविकल करवून चेन्नमाजी हीच राज्याला पात्र असा निश्चय केला. येणेंप्रमाणें संस्थानचीं सर्व कार्यें चेन्नमाजी इच्या मुखानेंच चालविण्यांत आलीं ( १२९ ). अशा रीतीनें शालिवाहन शक १५९४ विरोधिकृत् संवत्सर फाल्गुण वद्य १० ला ( इ. १६७२ मार्च. १४) भुवनगिरी दुर्गाच्या राजवाड्यांत सोमशेखर नायकाची पत्नी चेन्नम्माजी हिला राज्यपद प्राप्त झालें. त्यानंतर चेन्नमाजीनें आपला सगळा सैन्यपरिवार घेऊन भुवनगिरि सोडून वेणुपुराच्या किल्ल्यांतील राजवाड्यांत प्रवेश केला व ती केळदि राज्याची स्वामिनी जाहली ( १३० ).

**नवमाश्वासम्** ( पानें १३१ ते १६६ ).

पुढें केळदि धर्मसंस्थानाच्या राजपदाला योग्य असा कोणी पाहिजे असा चेन्नमाजीनें मंत्री, नियोगी व बंधुजन यांच्याशीं विचारविनिमय करून, राजवंशापैकीं बसवप्प नायक याला सिंहासनाधिकारी ठरवून ( १३१ ), त्याला शा. श. १५९५ परिधावी संवत्सर श्रावण शु. १४ ( स. १६७२ जुलै २८ ) या दिवशीं दत्तकपुत्र करून घेतलें. पुढें या राजकुमाराला योग्य असें सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली.

नंतर कासरगोडु तिमण्णनायक याजबरोबर सैन्य देऊन पाठविलें व यवनांनीं आक्रमण केलेले तवनिधि, होन्नाळि व जडेय असे जे तीन किल्ले त्यांवर चढाई केली. नायकानें शत्रूंना पिटाळून लावून हे किल्ले स्वाधीन करून घेतले.

सरपन मलुक नांवाचा ताम्रमुख दिवाणाचा वकील होऊन राहिला होता. मागें त्याच्या अधिकाराखालीं असलेल्या पंचमहालांतील मिडिजे नांवाच्या किल्ल्यावर सोंदेकरांनीं चढाई केली व तो हस्तगत करून, तेथें हनुमनायक यास अधिकारी

म्हणून नेमलें. राणीनें कासरगोड्डु तिम्मण्ण नायक याजबरोबर सैन्य पाठवून हनुमनायकाची खुमखुमी जिरविली व सुधापुर ( सोंदे ) कराच्या स्वाधीन असलेला तो मिडिजे किल्ला लढून हातीं आणला ( १३२ ).

तिकडे, जातप्पाच्या भद्रप्पानें घाटाखालच्या प्रदेशावर सत्ताधीश व्हावें या हेतूनें चौट, बंगाजल, सावंत आदिक तुळुव मानकऱ्यांना फितवून कारकळ, मल्लिकार्जुनगिरि वगैरे किल्ले जिंकून घेतले व तो फार मस्तीनें वागूं लागला. तेव्हां त्याच्यावर दळवायी भद्रप्प यांस पाठवून त्याचें शासन करविलें. तसेंच तिनें सब्बुनीस कृष्णप्पय्य व कासरगोड्डु तिमण्णनायक यांजबरोबर मोठी फौज पाठवून, मायावादी मैसूरकरांचा दळवायी कुमारय्य याला पिटाळून लावून वसुधारेचा किल्ला व प्रदेश हिसकून घेतला. इतक्यांत सोंदेच्या रामचंद्र नायकानें मिडिजेचा किल्ला घेतल्याची वार्ता ऐकिली तेव्हां तिनें सब्बुनीस कृष्णप्पय्याबरोबर सैन्य पाठवून पुन्हां मिडिजेचा किल्ला स्वाधीन करून घेतला ( १३३ ). सिरसे सोंदे यांचा प्रदेश व सुधापुरकरांचीं बिरुदें हिसकून घेऊन चेन्नमाजीनें आपला पराक्रम गाजविला व सुधापुराच्या राजांचा गर्वभंग केला.

नंतर सब्बुनीस कृष्णप्पय्याबरोबर सैन्य जमवून देऊन दिवाणाच्या वकीलीमध्यें असलेलें बसवापट्टण हस्तगत करून घेतलें व त्याच कृष्णप्पय्याला पाठवून कडवूरु, बाणावर, हासन, बेलूरु हे किल्ले युद्धांत जिंकून घेतले ( १३४ ) व मैसूरकरांची चांगलीच रग जिरविली. पुढें एका आनंदाच्या प्रसंगीं सोंदेचे अरसप्प नायक व रामचंद्र नायक यांनीं आपला अनुज सदाशिवराव याच्या द्वारें विनंति केली. दयार्द्र होऊन सोंदेकरांचे बनवसे आदिक प्रदेश त्यांना परत दिले. पेदूर लिंगप्प यानें भागानगरकरांचें मन बिघडविलें होतें. तेव्हां त्याला बसवापट्टण येथें ठेवून संतुष्ट केलें.

जरिमलेचा राजा प्रतापातिशयानें फार मातला होता. बासिंग व मोठीं बिरुदें धारण करून तो मोठ्या तोऱ्यानें वागत होता. त्यावर सब्बुनीस शरजा शंकर नारायणय्य यास पाठविलें. त्यानें रणांगणांत जरिमले राजाला कैद केलें. राणीनें त्यांचीं बासिंग व बिरुदें हिस्कून घेतलीं व दया करून सोडून दिलें.

भूमंडलांत मान्यता मिळविलेल्या यवनाबरोबर संग्राम चालवून पराभूत होऊन शरण आलेला सरदार ( १३५ ) राजेराम ( राजाराम ) याचें तिनें चांगलें रक्षण करून राजमंडळांत अत्यधिक कीर्ति संपादिली.

याची हकीकत कशी हें समजावयाला आर्यांचा (मराठ्यांचा) मूळ वृत्तांत, त्या रामराजाला पकडण्यासाठीं आलेल्या त्या तुरुष्कांचा मूळ वृत्तांत व तो

रामराजा व ते तुरुष्क यांच्यामध्यें विरोध उत्पन्न होण्याचें कारण हें सांगतों. आणि त्यासाठीं प्रथम आरेयांचा ( मराठ्यांचा ) मूळ वृत्तांत सविस्तर कथन करतों. तो असाः—

कुरुक्षेत्राच्या शेजारीं काशीच्या डिल्ली ( दिल्ली ) च्या वायव्येस क्षत्रियांचें मूळ संस्थान असा चित्तोड नांवाचा गड शोभत आहे. चित्ताला भय उत्पन्न करीत असल्यामुळें चित्तोड हें नांव त्याला प्राप्त झालें. हा चित्तोडगड आसमंतात पांच योजनांच्या विस्तारानें सर्व प्रकारच्या धनधान्य पुष्पफलांनीं समृद्ध असा विराजत आहे. त्या चित्तोड संस्थानचे अधिपति भारद्वाजगोत्री क्षत्रिय राजे असून परंपरेनें ' राणा ' हें अभिधान धारण करून राज्याचें पालन करीत होते.

या क्षत्रिय कुलाच्या परंपरेंत उत्पन्न झालेला 'राणा' नांवाचा राजा या चित्तोड संस्थानीं शोभत होता. या ' राण्या ' स पद्मिनी नांवाची एक रूपवती कन्या उत्पन्न झाली. तिचें पोषण करीत राणा राज्य करीत असतां, पद्मिनी नांवाच्या त्या कुमारिकेचें रूप, लावण्य, गुण व शील हीं दिल्लीचा अधिपति जो अकबर पातशहा त्याच्या कानीं गेलीं. हें ऐकून पातशहा सैन्य घेऊन स्वतःच निघाला व त्यानें चितोडास पोंचून गडाला वेढा देऊन तळ ठोकला. तें संस्थान हस्तगत करण्यासाठीं बारा वर्षेपर्यंत अनेक प्रकारच्या खटपटी केल्या तरी तो गड स्वाधीन होत नाहीं, असें जेव्हां त्या अकबर पातशहानें पाहिलें तेव्हां त्यानें छद्मवेष धारण करून त्या गडामध्यें आपला प्रवेश करून घेतला. तेथें तो राण्याचा वसिष्ठगोत्री रामसिंग याच्याकडे मुख्य सेवक म्हणून राहूं लागला.

एके दिवशीं पातशहा रामसिंगाबरोबर राजवाड्यांत प्रवेश करून राण्याच्या जवळ ( १३६ ) गेला असतां, राणा सिंहासनाखालीं उतरून उभा राहिला. तें पाहून रामसिंगानें भीतीनें पावलें टाकीत ' मला पाहून काय म्हणून आपण सिंहासनाखालीं उतरलां हें सांगावें ' असें विचारलें. त्यावर राण्यानें ' मीं तुला पाहून खालीं उतरलों नाहीं, तुझ्याबरोबर आलेल्यास पाहून खालीं उतरलों ' असें उत्तर दिलें व अकबर पातशहाचा हात धरून त्याला सिंहासनावर बसविलें. मग राण्यानें तो चितोड गड नजराणा म्हणून पातशहाला अर्पण केला आणि ' येथवर येण्यांत आपला हेतु काय, व माझ्याकडून आपलें कोणतें कार्य व्हावें ' अशी पृच्छा केली. यावर ' तुझी पुत्री पद्मिनी हिला पहावयास आलों आहें ' असें पातशहानें सांगितलें.

' असें असेल तर ठीक आहे ' असें म्हणून राण्यानें पद्मिनीला बोलावून आणून पातशहाला दाखविलें. तेव्हां अकबर पातशहानें 'ही पद्मिनी माझी मुलगी' असें बोलून तिला आपल्या मांडीवर बसवून घेऊन तिचे मुके घेतले व राण्याल बोलावून ' तूं मला दिलेला चितोडगड शपथपूर्वक मी तुझी मुलगी पद्मिनी हिला

दिलेला आहे ' असें सांगितलें. हे शब्द ऐकून तिनें ' माझ्या पित्याशीं वैर धरून सैन्य घेऊन आलेल्या यानें दिलेल्या ह्या गडाचा मी कधींहि स्वीकार करणार नाहीं' असें आपला बाप राणा याला निक्षून उत्तर केलें.

अशा रीतीनें त्या गडाला कोणीहि वाली म्हणून राहिला नाहीं. तेव्हां राणा व अकबर पातशहा या दोघांनीं एकमतानें विचार करून, ' हा चितोड गड आम्हां दोघांनाहि नको ' असें म्हणून राजवाड्याच्या दरवाजाला भक्कम कुलुपें लावून दिलीं. मग अकबर पातशहानें वेढा उठवून दिल्लीकडे प्रयाण केलें. इकडे राणी आपल्या कन्येसह चितोड गडाच्या जवळच असलेल्या उदयपुर नांवाच्या शहराला जाऊन सर्व राजवैभवासह तेथेंच कायमची वस्ती करून राहूं लागली. पुढें त्यानें स्वस्त्रीचे ठायीं एका कुमाराला जन्म दिला. त्याला 'राणा' असें नांव ठेवून त्याचें पोषण तो करूं लागला.

एके प्रसंगीं राणा स्वारीवर जाऊन परत आला. वाटेंत त्यानें त्या नगरांत रहात असलेल्या एका सुताराच्या मुलीला पाहिलें. मोहवश होऊन त्यानें तिचा स्वीकार केला. कांहीं काळानंतर त्या सुताराच्या ( १२७ ) मुलीच्या पोटीं दोन मुलें निपजलीं. शिवाजी व संबाजी अशीं नांवें ठेऊन त्यानें त्यांचें पालन केलें.

पुढें कांहीं वर्षानंतर, एके प्रसंगीं, त्या राणारायाचे कुमार राणा, शिवाजी व संबाजी हे तिघे एकमेकांशीं मिसळून एकत्र शिकार खेळावयास गेले. शिकार संपवून दमून ते तिघेहि एका झाडाखालीं येऊन त्याच्या सावलींत निजले. त्यांपैकीं शिवाजीनें राणा यास बोलावून 'या वृक्षाची जात कोणती हें सांग 'असें विचारलें. यावर ' मी क्षत्रियाचा बच्चा आहें, सुतारणीच्या पोटच्यांना या झाडाची जात कोणती हें ठाऊक असणार ' असें राण्यानें उत्तर दिलें.

हे शब्द त्या कुमारांच्या मर्मीं झोंबले. परंतु ही गोष्ट शिवाजीनें आपल्या मनांतच ठेवून सहन केली. मग ते दोघेहि उदयपुरास आले. पुढें शिवाजी व संबाजी यांनीं 'सुतारणीच्या पोटीं जन्म घेतल्यामुळें राजा होण्यास आपण अयोग्य ठरलों. आतां असेंच राहणें अनुचित ' असा विचार करून त्या शहरांत असलेल्या ओंकारेश्वर लिंगाची भक्ति आरंभिली. ओंकारेश्वर प्रसन्न झाला व शिवाजीच्या स्वप्नांत ब्राह्मणवेषानें येऊन त्यानें सांगितलें, " मी तुम्हांला राजपद देतों याची खुण अशी. तुम्ही दोघेहि पूर्वीप्रमाणें मृगयेस निघा. वाटेंत तुम्ही घातलेल्या अंगरख्याचें एक टोंक एका झाडाला अडकेल. तेथें खणून पहा. तुम्हाला अगणित ठेव सांपडेल. त्यामुळें उत्तरोत्तर तुमची भरभराट होईल व स्वतंत्र राजे म्हणून प्रसिद्धी पावाल. " असें बोलून तो अंतर्धान जाहला.

हें स्वप्न पाहून शिवाजी जागा झाला. त्यानें त्याचा आशय आपला भाऊ संबाजी यास कथन केला. या स्वप्नाचें प्रत्यंतर पाहण्यासाठीं ते दोघे शिकारीस गेले. वाटेंत शिवाजीच्या अंगरख्याचें टोक एका झाडाला अडकलें. तेथेंच थांबून त्यांनीं तें स्थल खणून पाहिलें. त्यांत त्यांच्या हातीं एक मोठी ठेव लागली. ती घेऊन ते दोघेहि काशी क्षेत्राला गेले. तेथें नागभट्ट नांवाच्या विद्वानाला बोलावून घेऊन त्याला आपला सबंध मूळ वृत्तांत निवेदन केला. तो ऐकून त्यानें "तुम्ही जन्म घेतलेली जमीन नीच जातीची असली तरी त्या जमिनींत पेरलेलें बीं क्षत्रिय बीज असल्यामुळें तुम्ही उपनयनास पात्र आहां" असें बोलून त्यांना भारद्वाज गोत्रज म्हणून उपनयन संस्कार करून पाठवून दिलें. पुढें हे क्षत्रिय वंशीय रजपुतांना भाऊबंद होऊन प्रसिद्धि पावले आणि शिवाजी व संबाजी हे दोघेही स्वतंत्रपणें वजीर म्हणवून घेऊन नांदूं लागले.

पुढें त्यांच्या वंशपरंपरेंत हरिजी जन्मला. त्याचा मुलगा नेतोजी. त्याचा मुलगा शाजी. त्या शाजीला शिवाजी व येकोजी असे दोघे पुत्र जाहले. या दोघां मुलांपैकीं, शाजीची ज्येष्ठ पत्नी जिजाबाई इच्या कुशींत जन्मलेला कुमार तो शिवाजी व कनिष्ठ पत्नीच्या ठायीं झालेला तो येकोजी असें जाणावें. येकोजीला तीन पुत्र जाहले ते असे; शाजी, शरभजी व धाकटा तो तुक्कोजी. शाजीचा मुलगा जो शिवाजी त्याला दोन मुलगे; (१३९) संबाजी हा थोरला मुलगा, रामराज हा धाकटा. शिवाजीच्या या दोघां मुलांपैकीं संबाजी हा शिवाजीची ज्येष्ठ पत्नी जिवाबाई (एका प्रतींत जिताबाई) हिच्या पोटीं निपजला. त्याची कनिष्ठ पत्नी जाधवरायाची पुत्री ताराबाई इच्या पोटीं रामराज हा जन्मला. हा रामराजच राजेराम म्हणून प्रसिद्धि पावला. त्या संबाजीला साहूराज नांवाचा मुलगा जाहला. संबाजीचा भाऊ जो रामराज त्याला दोन पत्नी. त्यापैकीं थोरल्या स्त्रीचे ठायीं शिवाजी व धाकटीचे ठायीं संबाजी असे कुमार झाले. त्या संबाजीला दोन मुलगे.

आतां दिल्लीवर राज्य करणाऱ्या तुरुष्कांच्या वंशाचा तपशील सांगतों तो असा.

दिल्ली ही पूर्वीं हस्तिनावती होती. दुर्योधनानंतर धर्मराजानें येथें राज्य केलें. त्याच्यानंतर परीक्षित महाराजानें राज्य केलें. त्याच्या मागून जातीनें क्षत्रिय असलेल्या कांहींनीं राज्य केलें. त्यांच्या पश्चात् कांहीं नांवाच्या क्षत्रियांनीं राज्य केलें. तदनंतर मिश्र जातीयांनीं राज्य केलें. पुढें रजपुतांच्या संततींत उत्पन्न झालेला जयचन्द्र राजा यानें राज्य केलें. त्याच्या पाठीमागें त्याचा वंशज अनंगपाल यानें ३६ वर्षे व पृथुराज यानें ६ वर्षे असें दोघांनीं मिळून एकंदर ४२ वर्षे

राज्य केलें (१४०). मग पठाण जातीच्या राजांचें राज्य आलें. त्यांच्यामध्यें सुलतानानें ४० वर्षें; सुलतान शहमोदीन यानें २७ वर्षें ७ महिने; शहासुद्दीन घोरी २० वर्षें १० महिने; सुलतान फेरोदशाह १० वर्षें ७ महिने; याची पत्नी शहा मसूदा बीबी पाजी ७ वर्षें ६ महिने; शहा मैनुद्दीन ७ वर्षें १ महिना; मघुदनशहा रणति (?) ५ महिने; नसीमदीन घोरी ३० वर्षें ६ महिने; गयासुदीन घोरी २२ वर्षें ४ महिने; शहा कुतुब घोरी ३ वर्षें ८ महिने; शाहा नसीमदीन घोरी ६ वर्षें ५ महिने; शहा अल्लावुद्दीन ५८ वर्षें ४ महिने; शहा कुतुबुद्दीन ४८ वर्षें ३ महिने; शरशाहा सुर (?) ६ वर्षें ८ महिने, एकूण पठाणांनीं राज्य केलेलीं वर्षें २१०.

त्यानंतर मोगलांचें राज्यः—सुलतान कुम्रु ८ वर्षें ६ महिने; सु. पेरोदशहा खतनु पातशहा ३८ वर्षें ५ महिने; महम्मदुल्ला नसलक ६ व. ६ म.; या महम्मदुल्ला नसलक पातशहानें चामडीचीं नाणीं चालविलीं. त्याच्यानंतर शहा सुलतान महम्मुद तोबर १२ व. ५ म.; शामायि यासन (?) १ व. ४ म.; सुलतान हम्मीर २० व. १० म.; सु. बाहिलोल लूदी ३८ व. ५ म.; शिखेंद्र लोदी २८ व. ३ म.; विभराम लोदी १० व.; बाबर पातशहा ४ व. १० म.; हम्मावु १४ व. २ म.; एकूण वर्षें १८४.

त्यानंतर इकडे फारच प्रख्याति पावलेल्यांमध्यें फकीरेश्वराच्या कृपेनें तक मिळविलेला तिमिरालिंग २७ व. ८म.;(१४१)बाबर लंग ७ व. ९ म.; सरीमशहा नांवें शेरुशहा ८ व. १० म.; मसूरशहा शरीरमन (?) १ म.; शहाहम्मावु ९ म.;मसूर-शहा जलावुद्दीन ५० व. १ म.; जहंगीर २० व. १ म.; शरजान् ३२ व. अवरंगजेब ५२ व. ६ म.; शहाअल्ली ५ व. ५ म.; फरसाह २ व. ६ म.; तदनंतर मौजदीन २ व. ११ म.; अंज मौजदीन १ व. १० म.; फरक्षाह ३ व. महमुद्द अंज राजदीन १ व. ६ म.; एकूण २१८ वर्षें व ९ महिने. येणेंप्रमाणें शालिवाहन शक वर्षें १६५ च्या शार्वरी सं. मार्गशीर्ष ३० पर्यंत राज्य केलें. अशा प्रकारें आरंभापासून दिल्लीवर राज्य केलेल्यामध्यें इकडे सुलतानापासून वंशपरंपरेचा तपशील तो असा जाणावा. त्यांचीं त्यांचीं चरित्रें पद्यरूपानें सांगतों तीं येणें प्रमाणें.

दिल्लीवर राज्य केलेल्या तुरुष्कांचा क्रम कथतों. आधीं सुलतान. इकडे फकीरेश्वराच्या कृपेनें तिमिरालिंग यानें राज्य केलें. तिमिरालिंग नंतर बाबर, हम्मावु, अकबर, [ जांगीर शर ] जान, अवरंगजेब, बहद्र परकशहा व महमुदशहा. त्यांच्यामधील त्या सुलतानानें कपिलरायाचा कुमार जो कुमारराम त्याची सेना (१४२) ठार करून शोभायमान अशा अवनी मंडळाचें राज्य केलें. पुढें तो त्रिवेणीमध्यें बुडून मेला. पुढें या लोकीं अकबर होऊन जन्मला. त्याला जन्मांतरीची स्मृति होती. त्यानें भुजबळानें दिल्लीचें

पालन केलें. यानें सुंदर असें यश व विक्रम यांनीं विराजणारा ओरुगल्लाचा अधिपति वीर प्रतापरुद्र राजाला कैद केलें. ढुम्मीच्या यवनाधीशाची खोड मोडून त्याची वकीली रद्द केली.

ह्या अकबर पातशहाच्या वंशामध्यें जन्मलेला अवरंगजेब पातशहा आपला अग्रज दाराशहा याला ठार करून सिंहासनावर बसून राज्य करूं लागला. अवरंगजेब पातशहानें मोठ्या पराक्रमानें संग्रामामध्यें बावन पातशहांना पराभूत करून अवनी मंडलावर एकछत्री राज्य चालविलें. अवरंगजेबाला रजपूत स्त्रीपासून अकबर नांवाचा पुत्र, मोंगल स्त्रीपासून शहलम नांवाचा मुलगा व बेगम नांवाची मुलगी, मुसलमान स्त्रीपासून अजमतार नांवाचा पुत्र आणि गुजराती कुरुकी रखेली पासून ( १४३ ) कामबक्स नांवाचा मुलगा अशी संतति झाली.

एकदां अवरंगजेब दरबारांत बसला असतां, त्यानें अकबर नांवाच्या कुमाराला आपल्याजवळ बोलावलें व आपल्या हातांत धरलेली पट्टीची तीक्ष्ण तलवार त्याच्या हातीं देऊन ‘ ही कशी आहे पहा ’ म्हणून सांगितलें. तेव्हां तो घाबरून जाऊन उभा राहाण्यास समर्थ न होतां थरथरा कापूं लागला. तें पाहून तक्त चालविण्यास हा अपात्र आहे असें मनांत आणून त्यानें त्याचा तिरस्कार केला. तेव्हां तो निस्तेज होऊन गुजरात देशांत निघून गेला.

मग राहिलेले अजमतार, कामबक्स, शहालम हे कुमार व बेगमु नांवाची कुमारी यासह तो सुखानें राहूं लागला. शहलम नांवाच्या कुमाराचें तेज, बल व पटुत्व यावर खूष होऊन त्यानें भादुर्शाह असें त्याचें दुसरें नांव ठेविलें. त्या शहलमास तीन पुत्र झाले. त्यांचीं नांवें अनुक्रमें, अजमुद्दीन, मौजदिन व रफेल-शहा. नातू रफेलशहा याचें दुसरें नांव बुलंद कथर (?). अजमुद्दीनाच्या मुलाचें नांव फरकशहा. अजमतार याच्यापासून उत्पन्न झालेल्या नातवाचें नांव दिवाबोंक्स (?). याप्रकारें अवरंगजेब पातशहाला मुलगे, नातू व पणतू अशी संतति झाली.

त्याचा मामा शास्ताखान व फेरोजंग या दोन नांवांनीं प्रसिद्धि पावलेला होता. तो शाब्जीखानाचा मुलगा. निजाम याचा मंत्री असतखान. त्याचा मुलगा जुलुपरखान. याशिवाय शेखु निजाम,रगटि बल्लूलखान इत्यादि त्याला (अवरंगजेबाला) वजीर होते. गाजदीखान चिक्लीसखान याच्याकडे दक्षिणेंतील राज्याचा अधिकार देऊन, आपल्याकडे राज्याचा मोठा भार ठेवून घेऊन तो विचारपूर्वक वर्तत असे. त्यानें आपल्या नांवें औरंगाबाद नांवाचें शहर बांधलें. तो आपलें व दुसऱ्याचें कोणतेंही मत असो, त्या त्या शास्त्रांचीं मर्में ऐकी. मंत्रशास्त्राचा संग्रह करी. मुल्लाशास्त्राचें विवेचन श्रवण करी. याप्रकारें सुखसंकथाविनोदगोष्टींत कालक्रमण करीत राज्य करीत होता ( १४४ ).

आतां पुढें सांगण्यांत येणाऱ्या कथेचा संदर्भ कळावा म्हणून गीजगनुहळ्ळी ( विजापूर ) संस्थानावर राज्य करणारे पातशहा यांचा वृत्तांत सविस्तर निवेदन करतों.

पहिल्या प्रथम परमेश्वरकृपेनें संस्थानचा अधिपति झालेला शहा मूर्तजा अल्ली वर्षे; त्याचा धाकटा भाऊ शहा नदीमुल्ल वर्षे ; नंतर फकीरसाहेब ( दुसरें नांव दर्वेसि ) पातशहा वर्षे ; मग अल्ला येदुल शहा वर्षे ; त्याच्यानंतर सुलतान महमुद वर्षे ; पुढें सुल्तानी शिखींद्र वर्षे ; एकूण वर्षे . या शिखींद्राच्या कारकीर्दींत शालिवाहनशक वर्ष ; क्षय संवत्सरीं हें विजापूर संस्थान, पुढें सांगण्यांत येणारें गोलुकोंडें ( दुसरें नांव भागानगर ) संस्थान हीं दोन संस्थानें, पूर्वोक्त आरे यांच्या ( मराठ्यांच्या ) वंशांत जन्मलेला शाजी याचा सुत शिवाजी याला वठणीस आणावा म्हणून आलेला दिल्लीचा पातशहा अवरंगजेब याच्या हस्तगत झालीं. हा वृत्तांत पुढें येणार आहे. आतांच वर्णिलेल्या विजापुर संस्थानावर राज्य केलेल्या तुरुष्कांचीं नांवें पद्यरूपानें सांगतों.

शहा मुर्तुजा, नादियमुल्ल, पकीरशहा, अल्लीयेदुल व विभ्रम येदुल पातुशाह असे पांच. बाकी राहिले ते चार. ह्यांचीं नांवें क्रमानें कथितों. सुलतान महमुद, येदुल शहा, बडे साहेबीण व सुलतान शिखींद्र ( १४५ ).

शहा नदीमुल्ल हा शहा मूर्तजा याचा धाकटा भाऊ. साहसी पकीरसाहेब हा शहा मूर्तजाअल्लीचा पुत्र. अल्ली येदुलशहा हा पकीरसाहेबाचा पुत्र. विभ्रम-येदुशलहा हा अल्ली येदुलशहाचा कुमार. सुलतान महमुद हा विभ्रम येदुलशहाचा मुलगा. बडे साहेबीण ही सुलतान महमुदाची पत्नी. अल्ली येदुलशहा हा बडे सुलतानाच्या रखेलीचा मुलगा. सुलतान शिखींद्र हा अल्ली येदूलशहाचा पुत्र. येणेंप्रमाणें शहा मूर्तजा अल्ली यापासून आरंभ होऊन सुलतान शिखींद्रापर्यंत विजापूरचे तक चालविलेले पातशहा होत.

यांपैकीं विभ्रामल्ली येदूलशहाचा बाप अल्ली येदूलशहा. यानें विवाह केलेल्या स्त्रिया त्या अशा. देवगिरी ऊर्फ दौलतावाद संस्थान खालील अमदानगराच्या निजाम पातशहाची मुलगी. तिचें नांव ........विभ्राम येदुलशहाचा पुत्र सुलतान महम्मदशहा. याच्या मंत्र्याचें नांव थोरला खवासखान. या राजाचा अधिकारी ( नियोगी ) कारकून तो मुरारि जगदेवपंत. या मुरारि जगदेवपंतानें सुलतान महम्मदशहा याचा गोलकोंडयाचा कुतुबशहा याच्या बडे साहेबीण नांवाच्या कन्येशीं विवाह घडवून आणला. या बडे साहेबिणीच्या (१४६) मुलाचें नांव.....या सुलतान महम्मदशहानें बडे साहेबीण इच्या शिवाय नवरसनारी नांवाच्या वेश्येचा अंगीकार केला होता. तिच्या पोटीं जन्मलेल्या मुलाचें नांव

अल्ली येदुलशहा. या अल्ली येदुलशहाच्या सुलतानाचा शेवटचा वझीर पत्तेखान याच्या कन्येशीं विवाह झाला. या पत्तेखानाच्या कारकुनाचें नांव काशीपंत.

याप्रकारें वागत असतां सुलतान महमुदशहा याला रोगाचा प्रकोप झाला. तेव्हां त्यानें आपला व्याही पत्तेखान याला बोलावून घेऊन हितगुज केलें व 'तुला एवढें वैभव कसें प्राप्त झालें' म्हणून विचारलें. यावर त्यानें आपला कारकून काशीपंत याच्यामुळें लाभलें म्हणून सांगितलें. तेव्हां पातशहानें त्या काशीपंताला जानंतराय असें दुसरें नांव ठेवून, दवलत देऊन, फार मेहरबानगी करून ठेवून घेतलें. पुढें प्राणोत्क्रमण काळ आला. तेव्हां पातशहानें जानंतराय यास आपल्याजवळ बोलावून घेतलें व आपण बाळगलेली वेश्या नवरसनारी हिच्या मुलाला संस्थानचा राज्याधिकार देववून पुढें चालवावें असें त्याच्याकडून आश्वासन घेऊन प्राण सोडला.

मग जानंतरायानें यापूर्वीं स्थलभ्रष्ट होऊन निघून गेलेल्या बडे साहेबीण इच्या मुलाला बोलावूं पाठविलें. "तुम्हांला राज्य देऊन तुमचा अधिकार चालवूं. अल्ली येदुलशहाची व तुमची भेट घडवितों. मनस्संकोच घालवून देऊन एकमेकांशीं सलोख्यानें वागावें असें करूं. पातशहात तुमच्याकडे चालेल असें करूं. लवकर निघून येणें" असा पत्रीं मजकूर लिहून पाठविला. तो निघून आला. त्याला राजधानीच्या जवळ बोलावून आणलें. त्याच्या परिवारांत असलेले वजीर, उमराव, कारकून यांना खूप लांच चारून आंतून फितवून घेतलें. मग अल्ली येदुलशहा यास बोलावून "भेटीच्या वेळीं तुम्ही जेव्हां आलिंगन द्याल त्या वेळीं बिलकुल न भितां तुमच्या (१४७) हातांत लपवून ठेविलेल्या छोटया खंजिरानें त्याचें बोट छाटून टाका" असा उपदेश करून ठेवला. पुढें त्या दोघांची भेट झाली. पूर्वसंकेताप्रमाणें त्याचें बोट कापलें गेलें. मग त्याच्या परिवारांतील वजीर, उमराव, कारकून यांना वश करून घेऊन अल्ली येदुलशहाला राजपद बांधलें.

मुरारि जगदेवपंत यानें बडे साहेबीण हिच्याबरोबर निष्ठुर भाषण केलें. आणि या कारणासाठीं त्याला प्राणांस मुकावें लागलें. त्यानंतर जानंतरायानें फितुरीच्या आरोपावरून खवासखान याचा वध करविला व स्वतःच प्रमुख होऊन पातशाही अधिकार चालविला. पुढें या अल्ली येदुलशहाचा मुलगा सुलतान शिखींद्र याला राज्यपद मिळालें. या सुलतान शिखींद्राच्या कारकीर्दींत धाकटा खवासखान याचें प्राबल्य होतें. या विजापूरच्या पातशहाचें हिरवें निशाण हें राजचिह्न होतें. येथवर विजापूर येथें राज्य केलेल्या पातशहांचा वृत्तांत कथन केला.

आतां गोलुकोंडे म्हणजे भाग्यनगरीमध्यें (भागानगर) राज्य केलेल्या पातशहांचा वृत्तांत कथन करतों.

आधीं चांदीन मल्लीक याचा पुत्र खोदाखंड मल्लीक विश्राम. याचें एका ब्राह्मण स्त्रीवर प्रेम जडलें. तिचें नांव भागीरथी. तिनें आपल्या नांवानें त्या नगराचा पसारा वाढविला. तेंच भागानगर या नांवानें प्रख्यात जाहलें. मल्लीक विश्रामाचा पुत्र मुद् खुल्ली. त्याचा पुत्र महमुद् खुल्ली. त्याचा मुलगा सुलतान अबदुल. त्याचा जांवई सुलतान अबदुल हसन पातशहा. त्याचा मुलगा लतेब. त्याचा मुलगा थोरला कुतुबशहा. त्याचा मुलगा धाकटा कुतुबशहा. त्याच्या मागाहून खोदाखंड याच्या मुलीचा मुलगा तानाशहा. पिवळें निशाण हें या भागानगराच्या पातशहांचें राजचिह्न.

देवगिरि म्हणजे दवलताबादच्या संस्थानाखालील अमदानगर संस्थानावर राज्य केलेल्या पातशहांचा वृत्तांत सांगतों (१४८).

आधीं निजाम पातशहा. त्याचें राजचिह्न पिवळें निशाण. बिदिरें (बिदर) संस्थानचा राजा बरीद् पातशहा. तांबडें निशाण ही त्याची खूण.

सग (!) याला उपरण्याचें निशाण ही खूण. त्याचा अधिपति हसन गंगू बोम्मण्ण पातशहा.

येणेंप्रमाणें दिल्लीपासून त्या त्या संस्थानावर राज्य केलेल्या पातशहांचा वृत्तांत कथन केला. आतां पूर्वकथेच्या संदर्भाकरितां हरिजी वगैरे आरेय (मराठे) यांचा वृत्तान्त काय, ते कसे होते, कसे वाढले याची सविस्तर हकीकत सांगतों.

हरिजी हा अमदानगरच्या राजाच्या पदरीं वजीर म्हणून राहात होता. पुढें त्याचा पुत्र आपल्या मुलाबरोबर विजापूरला निघून गेला. नेतोजी व शाजी हे विजापूर पातशहाचे अत्यंत मर्जीतले वजीर होऊन आरेय (मराठे) जातींमध्यें बलिष्ठ असा लौकिक संपादून सुखानें राहिले. अशा रीतीनें प्रसिद्धि पावलेले नेतोजी व शहाजी यांना विजापूर प्रांतांत जावलि म्मारालि (!) नांवाचें गांव कायम इनाम म्हणून मिळालें होतें. ते तेथले अधिकारी म्हणवीत. त्यांनीं त्या गांवाला सुस्थितीस आणलें. त्यांनीं अप्पाजीपंत नांवाच्या आपल्या एका माणसास त्या गांवांत ठेवलें व आपण दोघेहि पातशहाची मर्जी संभाळून त्याच्याजवळ शस्त्रोपजीवि होऊन राहिले.

एके दिवशीं नेतोजीचा मुलगा शाजी हा आपला मुलगा शिवाजी याजबरोबर पातशहाच्या सेवेसाठीं त्याच्या वाड्याकडे येत असतां, वाटेंत पातशहाचा तुरुष्क वजीर गोवध करवीत होता (१४९). शिवाजीनें तें पाहून आपले वडील शाजी यास दाखवून, "अशाप्रकारें गोवध करीत असलेल्या यांना पाहून शिक्षा न करतां उगाच राहणें अयोग्य होय" असें म्हटलें. यावर शाजी म्हणाला, "हा वजीर पातशहाचा अत्यंत प्रीतिपात्र आहे. याला जर आपण

शिक्षा केली तर आम्ही पातशहापासून दूर होऊं. जात्यभिमानानिमित्त बलवानाशीं विरोध संभवेल व आम्हास स्थानभ्रष्ट व्हावें लागेल." तेव्हां शिवाजी पुन्हां बोलला, "कांहिंहि होवो, अशा रीतानें दुष्ट कृत्य करणाऱ्याला मी शिक्षा केल्याशिवाय राहणार नाहीं."

असें बोलून शिवाजीनें त्या वजीरास बोलावून "अशा प्रकारचें दुष्ट कृत्य करूं नकोस" असें क्रोधानें गरजून बजावलें. त्यानें त्याच्या ह्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. तेव्हां प्रकरण हातघाईस येऊन त्या दोघांमध्यें युद्ध जुंपलें. पुढें ही सर्व हकीकत पातशहाच्या कानावर गेली. तेव्हां पातशहानें जात्यभिमानानें त्या वजीराचा पक्ष घेतला. शाजी व शिवाजी यांस बोलावून तो त्यास क्रोधानें संतापून टाकून बोलला.तें मनांत सांठवून शिवाजी घरीं आला. "बलवान शूरांशीं विरोध करूं नये" म्हणून अनेक प्रकारें समजावून सांगितलेलें शाजीचें बोलणें शिवाजीनें मुळींच मानलें नाहीं व "तुम्हांस पाहिजे असेल तर तुम्ही एकोजी बरोबर पातशहाची मर्जी राखून सुखानें राहावें" असें कोपावेशाचें निष्ठुर उत्तर दिलें.

पुढें शिवाजी आपला पिता शाजी याच्या सांगण्याप्रमाणें न वागतां तेथून निघाला व जावुरिमावुरि नांवाच्या स्थळाला जाऊन पोंचला. तेथें त्यानें आपलें बल वाढवून घोडेस्वारांचें मोठें सैन्य जमविलें व स्वसामर्थ्यानें विजापूरच्या पातशाहाच्या राज्याचा सत्यानाश केला. त्यानें चंदन, वामन, पुरंदर, पन्नाळि (ळा), परशुराम, वसंत, वंदन, रिंगिणी, लेखिनी, या नांवांच्या सुप्रसिद्ध गडांना हस्तगत केलें (१५०). याशिवाय त्यानें भूतळांत आश्चर्यकारक म्हणून गणले गेलेले सातारा, पाळ्य व राहिरि हे विख्यात गड पराक्रमानें जिंकून घेतले.

अशा प्रकारें हे आणि इतर गड जिंकून घेऊन, अनेक राज्यें हाताखालीं आणून व स्वप्रतापानें डोईजड होऊन वागणाऱ्या शिवाजीचा पराक्रम विजापूरच्या पातशहानें ऐकला. त्यानें शाजीला बोलावून घेऊन क्रोधानें, "तुझ्या मुलास बोलावून आण. नाहीं तर त्याला धरून आणून शिक्षा करीन" असें सांगितलें. यावर शाजी बोलला "तो माझ्या वचनांत नाहीं. मलाही वैरी होऊन वर्तन करीत आहे." हें उत्तर ऐकून पातशहानें सैन्य जमवून त्याला पकडून आणण्यासाठीं पाठविलें. शिवाजीनें आपल्याला पकडण्यासाठीं आलेला वजीर अबदुलखान यास भेटीच्या प्रसंगीं 'आंतील नख' (ओळ उगूर) नांवाच्या आयुधानें ठार केलें.

विजापूरचा पातशहा हें वर्तमान ऐकून अत्यंत संतप्त झाला. "आमच्याशीं गनीम होऊन वागत असलेल्या तुझ्या मुलाला धरून आण" असें त्यानें शाजीला बजावून मोठी फौज देऊन पाठविलें. शिवाजी व शाहाजी यांची भेट झाली.

शिवाजी, शाजीला फसवून पंगुळीच्या गडाला जाऊन राहिला. त्यानें खूप सैन्य जमविलें व आणखी कांहीं प्रदेश व गड जिंकून फार प्रबळ होऊन वर्तूं लागला. इकडे शाजी आपल्या मुलाला आटोक्यांत आणणें शक्य झालें नाहीं म्हणून लज्जित होऊन परतला. फिरून विजापूरला जाणें त्याला बरें वाटलें नाहीं. आपला पुत्र एकोजी याजबरोबर कोणाला न कळवितां तो निघून गेला. सुखरूपपणें रहावयाला त्याला आपलें म्हणून एकही स्थळ नव्हतें. म्हणून त्यानें मधुरे ( मदुरे)च्या राज्यांतील चंदीगड व चंदावर हे किल्ले हस्तगत करून घेऊन तेथें आपला धाकटा चिरंजीव एकोजी यासह ( १५९ ) कांहीं दिवस वास केला. पुढें तो आपल्या मुलास तेथेंच ठेवून आपण परत विजापुराकडे निघाला. वाटेंत रोगपीडित होऊन शीरेच्या प्रांतांत निधन पावला.

त्यानंतर शिवाजी आणखी अनेक प्रदेश व खजिना हस्तगत करीत दिवसेंदिवस फारच बलिष्ठ होऊन वागूं लागला. त्यानें दिल्लीच्या अवरंगजेबाचीं खेडीं व गुरें ढोरें हिसकून घेतलीं. त्याच्या मुलखांतील विस्तृत असे गड व प्रदेश जिंकून घेतले. आपल्या राज्याला होत असलेली ही पीडा थांबवण्याकरितां अवरंगजेबानें आपला मामा शास्ताखान यास ' शिवाजीला धरून आणा ' असें सांगून पाठविलें. कसलेला शूर अशा त्या शास्ताखानानें, सैन्यासह त्वरेनें निघून पन्हाळी गडाला वेढा दिला. तेव्हां शिवाजी रात्रीच्या वेळीं एकटाच त्याच्या गोटांत शिरला. त्यानें सुरीनें त्याचें बोट छाटून टाकलें. तेव्हां तो फार भयभीत होऊन सेनेसह घाईनें दिल्लीला निघून गेला.

शास्ताखानानें अवरंगजेबाची भेट घेऊन त्याला आपलें बोट दाखविलें ( १६२ ). यावर कल्पांतकालीन यमाप्रमाणें क्षुब्ध झालेला तो यवनाधीश आपल्या वजीराकडे पहात गर्जूं लागला. त्यानें जयसिंगाला बोलावून, " तूं येथून लवकर नीघ व त्या शिवाजीला कैद करून आण जा." असें बजावून पाठवून दिलें. मोठें सैन्य घेऊन जयसिंग चालून आला व त्यानें पन्हाळीगडाला वेढा दिला. शिवाजीनें बाहेर येऊन त्याची भेट घेतली. जयसिंगानें शिवाजीचा हात धरला तेव्हां शिवाजी किंचित् हांसून म्हणाला "माझा हात धरण्याची ताकद असेल तर धरा, नाहीं तर नको. " यावर जयसिंग बोलला " एकदां हात धरल्यावर सोडणारा मी नव्हे." तेव्हां शिवाजीनें उत्तर केलें " असें असेल तर ठीक आहे, मी तुमचं बोलणें कबूल करतों. "

मग शिवाजी आपला पुत्र संबाजी यासह थोडेसें सैन्य बरोबर घेऊन दिल्लीला गेला. तेथें त्यानें अवरंगजेबाची भेट घेतली. तेव्हां त्यानें अहेर व विडा देऊन याचा सत्कार केला व परत आपल्या बिऱ्हाडीं पाठवून दिलें. पुढें अवरंगजेबानें त्याच्याकडे शिधा, सामग्री इत्यादि सर्व प्रकारचा संभार पाठवून, याच्या-

वर नजर ठेवण्यासाठीं कब्जी असें प्रतिनाम असलेला कवी कळस याला नेमलें व चौकी पहारे बसविले.

अशाप्रकारें शिवाजी संबाजीबरोबर तेथें कांहीं दिवस राहिला. त्यानें युक्ति-प्रयुक्तीनें हळूं हळूं कवि कळस यास वश करून घेतलें. "मला आपल्या राज्यांतील वजीर उमराव यांना भेट व अहेर करावयाचे आहेत" असें सांगून पातशाहाची परवानगी मिळविली. लहान मोठ्या पेट्या आणविल्या. त्यांमध्यें तांदूळ उडीद, मूग, गहूं इ. सर्व धान्यें, नानाप्रकारचीं फळें, परिमळादि द्रव्यें, तांबूल, सुंदर कपडे, इत्यादि पदार्थ भरून सेवकांच्या हातीं एकेका दिवशीं एकेका वजीराच्या घरीं पाठवून देण्याचा क्रम ठेविला (१५३). या पद्धतीनें चांगला विश्वास बसविला. पुढें एके दिवशीं शिवाजी आपण निजावयाच्या बिछान्यावर लांबट असा एक लोड निजवून देऊन, उशी ठेवून, आपण पांघरलेलें वस्त्र त्या लोडावर घालून, पहाणाऱ्यांस आपण नेहमींप्रमाणें निजलेले आहों असा भास उत्पन्न करून आपण एका पेटींत बसला व आपल्या मुलास दुसऱ्या पेटींत बसवून बाहेर पडला. पूर्वीं भेटीच्यावेळीं हात धरून दिलेला विश्वास आठवून जयसिंगाच्या घराला गेला. तेथें फकीराचा वेष धारण करून निघाला. संबाजीनें "वेश बदलून पन्हाळीला जा, सर्व बाबतींत फार दक्षतेनें वागावें" असें सांगून वाटेस लावलें.

परदेशी, फकीर, जोगी, जंगम इत्यादि निरनिराळे वेष घेऊन शिवाजी देशसंचार करीत निघाला. त्यानें काशीक्षेत्रीं जाऊन वाराणसींत स्नान करून मोठ्या भक्तीनें विश्वेश्वराचें दर्शन घेतलें. पुढें गयेला जाऊन तेथें करावयाचे विधि केले. आरेयांचा हा राजा तेथून निघून गोलकोंड्याला जाऊन पोंचला. अक्कण्ण मादण्ण यांच्याकरवीं तेथील पातशहास सांगून पाठविलें. राजवाड्यांत जाऊन त्या यवनपतीची भेट घेतली. तेथें त्याला त्याजकडून अनेक मानसन्मान मिळाले. भागानगरीहून निघालेला शिवाजी पन्हाळीला पोंचला (१५४) व पूर्वीपेक्षां फारच प्रबळ होऊन वर्तूं लागला.

इकडे दिल्लींत काय घडलें तें पाहूं. शिवाजीच्या पहारेकऱ्यांना शिवाजी नाहीं असें कळून आलें तेव्हां त्यांची घाबरगुंडी उडाली. त्यांनीं तें वर्तमान अवरंगजेबास कळविलें. "अरेच्या, हा मराठा आम्हांला दगा देऊन निसटला अं! तो कोठें गेला हें लवकर शोधून काढा" असें ओरडून त्या ताम्रमुखाच्या अधिपानें हेर व मोठें सैन्य पाठविलें. त्यांनीं हिंडून हिंडून चोहोंकडे त्याचा शोध केला. गयेहून निघून शिवाजी पन्हाळीला जाऊन पोंचला ही बातमी त्यांना मिळाली.

हें ऐकून तो तुरुष्कपति क्षुब्ध झाला. " त्या शहाजीच्या पोरास पकडून चांगल्या बंदोबस्तानें आमच्याकडे पाठवून द्या " असा त्यानें विजापूरकरास निरोप पाठविला. यावर त्याला उडवाउडवीचें उत्तर मिळालें. तेव्हां अवरंगजेबानें लगेच वजीरांना बोलावून फौज जमविली. संतापानें त्यानें आपल्याशीं असा विचार केला " विजापूरचा पातशहा विश्राम अल्ली येदुलशहाचा पुत्र सुलतान महमुद्दशहा याला गोलकोंड्याचा कुतुबशहा याची पुत्री बडे साहेबीण दिला दिलेलें आहे. यामुळें विजापूर व भागानगरीचे पातशहा एकमेकांचे व्याही होऊन स्नेहानें वागत आहेत. त्यांची फूस असल्यामुळें शिवाजी बलिष्ठ होऊन मला न जुमानतां वर्तन करीत आहे. या दोन्ही राज्यांचा पाडाव केल्याशिवाय हा शिवाजी माझ्या आटोक्यांत येणार नाहीं " (१५५).

असा संकल्प करून " दक्षिणेकडे जाऊं नकोस " असें शास्तेखान मामांनीं सांगितलेला उपदेश लक्ष्यांत न घेतां अवरंगजेब पातशहा दिल्लीहून निघाला. त्यानें अवरंगाबाद् येथें तळ देऊन भली मोठी चतुरंग सेना एकत्र केली. तेथून कूच करून विजापूर किल्ल्याला वेढा देवविला. चोहोंकडच्या वाटा, खोरीं, खिंडी या सर्वांचा बंदोबस्त केला. तळास सुरुंग लावले. अशा प्रकारें अनेक उपाय योजून फार दिवसपर्यंत लढा चालविला. पण भागानगर संस्थानचा सर्वाधिकार आपल्याकडे वाहून घेऊन कारभार चालवीत असलेले अक्कण्ण व मादण्ण या कसलेल्या मुत्सद्यांकडून वेळोवेळीं पोंचत असलेल्या मदतीमुळें कांहीं केल्या तो किल्ला लवकर हस्तगत होईना. तरी हट्टास पेटून दहा वर्षेपर्यंत नेट धरून सैन्याचा तळ हालविला नाहीं. अधिकाधिक जोर करून वेढा आंवळून अनेक प्रकारचे प्रयत्न चालविले.

इतक्यांत तिकडे भागानगरांत कृष्णकारस्थानी लोकांनीं व्यूह रचून पाठविलेल्या लेखामुळें सिद्दी जातवाल्याकडून अक्कण्णमादण्ण यांचा विश्वासघातानें वध झाला. हें वर्तमान ऐकून " आतां विजापूर व भागानगर हीं दोन्ही संस्थानें माझ्या हस्तगत झालीं " अशा विचारानें अवरंगजेबास फार आनंद झाला. पुढें कांहीं दिवसांनंतर शालिवाहन शक वर्ष          च्या क्षयसंवत्सरीं विजापूराचा किल्ला सर झाला. सहाय सामग्री कांहीं नसतांही फार काळपर्यंत शौर्यानें किल्ला लढविला म्हणून खुष होऊन अवरंगजेबानें सुलतान शिकींद्र याला फार सन्मानानें वागविलें.

पुढें तेथून निघून भागानगरच्या किल्ल्याला वेढा देऊन सहा महिनेपर्यंत सैन्याचा तळ दिला. जोर करून वेढा दवडावून किल्ला सर केला. सहाय सामग्री संपूर्ण असूनही किल्ला हातचा सोडला म्हणून भागानगरच्या तानाशहाचा तिरस्कार करून तेजोभंग केला.

येणेंप्रमाणें हट्टानें विजापूर व भागानगर हीं दोन्ही संस्थानें हस्तगत केल्यानंतर अवरंगजेबानें पुढील राजकार्यांचा विचार केला (१५६). शिवाजीला मुठींत

आणलें पाहिजे म्हणून धडाडीनें तेथून कूच करून कृष्णावेणी नदीच्या कांठीं विराजत असलेल्य गलगली नांवाच्या स्थळीं ठाणें दिलें. तेथें महामारीच्या उपद्रवानें सैन्याचा फार नाश जाहला. तेथें दिवस काढणें अशक्य झालें तेव्हां तेथून उठून भीमरथी नदीच्या तीरीं शोभणाऱ्या मातुलंग क्षेत्र ( दुसरें नांव ब्रह्मपुरी ) नांवाच्या स्थळीं जाऊन वस्तीस राहिला.

आपल्या सैन्याला बुडवीत व लोटून येत असलेल्या भीमरथीचा जोर थांबवून व महामारीचा कलंक दूर करून त्यानें आपला महिमा प्रकट केला. शिवाजीचा पुत्र संबाजी यास शिक्षा करून निर्व्याजपणें त्याचा सुत शाहू याचें रक्षण केलें. तें कसें घडलें हें निवेदन करतों.

अवरंगजेब ब्रह्मपुरी येथें राहात असतां शिवाजीशीं करावयाचें राजकारण ठरवून पन्हाळीकडे येत होता. इतक्यांत इकडे पन्हाळी येथें शिवाजी निधन पावला. लगेच त्याचा थोरला मुलगा संबाजी याला राज्याभिषेक होऊन तो राज्यकारभार चालवूं लागला. पन्हाळी घेण्यासाठीं अवरंगजेब पातशाह येत आहे असें वर्तमान त्यास कळलें. तेव्हां तो आपल्या पित्याहून अधिक धडाडीनें स्वारीवर निघाला. त्यानें पातशहाच्या प्रांतांत शिरून धन, धान्य, आभरण, वस्त्रें, पशु इत्यादि सर्व वश केलें (१५७).एवढ्यावर तो थांबला नाहीं. त्यानें सगळीकडून उपद्रव आरंभिला. यावर ताम्रमुखाधीश संतापला व त्याला धरून आणण्याचा उपाय शोधूं लागला.

त्यानें असा विचार केला कीं,"हा संबाजी बलशाली होऊन वागत आहे.तेव्हां कपटप्रबंध रचल्याशिवाय हा स्वाधीन व्हावयाचा नाहीं." असा निश्चय करून त्यानें एक व्यूह योजला. त्यानें कब्जी नांवाच्या कन्नोजी ब्राह्मणाला एकांतांत आपल्याकडे बोलावलें. "संबाजीकडे जा. वाटेल तें करून त्याला वश करून माझ्याकडे घेऊन ये. चुकूं नकोस" असें सांगून व त्याला खूप पैसा देऊन पन्हाळीला पाठविलें.

कब्जी ऊर्फ कवि कळस हा पन्हाळीला आला. "सर्वविद्यासंपन्न श्रोत्रिय ब्राह्मण आला आहे" असें त्यानें जवळच्या माणसांकडून संबाजीला सांगून पाठविलें. त्यानें याची भेट घेतली. हा दिवसेंदिवस त्याला अधिकाधिक प्रीतिपात्र होऊन वर्तूं लागला. "आपल्या सर्व शत्रूंना पादाक्रांत करून त्यांनीं नेहमीं आपलीच सेवा करीत राहावें म्हणून जप पुरश्चरण व होम करतों" असें म्हणून त्याची संमति मिळविली. मग त्यानें शल्य, शाबर, मंत्र, तंत्र, यंत्र, पुरश्चरण, जप, तप, तर्पण, होम, मूलिका इत्यादि नाना प्रयोगांनीं संबाजी राजाला वश करून भ्रमिष्ट केलें. तेव्हां तो विचारवंत अशा आपल्या दरबारी लोकांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करूं लागला व नेहमीं हलकट लोकांच्या कानगोष्टींत आनंद मानूं लागला. कब्जीच्या जाळ्यांत तो पुरा सांपडून विषयलंपट होऊन जार लोकांत ( १५८ ) अग्रगण्य झाला.

याप्रमाणें संबाजी विषयोन्मत्त झाला असतां, कब्जीनें गुप्त हेरांकडून हें वर्तमान तुरुष्कपतीला कळविलें व तो येण्याची वाट पहात राहिला. इकडे अवरंगजेबानें शेकु निजाम याला बोलावून "संबाजीला धरून आण" असें सांगून गुप्तपणें त्याची रवानगी केली. शेकु निजाम फौज घेऊन निघाला व पन्हाळीला जाऊन पोंचला. तेथें त्यानें किल्ल्याच्या वाटा, खिडी, खोरीं यांची राखण करीत असलेल्या शिपायांना खूप लांच चारून कब्जीच्या संकेताप्रमाणें आंत प्रवेश केला. नेहमीप्रमाणें मदनभ्रांतीनें देहभान विसरून संगमेश्वराच्या नदीतीरीं बायांसह जलक्रीडा करीत असलेल्या संबाजी राजाला कैद करून कवि कळस याजबरोबर फार त्वरेनें अवरंगजेबाकडे नेऊन सोंपविलें. संबाजीनें आपल्याला सलाम करावा असें अवरंगजेबानें सुचविलें. पण संबाजीनें ही गोष्ट मानली नाहीं. मग त्यानें "मुसलमान झाल्यास तुला सोडून देतों, नाहींतर वधाची आज्ञा देतों" असें पुन्हां सांगितलें. यावर संबाजीनें "तुझी पुत्री बेगमु मला देत असशील तर मुसलमान होईन" असें उत्तर केलें. हें उत्तर ऐकून पातशहाच्या तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यानें संबाजी व कब्जी या दोघांचा शिरच्छेद करविला.

अवरंगजेब पुत्री बेगमु इचे संबाजीवर ( १५९ ) प्रेम जडलें होतें. पुढें ती "संबाजी हाच माझा पति" असें म्हणून दुसऱ्याचा विचारहि न करितां अविवाहितपणें राहूं लागली. तिनें संबाजीचा पुत्र शाहू राजा हाच आपला मुलगा असा अभिमान धरून तसें अवरंगजेबाला कळविलें, त्या शाहू राजाचें पालनपोषण करविलें, त्याचा विवाह करविला, दौलत दिली व सेवकसरंजाम देऊन घराण्याचा गौरव चालूं ठेविला.

इकडे संबाजीच्या मागें त्याचा भाऊ रामराज हा पन्हाळी येथें गादीवर बसला व शौर्यानें राज्यसूत्रें चालवूं लागला. हें वर्तमान यवनपतीला समजलें तेव्हां त्यानें रामराजाला पकडून आणण्यासाठीं अबदुलखानादी वजीरांना पाठविलें. हत्ती, घोडे, इत्यादिकांनीं युक्त असें तुरुष्कांचें प्रचंड सैन्य भुईवर अंधकाराची छाया पसरवीत आलें. त्यानें पन्हाळीला वेढा दिला. आतां तेथें राहणें योग्य नव्हे असा विचार करून रामराजानें तेथून प्रयाण केलें. तें पाहून यवन सेनेनें त्याचा पाठलाग केला. तेव्हां राजाराम मार्गक्रमण करून पोन्नाळीला येऊन पोंचला. त्याच्या मागाहून त्याचा पाठलाग करणारेही येऊन पोंचले. तेव्हां चन्नमाजी यांनीं तेथून त्याला पार केलें व तो चंदीस जाऊन पोंचला ( १६० ).

याचा तपशील असा : शिवाजीचा पुत्र रामराजा पन्हाळीहून पळून पोन्नाळीला येऊन पोंचला व चन्नम्माजी यांना आपल्या पलायनाची सर्व कथा निवेदन करून "मोगलांना अवगत होणार नाहीं अशा रीतीनें मला तुमच्या राज्याच्या सरहद्दींतून चंदीला पोंचून यावें" असें अनेक प्रकारें कळविलें.

तेव्हां करुणानिधि चन्नम्माजी यांनीं तें ऐकून सबनीस कोळीवाडचा बोम्मय्य, खजीनदार (बोक्कसद) सिद्ध बसवय्य आणि आपले मंत्री, मानकरी, सरदार यांजबरोबर सल्ला मसलत करून "दिल्लीच्या अवरंगजेब बादशहानें संतापून येऊन आमचें संस्थान घेतलें तरी हरकत नाहीं, पण कांहीं झालें तरी शरणागताला शत्रूच्या हातीं देणें राजधर्म नव्हे" असें मत निश्चित केलें. **रामराजाला** गुप्तवेष करवून सीमोग्गेच्या रस्त्यावरील गाजनूरची नदी उतरवून दरींत दृष्टीआड होऊन आंतल्या वाटेनें बेरे, नेडेहाल्ले, आडुवल्ली, कळस, खांडय, वसुधारे यांच्या रोखानें चालवून नेऊन चंदीच्या गडाला पोंचविलें.

इकडे अवरंगजेबाच्या हुकुमाप्रमाणें **राजेरामाचा** पाठलाग करीत असलेली तुरुष्कांची सेना मोठ्या आवेशानें **राजेराम** गेलेल्या मार्गानें धुडगूस घालीत आली. रणमस्तखान आदि वजीर पोन्नाळीला येऊन पोंचले. त्यांनीं रागारागानें "आमचा गनीम तुमच्या राज्यांत शिरला आहे, त्याला ताबडतोब आमच्या स्वाधीन करा" असें सांगून पाठविलें. यावर विचार करून चन्नम्माजी यांनीं "तो आमच्या राज्यांत आला होता हें खरें, पण निघून गेला आहे. आमच्या सत्तेखालच्या मुलखांत कोठेंहि तो आतां नाहीं" (१६१) असें कळविलें आणि मग "आमच्या राज्यांतून **रामराजा** जात असतांना त्याचे कांहीं कपडे व अलंकार आमच्या हातीं सांपडले आहेत" असें सांगून त्याचे कपडे व दागिने त्या वजीरांकडे पाठवून दिले. यावर त्या वजीरांनीं "त्याच्या वस्तु पाठवून देऊन यांनीं त्याला छपवून ठेविलें आहे" असें अवरंगजेबाला कळवून आपल्या हातीं लागलेले रुप्पाजी भोसले, संताजी जगदाब, मनोजी मोग, शरजाराऊ या चार सरदारांना व त्याच्या म्हणून सांपडलेल्या सर्व वस्तूंना त्याच्याकडे पाठवून दिलें.

अवरंगजेबानें हें सर्व पाहिलें. पत्र वाचवून ऐकिलें. तेव्हां तो रागानें लाल झाला. त्यानें "केळदि संस्थान हस्तगत करून आणा" असें सांगून आपला मुलगा अजमतार याजबरोबर मोठी फौज देऊन पाठविलें. अजमतार हा अत्यंत वेगानें देश पादाक्रान्त करीत आला. मद्गद केरेय बंडि तिम्मायि खोऱ्यांत त्यानें छावणी ठोकली. जानसरखान यास हल्ला करण्यासाठीं पुढें पाठविलें. त्यानें महादेवपुराचा किल्ला सर केला. तेव्हां लगेच अजमतार हा महादेवपुराच्या किल्ल्यांत येऊन राहिला व त्यानें जानसरखान यास पुन्हां पुढें पाठविलें. तो आनंदपुराच्या रोखानें चालून शा. श. १६१२ शुक्ल संवत्सर, वैशाखाच्या कृष्णपक्षांत वेणुपुराजवळ आला. तेथें त्यानें तळ दिला व किल्ल्याला वेढा देण्याची तयारी केली. इतक्यांत, चन्नम्माजी यांनीं तेथून निघून भुवनगिरीच्या बाहेर तळ दिला.

चन्नम्माजी यांनीं त्या ठिकाणाहून मोठें पायदळ पाठवून बिदुरूरु किल्ल्याला कडेकोट गराडा घातलेल्या मोंगल सैन्याचा (१६२) चांगला समाचार घेतला. खिंडी व खोऱ्यांचे मार्ग बंद करून माशांप्रमाणें जाळ्यांत अडकवून त्या यवन सेनेचा चेंदामेंदा करून यमाजी भास्कराच्या दरबारीं पाठवून दिलें. अशा प्रकारें चन्नम्माजी यांनीं जोर करून येऊन, तळ देऊन हल्ला करीत असलेल्या ताम्रमुखांना तोंड देऊन अनेक प्रकारांनीं संग्रामांत संहार करून, दिल्लीच्या अवरंगजेब पातशहाच्या फौजेस मागें लोटून आपलें राष्ट्र व प्रजा यांचें संरक्षण केलें.

इकडे **राम राजा** चंदीला जाऊन पोंचला. हें वर्तमान गलगलीहून ब्रह्मपुरीला पोंचलेल्या अवरंगजेब पातशहानें ऐकलें. त्यानें आपला मंत्री असत्खान याचा मुलगा जुलुपरखान याजबरोबर खूप सैन्य जमवून पाठविलें. त्यानें मोठ्या त्वरेनें येऊन चंदीच्या गडाला वेढा दिला. पुढें लवकरच त्याच्या मागून त्याला पाठिंबा म्हणून आपला पुत्र कामबक्स याला पाठवून दिलें. तेव्हां **रामराजाला** चंदीच्या गडामध्यें राहणें अशक्य झालें. तो तेथून पळाला व रांगिणीच्या गडाला पोंचला (१६३).

पुन्हां ही बातमी पातशहानें ऐकली. प्रक्षुब्ध होऊन त्यानें सातारी, पन्हाळी, वसंत, लेखिनी, चंदन, वंदन, इत्यादि गड जिंकून घेतले. पुढें रांगिणी गडाला वेढा देण्याच्या उद्योगांत असतां, दैववशात् **रामराजा** मरण पावला.

नंतर **रामराजाची** पत्नी राणी ही आपले पुत्र **शिवाजी व संबाजी** यांना पुढें करून रामचंद्रपंत यास मुख्य प्रधान नेमून राज्य चालवूं लागली. तेव्हां **राजेरामराजा** याच्या दोन पुत्रांपैकीं शिवाजी यानें मातृद्रोह चिंतिला. या कारणासाठीं तुरुंगवास भोगावा मागून तो मरण पावला. पुढें रामराजाची पत्नी पूर्ववत् **संबाजीस** बरोबर घेऊन राज्य चालवूं लागली.

तिकडे अवरंगजेब पातशहा आरेयांचा (मराठ्यांचा) मूलच्छेद केला पाहिजे अशी मसलत करूं लागला. इतक्यांत वागिनगिरी येथें राहणारा विजापुराचा तलवार पिड्डनायक हा प्रबळ होऊं लागला होता. त्यानें कामियाबखान याला पाठवून देऊन विजापुराचे कांहीं प्रांत जिंकून घेतले. तोच क्रम चालवून तो पुढें आणखी प्रदेश जिंकीत येत असतां, ही बातमी आरेयांचें (मराठ्यांचें) राज्य पादाक्रान्त करीत चाललेला अवरंगजेब यानें ऐकिली. तेव्हां तो मराठ्यांचें राजकारण सोडून आवेशानें तिकडे वळला. वागिनगिरीची नौबत ऐकून संतप्त होऊन त्यानें तो किल्ला स्वाधीन करून घेतला.

इतक्यांत अवरंगजेब पातशहाच्या देहांत रोगाचा प्रादुर्भाव झाला. तेव्हां तो अमदानगराकडे निघाला. मार्गांमध्यें व्याधिप्रकोप झाला. तेव्हां त्यानें "आपल्यामागें

आपण नवीन जिंकलेलीं राज्यें व आपलें मूळ राज्य यांपैकीं कांहींही दुसऱ्याच्या हातीं जाऊं नये, यासाठीं त्या त्या भागांमध्यें बलिष्ठ अशा अधिकाऱ्यांना नेमलें पाहिजे" असा मनांतल्या मनांत विचार केला. असा विचार करून त्यानें शहलम यास दिल्लीचा अधिकार देऊन पाठविलें. अजमतार यास उत्तरेकडच्या सुभ्याचा अधिकार देऊन पाठविलें. कामबक्स यास बोलावून त्याच्याकडे (१६४) विजापूर भागानगराचा अधिकार दिला. आपली कन्या बेगमु इच्यावरील प्रेमाखातर संबाजीचा मुलगा शाहू राजा यास आपल्या अधिकाराखालील देश व कोश यामध्यें, आपल्याकडे येणाऱ्या पैशापैकीं एक चतुर्थांशाइतका भाग मिळावा असें चौथाई (चौदायि) फर्मान लिहून दिलें. तेव्हांपासून चौथ्या हिश्शाइतका पैसा वसूल करण्याची पद्धत मराठे लोकांमध्यें प्रचलित झाली. अशी व्यवस्था करून बेगमु इच्या शुश्रूषेखालीं रहात असतां दिवसेंदिवस पातशहाच्या शरीरांत रोग बळावत चालला हें पाहून त्यानें दौलताबाद येथें आपल्याकरितां एक कबर बांधण्याची आज्ञा केली. अजिमतार यास अगदीं तांतडीनें निघून येण्याबद्दल लिहून कळविलें. अजिमतार येण्यापूर्वींच वाटेंत अवरंगजेब पातशहाचा अंत झाला. त्याचा देह दौलताबादेस नेण्यांत येऊन पूर्वीं बांधून ठेविलेल्या कबरेंत ठेवून संस्कार करण्यांत आले.

त्यानंतर अवरंगजेब पुत्री बेगमु हिनें शाहू राजावर ठेविलेले चौकी पहारे उठवून दिले. चौथाई घेण्याबद्दलचें अवरंगजेबाचें फर्मान त्याच्या स्वाधीन केलें. "आपल्या राज्यास जाऊन, तुम्ही सर्व कामांत जाणतेपणानें वर्तन करावें" असा उपदेश करून त्यास पाठवून दिलें. शाहू राजा तेथून निघून सातारी गडास येऊन पोंचला व राजारामाचा पुत्र संबाजी यासह बाळाजी विश्वनाथपंत याचा मुलगा बाजीराव, श्रीपती राम, खंडोजी दाभाडे आदि वजीरांसह सुखानें कालक्रमणा करूं लागला.

तिकडे पातशहा वारल्याची वार्ता उत्तरेंत निघून येत असलेल्या अजमतार यानें ऐकली. मग त्यानें आपला पुत्र दिवार्बोक्स यासह त्वरेनें प्रयाण करून दिल्ली येथें अधिकार चालवीत असलेल्या शाहलम यावर चाल केली (१६५). चर्मणावती (म्हणजे चंबळ) नदीच्या तीरीं उभय सैन्यांमध्यें तोंड लागून महायुद्ध जुंपलें. या संग्रामांत अजमुद्दी यानें दिवार्बोक्स याला लोळविलें. तेव्हां अजमतार व शाहलम यांच्यामध्यें घनघोर रणकंदन झालें. त्यांत शाहलमच्या पुत्रानें अजमतार यास ठार केलें. पुढें त्यानें मौजदीन याजबरोबर विजापूर व भागानगर यावर राज्य करीत असलेला कामबक्स याच्यावर चाल केली. हें वर्तमान कामबक्स

यानें ऐकून क्रुद्ध होऊन आपला पुत्र सुलतान महम्मुद यासह शाहलम याच्यावर चाल केली. भागानगराच्या प्रदेशांत ह्या दोघांमध्यें तोंड लागलें. सात दिवसपर्यंत धुमश्चक्री माजली. रणामध्यें शाहलमानें कामबक्स व त्याचा मुलगा सुलतान महमुद या दोघांचाहि वध केला. पुढें त्यानें दिल्लीला जाऊन अखंडाधिकार गाजवून एकछत्री पातशाहीपदाचा उपभोग घेतला.

शाहलमाच्या मागून त्याचा मुलगा मुजादिन्नू यानें राज्य केलें. त्याच्या नंतर त्याचा भाऊ अजमोदिन्नु हा पातशहा झाला. अजमोदिन्नू याच्या मागें त्याचा मुलगा परक्षाह याला राज्यपद मिळालें. तदनंतर मौजदिनाचा नातू महमदशहा यास सिंहासन प्राप्त झालें. येणेंप्रमाणें आरेयांचा ( मराठ्यांचा ) व तुरुष्कांचा मूल-वृत्तांत निवेदन केला ( १६६ ).

पुढें चन्नम्माजी राणिनीं सुब्रह्मण्याच्या यात्रेहून परत येऊन सुखानें वेणुपुरीं रहात असतांना, सवनीसु कोळीवाडचा बोम्मरसय्य याजबरोबर असंख्य सेना पाठवून रणामध्यें मैसूरचा सेनापति दळवायी तिम्मप्प याला हाणून त्याचा पुत्र कृष्णप्प यास कैद करून मग सोडून दिलें ( १६७ ).

चन्नम्माजी यांनीं आपल्याला प्राप्त झालेलें राज्यपद शालिवाहन शक वर्ष १५९४ च्या विरोधिकृत् संवत्सराच्या फाल्गुन शुद्ध १० पासून ( इ. स. १६७२ फेब्रु. २७ ) ईश्वरनाम संवत्सराच्या श्रावण १४ पर्यंत (इ. १६९७ जुलै २२) २५ वर्षें ४ महिने २० दिवस राज्य करून शिवपदीं विश्रांति घेतली.

दशमाश्वासम्:—

चन्नम्माजी यांच्या मागाहून शा. श. १६२० ईश्वर सं. श्रावण शु. १४ (इ. १६९७ जुलै २२ ) चन्नम्माजी यांचा कुमार हिरिय ( थोरले ) बसवप्पनायक याचें वेणुपुराच्या राजवाड्यांत राज्यारोहण झालें ( १७० ).

यानें शूर आरेयांच्या ( मराठ्यांच्या ) सैन्यास मागें परतविलें. समुद्रप्रदेशीं शोभणारा नाविलेय गड खळांना आश्रयस्थान झाला होता. बसवप्प नायकानं त्यावर निर्वाणय्य याला चन्न बसवप्प याजबरोबर सेनासमूह पाठवून त्या गडाला सर केलें व बसवराजदुर्ग असें त्याचें नांव ठेविलें.

आनंदपुरामध्यें शेखु कुंद याला रणांत पाडून यमसदनास पाठवून राज्याचें रक्षण केलें ( १७३ ).

अर्कलगोंडकरांचा प्रदेश मायावी लोकांनीं ( मैसूरकरांनीं ) हस्तगत करून घेतला होता. बसव नायकानें त्यांना जिंकून तो पुन्हां परत देवविला.

ताम्रमुखांच्या स्वाधीन झालेले पेर्बोळे व पोन्नूरचे किल्ले लढून लढून जिंकून घेतले.

मोगलांनीं घेतलेले आनेवट्टी, महदेवपूर, जडेय, होन्नाळी, मिडिजे हे किल्ले नायकानें परत मिळविले ( १७४ ).

सवणूरच्या नबाबानें मोठी फौज जमवून स्वारी केली. तेव्हां गुरुवध मंत्री यास पुढें करून युद्धामध्यें सवणूर नबाबाची खोडकी मोडून त्यास परत फिरवून लावलें ( १७५ ).

बसवप्प नायकानें एकंदर १७ वर्षे ५ महिने ११ दिवस राज्य केलें. ( १७७ )

स्वस्ति श्री विजयाभ्युदय शा. श. वर्ष १६३७ जय संवत्सर पुष्य वद्य १० ( इ. १७१५ जाने. १९ ) बसवप्पनायकाचा ज्येष्ठ पुत्र सोमशेखर नायक यास वेणुपुराच्या राजवाड्यांत राज्याधिकार प्राप्त झाला ( १७७ ).

हा राज्य करीत असतां शत्रूच्या बाधेमुळें सवणूरचा नबाब त्रस्त झाला. त्याला आपल्या राज्यांत राहणें अशक्य होऊन त्यानें आपल्यास सहाय्य करण्याकरितां विनंतिपत्र लिहून पाठविलें. तेव्हां नायकानें कोहिलेचा सिद्दप्प याजबरोबर कसलेल्या शूर सैनिकांना पाठवून शत्रूंच्या व्यूहाचा भेद करून त्यांना पळावयास लावलें ( १७८ ).

ह्या सवणूर संस्थानावर क्रमानें पूर्वी राज्य केलेल्या विजापूरच्या पातशहांचा तपशील असा:—वजीर रगटी बहूलखान; त्याचा मुलगा धाकटा बलुलखान; त्याचा मुलगा अब्दुल रहो. दिल्लीच्या अवरंगजेब पातशहानें विजापूरचें राज्य पादाक्रान्त केल्यावर अब्दुल रहो यास दिलाल असें दुसरें नांव देऊन "तुम्ही मले नाडु (घाटांचा प्रदेश) आदि दक्षिणेच्या प्रांतांवर देखरेख करीत रहा" असें सांगून नेमणूक केली. तो पुढें सवणूर येथें फार बलिष्ठ होऊन राहिला. त्या दिलालाला चौवे पुत्र:—अब्दुल महमुद्द, करीम, सतार व गफार. त्यांच्यापैकीं गफार याचा मुलगा मदीज. याप्रमाणें यांनीं सवणूर येथें राज्य केलें. याप्रमाणें प्रसिद्ध पावलेल्या सवणूरच्या नबाबाच्या वंशामध्यें जन्मलेल्या अब्दुल महमुद्दखानाच्या शत्रूंना पिटाळून लावून त्याची आपल्या राज्यांत स्थापना केली. याबद्दल सवणूरच्या नबाबानें पाठविलेला पत्ते लस्करी नांवाचा हत्ती, घोडे व अहेर यांचा नायकानें स्वीकार केला ( १७९ ).

एकदां राणोजी घोरपडे हा पैजेयल्लि खान याच्यासह मोठें सैन्य घेऊन राज्यांतील लोकांचा संहार करीत आंत शिरला. नायकानें समरांगणामध्यें त्यांचा पराभव करून त्यांना परतविलें ( १८६ ). चतुर अशा रायसद ( कारभारी ) गंगाधरय्य याच्यामार्फत पैसा ( होन ) देववून आपल्या सीमेच्या पलीकडे त्यांना घालवून दिलें.

पुढें एकदां तरीकेरेचा राजा पट्टाभिरामय्य नायक याजकडून दिवाणाबाबत द्यावयाच्या रकमेबद्दल दरदा खुली नांवाच्या वजीरानें मोठ्या फौजेसह येऊन सरहद्दीवर लूटमार केली. नंतर त्यानें तरीकेरेस येऊन फार त्रास देण्यास आरंभ केला. तेव्हां नायकानें तिकडे सैन्य पाठविलें. त्याला द्यावयाच्या रकमेबद्दल आपण हमी घेतली व त्याची फेड करविली. दरदा खुली यास परत जावयास लावून पट्टाभिरामय्य नायकाची आपल्या संस्थानामध्यें स्थापना केली.

आरेयांच्या ( मराठ्यांच्या ) व मोगलांच्या उपसर्गामुळें त्रस्त होऊन राय-दुर्गाच्या राजानें दीनपणानें नायकाकडे सहायाची याचना केली. तें ऐकून नायकानें हारोवेद्रप व नल्लूरचा लक्ष्मीपती प्रभृति मंत्र्यांना बोलावून त्या दोघांबरोबर हत्ती, घोडे आदि सैन्य देऊन पाठविलें. युद्धांत आरेयांच्या व मोगलांच्या सेनासमूहास मागें लोटून राजे लोकांमध्यें प्रसिद्धी मिळविली ( १८७ ).

पुढें एकदां दिल्लीश्वराच्या आज्ञेवरून निजामानें असें लिहून कळविलें कीं, " तुम्ही मिरिजा आद्दमखान यास काढून टाकून सीरेच्या किल्ल्यामध्यें तायरखान याला स्थापावें. " त्याला अनुसरून ( नायकानें ) सुबेदाराग्रणी लिंगप यास पाठविलें ( १८८ ). अशाप्रकारें सुबेदार रोहिले गंगाचा कोटिलिंगप्प यास धाडलें असतां, तो मोठ्या फौजेसह आला. त्यानें मायाव्यांच्या ( म्हैसूरकरांच्या ) राज्यांतील कंदुगोरे, चिकनायकनहळ्ळी येथील ठाणीं उठविलीं. मिरिजा आद्दम याच्या सहाय्याकरितां आलेल्या मैसूरकरांच्या सैन्याचा अनेक प्रकारानें संहार करून त्यास पळवून लावलें. पुढें तेथून निघून त्यानें सीरेच्या किल्ल्याला वेढा दिला. क्रोधि संवत्सराच्या आषाढ शुद्ध १२ ला ( सन १७१४ जून २३ ) सीरेचा किल्ला सर करून तेथून मिरिजा अद्दम याला घालवून लावलें व त्या ठिकाणीं तायरखान यास स्थापलें. याप्रमाणें पातशहाचें कार्य बलिष्ठ करून परत आला असतां वेणु-पुराच्या राजवाड्यांत एकसारखें तीन दिवसपर्यंत नौबदी वाजत राहिल्या. गांवांतील प्रत्येक घरास साखर वांटण्यांत आली.

नंतर शादुल्लखानाच्या फौजेसह सुबेदार लिंगप्प यास मायावींच्या ( मैसूर-करांच्या ) राज्यांत हल्ला करण्यास पाठविलें. तो पट्टण ( श्रीरंगपट्टण ) किल्ल्याच्या जवळ जाऊन पोंचला. तेव्हां त्यानीं भयभीत होऊन तडजोडीचें बोलणें पुढें केलें व खूप पैसा, सोनें, वाहनें इत्यादि वस्तूंचा नजराणा पाठविला. ही बातमी चिकलिसखान यास लिहून कळविली. त्या निजामानें तें ऐकून संतुष्ट होऊन घोडे आणि इतर योग्य तो अहेर पाठविला.

याप्रकारें यांची ( सोमशेखर नायकाची ) चोहोंकडील राजमंडळांमध्यें प्रसिद्धि झाली.

मग चिकलीसखानाच्या अनुमतीनें तुरुष्कांच्या स्वाधीन झालेले अज्जंपुर, पाळेय व पोन्नूर सासुवेयहळ्ळी हे तीन किल्ले हस्तगत केले. त्यानंतर क्रोधि संवत्सराच्या फाल्गुन मासीं ( इ. स. १७२५ फेब्रुवारी ) ( १८९ ) सोमशेखर नायक कोल्लूर येथें जाऊन मूकांबिकेचें पूजन करीत राहिला. त्यावेळीं इकडे पातशहाच्या अनुज्ञेनें आरेयांचा राजा शाहू राजा याचा वजीर श्रीपतिराय याच्याशीं मिळून त्याचें व आपलें सैन्य दोन्ही एकत्र करून पैशाची मोठी हांव धरून चिकलीसखान चालून आला. तेव्हां नायकानें त्यांना भय दाखवून लिंगपाच्या मार्फत पैसा देववून आपलें राज्य राखिलें.

सोमशेखर नायकांनीं राक्षस संवत्सराच्या मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीच्या ( १७३५ नोव्हें. १० ) दिवशीं नालकी नांवाच्या मनोहर अशा महायानामध्यें आरोहण करून महानवमीच्या मैदानांत प्रयाण केलें व तेथें सरदार, मानकरी यांना उचित मान सन्मान दिले. पुढें नळ संवत्सराच्या चैत्रामध्यें, ( इ. १७३६ मे-जून ) नाळकीवर आरोहण केल्याचें वर्तमान ऐकून चिडलेल्या निजामानें चाल केली; तेव्हां नायकानें युद्धाचा उठाव करून त्याला खूप पैसा देऊन त्याची सेवा पत्करून आपलें चातुर्य प्रकट केलें.

पुढें पराभव संवत्सरीं ( १९० ) शाहू राजाच्या हुकमानें बाजीरावानें येऊन शह दिला. तेव्हां निर्वाहिक लिंगपाच्या कडून समर मांडून, पैसा देऊन त्याला परत लाविलें ( १९१ ).

अशा प्रकारें राज्य करीत असतां, याचें शौर्य, चातुर्य, औदार्य यांची कीर्ति ऐकून त्यांचें दर्शन घ्यावें या उत्सुकतेनें प्रसिद्ध नियोगी अकांपि कोनय्य यानें सकुटुंब आगमन केलें. तेव्हां त्याची भेट घेऊन योग्य रीतीनें त्याचा सन्मान करून त्याची बोळवण केली.

पुढें मोठें सैन्य घेऊन पोन्नाळ्ळीला येऊन सुगुणाबाई राज्याला उपद्रव देऊं लागली. तेव्हां तिचें सैन्य काढून लावून आपल्या राज्याचें रक्षण केलें ( १९२ ).

सोमशेखर नायकांनीं सिद्धार्थी संवत्सराच्या वैशाख वद्य तृतीयेपर्यंत ( इ. १७३९ मे १४ ) एकूण २४ वर्षें तीन महिने २३ दिवस राज्य करून शिमोगेच्या मंडलीपर्यंत शिवैक्य प्राप्त केलें.

**एकादशाश्वासः—**

सोमशेखरानंतर शा. श. १६६२ सिद्धार्थी सं. ज्येष्ठ वद्य ५ मास ( इ. १७३९ जून १४) वीरभद्रनायक याचा पुत्र बसवप्प नायक यास राज्यपद मिळालें ( १९३ ).

किरातांचा मुख्य व चिंतनकलचा अधीश मेदेकेरे नायक हा फार उन्मत्त झाला. त्यानें हरपुराचा नायक बसंतराय याजवर स्वारी केली. त्याला तोंड देणें अशक्य झालें तेव्हां, बसंतराय सहायाची याचना करण्याकरितां बसवप्प नायकाकडे आला. नायकानें सिदोजी याजबरोबर स्नेह जोडून सैन्य आणवून घेतलें. सुबेदार लिंगप्प याजबरोबर मोठें सैन्य पाठवून मेदेकेरे नायकाच्या प्रांताचा विध्वंस केला. होदिगेरे,मोरवंजी आणि वडुम्मी हे किल्ले स्वाधीन केले. नंदीगावेचा किल्ला जिंकून घेऊन त्या किराताची फौज लुटली.

याप्रमाणें होदिगेरे,नंदीगावे व मोरवंजी हे किल्ले हातचे गेल्याचें वर्तमान ऐकून मेदेकेरे नायकानें फत्तेसिंगाबरोबर मैत्री जोडली व तो रघोजी भोसले आदि अत्यंत पराक्रमी वीरांना युक्त अशा असंख्यात सेनासमूहाबरोबर (१९९)मोठ्या गर्विष्ठपणान हल्ला करीत निघाला. पुढें त्यानें चाल करून संतेबेन्नूरच्या किल्ल्याला वेढा देऊन कुंपण व सुरुंग लावले. बसवप्प नायकानें मेदेकरे नायकाचा सगळा पराक्रम हाणून पाडला. वेढा उठवून त्याला पळवून लावलें व किल्ल्यांत प्रवेश केला (२००).

पुढें एकदां आरेयांचा ( मराठ्यांचा ) वजीर वेंकटराय हा तोऱ्यानें मोठ्या सेनेसह येऊन राज्यास उपद्रव देऊं लागला. त्यानें सुरभिपुराचा विध्वंस केला. कुंबसे प्रांतांत उतरून हाहाःकार मांडला. नायकानें त्याची समजूत करून त्याला सीमेच्या पलीकडे घालवून दिलें.

नंतर रक्ताक्षी संवत्सराच्या पुष्य महिन्यांत (इ. १७४५ जानेवारी) शाहूच्या आज्ञेवरून सागरच्या प्रदेशांत स्वारी केलेला बापुराय (२०३) यास सामदंडाचे उपाय योजून सीमेबाहेर काढून लावून राज्याचें रक्षण केलें.

पुढें प्रभव संवत्सराच्या चैत्र मासीं (इ. १७४७ मार्च) नानाजी याचा धाकटा भाऊ सदाशिवराय हा अगणित सैन्यासह चाल करून आला. नायकानें युद्धांत त्याची गांठ घेऊन त्याला परत लावलें. पुढें अंगिरस संवत्सराच्या फाल्गुन मासीं (इ. १७५३ मार्च) व भाव संवत्सराच्या चैत्र (इ. १७५४ एप्रिल) महिन्यामध्यें तो पुन्हां आला. त्यानें पोळेय ( नदीच्या ) पोवाळीच्या प्रदेशांत धाडगाई चालविली. तेव्हां सामदंड या उपायांनीं व धन देऊन त्याला मागें परतवून राज्याचें रक्षण केलें (२०४).

एकदां मेदेकेरे नायकाचा पुत्र कस्तुरिरंग नायक यानें चालून येऊन संतेबेन्नूरच्या किल्ल्याला वेढा घातला. बसवप्प नायकानें त्याशीं सामना केला. बाहेरून मोहिद्खान वजीराचें शौर्य हाणून पाडून मेदेकेरे नायकाच्या मुलास पळवून लावून विजय मिळविला (२०६).

बसवप्प नायकाच्या मागून शा. श. १६७७ च्या भाव संवत्सरीं कार्तिक शुद्ध ५ रविवारीं ( स. १७५४ ऑक्टो. २० ) बसवप्पनायकाचा दत्तक पुत्र चन्न बसवेन्द्र हा राजा झाला.

तो राज्य करीत असतां युव संवत्सराच्या फाल्गुन मासीं **नानारायाच्या** प्रेरणेनें **माधोजी पुरंदर** नांवाचा वजीर मोठें सैन्य घेऊन चाल करून आला. त्यानें येऊन इक्केरीच्या किल्ल्याला वेढा घातला ( २०९ ). नायकानें त्याच्याशीं लढून थोड्याच वेळांत इक्केरीचा वेढा उठविला व त्याला सीमेच्या पलीकडे घालवून दिलें.

पुढें नायक मादेवपुराचा बसवलिंगप्प मंत्री याच्याकडून सर्वाधिकार चालवीत, कालक्रमणा करूं लागला. कांहीं काळानंतर **नानाजीरायाच्या** आज्ञेवरून **गोपालराय** हा मोठें सैन्य घेऊन सरहद्दीवर येऊन राहिला (२१०). तेव्हां नायकानें मंत्रिशिरोमणि बसवलिंग यास पुढें करून मोठें सैन्य जमवून पाठविलें व आपण चन्नगिरि किल्ल्याजवळ शिकारीच्या निमित्तानें राहिला. उचित संभाषण कौशल्य व स्नेहभाव यानीं गोपाळराय याला संतुष्ट करून सीमेच्या बाहेर पोंचवून मैसूर राज्याकडे पाठवून दिलें व अशा प्रकारें आपलें राज्य राखिलें ( २११ ).

## ७ चिक्कदेवराय वंशावळि.

या गद्यात्मक चरित्रग्रंथाचा कर्ता तिरुमलेयार्य. हा म्हैसूरचा राजा चिक्कदेवराय याचा आस्थान कवि होता. यानें हा ग्रंथ सुमारें इ. स. १६७० त लिहिला असावा असें या ग्रंथाचे संशोधक व प्रकाशक श्री. मं. आ. रामानुज य्यंगार्य म्हणतात. यांत चिक्कदेवरायापर्यंतच्या म्हैसूर राजवंशाचा वृत्तांत काव्यमय भाषेत वर्णिला आहे [ पानें ५०–५३ ( तृतीयावृत्ति ) ].

इम्माडि राजरसाच्या मरणानंतर बेट्टद चामराजरसाचा मुलगा वैरिराजगजकंठीरव कंठीरव नरसराज हा राज्याभिषेक करवून घेऊन सिंहासनाबरोबर शत्रूच्या शिरावर पाय देऊन निधडेपणानें राज्य करतां झाला.

एकदां बसवपट्टणाचा केंगे हनुमप्प नायक हा इक्केरी ( इक्केरी ) च्या वीरभद्रनायकावरील वैरामुळें यवनकुलाचा विजया ( जा ) पुराचा सुरिताण महम्मद पादुशाह याजकडे जाऊन, त्याचे पाय धरून, रणदुलखान नांवाच्या सेनापतीबरोबर चाळीस हजार घोडे ( घोडदळ ), चाळीस हत्ती व एक लक्ष पायदळ यांसमवेत येऊन, एकाच सपाट्याला इक्केरीला वठणीवर आणून स्वाधीन करता झाला.

तव्हां तो तुरुक सेनापति ताठून फुगून जावून, आपल्या थोरल्या फौजेशीं तोंड देणारा कन्नड देशामध्यें कोणीच नाहीं असें समजून, पुढें चाल करून, सीरेयच्या नायकाला कैद करून, तुरुगेरेवाल्याला पायाखालीं तुडवून, बेंगळूरवाल्याची दाणादाण करून, एकेकाचा प्रदेश व खजिना हस्तगत करता झाला. मग केंगे हनुमानें हें योग्य नव्हे असें बोलून निराकरण केलें असतांहि न जुमानतां (रणदुल्लाखान) मोठ्या तोऱ्यानें, लहान तोंडीं मोठा घास घेऊन (श्रीरंग) पट्टणाला गराडा घालून वेढा देऊन, अत्यंत आवेशानें ठेवलेलें पाऊल मागें न उचलतां, हटातटानें चालून जाऊन मारून पाडलेल्या प्रेतांच्या राशींनीं भरून काढून दिवसा ढवळ्या खुनाचा बेत करून, (किल्ल्यांतून सुटणाऱ्या) आयुधांच्या प्रचंड माऱ्यानें नामशेष न होतां कोटाला जाऊन भिडता झाला. जेव्हां शिड्या चढून येणाऱ्या शिपायांचीं डोकीं उडवलीं असतांही धांवून धांवून घुसणाऱ्या धडांना भाल्यांनीं टोचून टोचून मस्तकाला चढलेल्या त्याच्या (खानाच्या) धुंदीबरोबर खालीं उतरविण्यांत आलें; तेव्हां तो खान कावरा बावरा होऊन, तोंड पसरून केंगे हनुमाच्या पोटांत आपलें डोकें ठेवून बोलता झाला.

"अहो नाईक! तुमचें बोलणेंच खरें. मीं विजया (जा) पूर सोडल्या दिवसापासून आजवर, फार काय सांगूं, जन्मल्यापासून आजच्या दिवसापर्यंत यासारखा वीर पाहिला नाहीं. हा इतका बलिष्ठ आहे असें आधीं न समजून माझ्या सर्व सैन्याचा बळी दिला. मिळविलेल्या विजयाला मागें लोटलें. संपादिलेल्या यशाला घालवून दिलें. तुझ्या बोलण्याचा धिक्कार केला. दुसऱ्याच तंत्राच्या नादीं लागलों. या पृथ्वीतलावर माझें नांव ऐकतांच गर्भगळित न होणारा, माझी फौज पाहून तेजोभंग न पावणारा व माझ्या तलवारीच्या तेजानें न दिपणारा कोणीच नव्हता. अशा या माझ्या प्रभावाचें मीं या नगरीमध्यें मातेरें केलें. या हल्ल्यामध्यें माझ्या विश्वासाचे निवडक बारा हजार लढवय्ये मारले गेले. बाकी राहिलेले एकदोन दिवसांत रात्रीच्या वेळीं बाहेर पडून हवालदिल होऊन मला सोडून जातील. ते तरी बिचारे काय करतील! कारण (शत्रूच्या हातीं) लुटून जाणारे घोडे, हिसकून घेतलेलीं हत्यारें, कापलीं जाणारीं डोकीं, छाटलीं जाणारीं नाकें यांची गणतीच नाहीं. मी सांपळ्यांत सांपडलों आहे. परत जावयास सुद्धां वाट मोकळी नाहीं. या दुर्दशेंत मला हात देऊन माझें रक्षण करून मला पार पाडा याकरितां पट्टणवाल्याकडून आमच्या लोकांना दिसणार नाहीं अशा युक्तीनें परवाना मिळवून दिल्यास मी सुखानें परत जाईन." यावर नायकानें तसें केलें. मग तो तुरुक सेनानायक पिंजऱ्यांतून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणें, जाळ्यांतून निसटलेल्या ससाप्रमाणें, खोड्यांतून मोकळा झालेल्या चोराप्रमाणें धूम ठोकून आपल्या जागीं जाऊन पोंहचला. या दिवसा-

पासून तुरुक लोक या कंठीरव राजाचें नांव घ्यावयाला किंवा या दिशेला तोंड करावयाला सुद्धां न धजतां थिजून लपून राहिले.

येणेंप्रमाणें यवन सैन्याचा पराभव करून कन्नड देशामध्यें प्रसिद्धि पावलेल्या या राजानें दिग्विजय करावयाचें ठरवून पूर्वेकडे कूच करून विजापुराचा सेनानी खानखाना याच्या सैन्याचा मोड करून, रायगोंटे, रत्नागिरि, रामगिरि, वीरभद्र दुर्ग, केंगेरि हीं मोठीं शहरें बांधून, दाक्षिणेस मधुरेच्या तिरुमल नायकाच्या फौजेस मागें सारून, कोळ्ळेय, सांबळ्ळी, सत्यमंगल, डणायकन कोंटे, हीं सर करून, पश्चिमेस केळलें प्रांतांत पिरियपट्टण हिसकावून तेथील मल्ल राजास कैद करून, उत्तरेस मल्लकाच्या दळाचा धुव्वा उडवून तुरुगेरे, कडव, कल्लूर, हेब्बूर इत्यादि अनेक शहरें काबीज करून, अशा प्रकारें प्रभाव गाजवून कांहीं दिवस राज्य करून परवासुदेव चरणीं सेवेला आपला देह अर्पण केला.

**युवराज चिकदेवरायाची विजययात्रा** ( पानें १५३-५४ ).

हा उपेंद्राप्रमाणें राज्याचा भार आपल्या शिरीं घेऊन जैन यात्रोत्सवास आरंभ करता झाला.

एकदां हा मानोमीच्या ( नवरात्राच्या ) उत्सवांत, आपला स्वामी वीरभद्र नायक याशीं द्रोह करून त्याची सत्ता हिरावून घेतलेल्या इक्केरीच्या शिवप्प नायकानें इतर राजांबरोबर नजराणा पाठविला असतां, त्याचे अपराध लक्ष्यांत घेऊन त्या नजराण्याचा स्वीकार न करतां परत पाठवितां झाला. यावर तो नायक संतापून पाठबळाच्या आशेनें, पूर्वीं बिज्जा नगरीचा राजा असून, मुसलमानांच्या हातीं आपलें राज्य गमावून घेऊन भटकणारा श्रीरंगराय याला आदरानें बोलावून आणून त्याला आपल्या शिवेवरच्या गढी, हासन व बेलूर हे देऊन, त्याजकडून ऐगूरु, तदियकेरे, हरपनहळ्ळी, चिंतनकल, मदगिरि, इ. प्रदेशांच्या नायकांचें सैन्य, आपलें मूल व सैन्य आपल्याला मिळालेलें तुळुव, कोंकण, कोडगु, मल्याळ येथिल मूल सैन्य हीं बरोबर घेऊन पट्टणास येऊन.........

( ग्रंथ येथेंच अपूर्ण राहिला आहे. )

---

## ८ चिकदेवराय विजय.

हा ग्रंथ हि तिरुमलेयार्य विरचित आहे. पण तो चंपू शैलीमध्यें लिहिलेला आहे यांत पूर्वोक्त प्रसंग जरा विस्तारानें वर्णिला आहे. कमी जास्त भाग तेवढा खालीं दिलेला आहे ( पानें ३४ ते ४१ ).

विजापूरचा सेनापति रणदुल्लाखान याच्या नांवाचा उल्लेख नाहीं. (श्रीरंग) पट्टणाचा वेढा बऱ्याच विस्तारानें वर्णिला असून, त्या हल्ल्यामध्यें दहा हजार वीर मेल्यानंतर उरलेल्यांनीं सात वेळां निकराची उठावणी केली. तेव्हां प्रत्येक वेळीं सात हजार, आठ हजार असे लक्ष वीर मृत झाले असें सांगितलें आहे. मग उद्विग्न झालेल्या वजीरा (रणदुल्लाखाना) करितां केंगेय हनुमनायकानें पट्टणाकडे येऊन कंठीरव राजापाशीं रदबदली केली असें वर्णिलें आहे.

दोड्डदेव राजानंतर देवराज गादीवर आला. याला विरोध करावा म्हणून मथुरेच्या चोक्कलिंग नायकानें ईरोडु किल्ल्याला वेढा दिला. त्यावेळीं तेलुंगराय म्हणविणारा श्रीरंगराय, विजयपुरचा वजीर वेदोजी पंडित व सरदार दामले व तुगकवाला (वेल्लूरचा नाईक) इत्यादिकांचें त्याला पाठबळ होतें. (पानें १०७।१०८).

या ग्रंथाच्या प्रत्येक 'संधी' च्या समाप्तिसूचक गद्यामध्यें या काव्याचा नायक जो चिकदेवराय त्याच्याबद्दल "लोकैकवीर, भूरि तुरुष्क शुष्कवन दावानल मराट झाटमेघच्छटा विघटन निराघाट प्रळयकाल जंझानिल...इ." विशेषणें उपयोजिलीं आहेत.

# सूचि

( ग्रामनामापुढें चौकटी कंसांमध्यें अ. च्या पुढें व रे. च्या पुढें दिलेले आंकडे अनुक्रमें अक्षांशाचे व रेखांशाचे आहेत. दशांश चिन्हा मागील आंकडे अंशाचे व पुढील आंकडे कलांचे आहेत. पृष्ठांचे आंकडे कंसाबाहेर दिले आहेत. )


अकबर ५३, ५५-६
अक्कण्ण ६२, ६३
अजमतार ५६, ६६-८
अजमुद्दीन ५६, ६९
अजमुर्दा ६८
अज्जंपूर [अ. १३·५३, रे. ७६·१] ७२
अहमखान ५, ७, ११, १५
अनंगपाळ ५४
अप्पाजीपंत ५९
अप्रतिमवीर [ चिक्कदेव पहा ]
अब्दुलखान ४, ७, ११, १९, ५९, ६०, ६५
अब्दुल महमद् ७०
अब्दुल रहो ७०
अब्दुल हसन ५९
अब्बिणण [ ? ] ४८
अरकलगुड [अ. १२·४५, रे. ७६·४] ३६, ६९
अहमद्नगर [अ. १९, रे. ७४] ३७, ४१-२, ५७, ५९, ६७
अमरासिंग ३८
अरकेरे [अ. १२·२५ रे. ७६·४९] ९
अरविड [ घराणें ] ४७
अरसप्पनायक ५१
अल्लावुद्दिन शहा ५५
अलि येदुलशहा ५७-८
अवरगजब २९, ५२, ५५-७, ६१-७, ७०
असद्खान ५६, ६७
अहोबल नरसिंह ३९
आग्रा [अ. २७·०, रे. ७८·०] ३२
आडुवल्ली [अ. १३·३६; रे. ७५·२] ६६
आदिलशहा २८, ३७, ४८, ५७
आनेगुंदी [अ. १५·२२, रे. ७६·२९] ३९
आनेवट्टी [अ. १४·३६, रे. ७५·८] ७०
आनेवळ्ळी [ बसवापट्टण ] ४६
आनंदपुर [अ. १४·४, रे. ७५·१३] ४४, ६६, ६९
आरेय [ मराठे पहा ]
इक्केरी [अ. १४·८, रे. ७५·५] १, २, १६-७, २२-४ ३३, ३८, ४५-७, ७४, ७६
इम्मडि राजरस ७४
ईरोडु ७७
उज्जिनी [अ. १२·४७, रे. ७७·६] २, ५, ११
उदयपुर [अ. २२·३०, रे. ८३·१८] ५३
एक्कोजी २९, ३४, ६०, ६१
एकांगवीर ४२
एडवमुरारी ४२
एसवंतराव २८-९
ऐगुरु [ ? ] ७६

ओबनायक ( सबगडी ) ३९
ओरुगल्ला [अ. १५·५७ रे.७९·३५] ५६
अंकुशखान २, ५, ७, ११, २३-४, ४२-३,४६
औरंगाबाद् [अ. २०·०, रे. ७६·०] ५६
अंजमौजदिन ५५
अंधकवेंकटय्य ४९, ५०
अंबरखान ५, ११, १५, २३–४,४३,४६
अंबलिगोळ्ळ [ अ. १४·१२, रे.७५·१७] ४७-८
अंमद्खान ४३
आंध्र २२
ओंकारेश्वर ५३
कडब [ अ. १३·१५, रे. ७६·५१ ] ७६
कडबूरु [ अ. १३·३०, रे. ७६ (?) ] ५१
कणतूरु [ ? ] ४८
कनकगिरी [ अ. १५·३४, रे. ७६·२५] २
कन्नोज ५, ७, ६४,
कन्नंबाडी [ अ. १२·२५, रे. ७६·३३. ] १२
कपिलराय ५५
कर्नाटक १–६,८,१२–३,१५–८ २०, २४–५; २९, ३४, ७५, ७६
कर्नाटक काव्यकलानिधी २८
कर्नाटक काव्यमंजिरी ३०
कैरितीखान ४, ११, १५
करीम ७०
कलबुर्गी [ अ. १७, रे. ७७·० ] ३६-७ ३९, ४१
कल्लूर [ अ. १३·१० रे. ७६·५० ] ७६
कल्याण दुर्ग [ अ. १४·३२ रे. ७७·८ ] ४१
कविकल्स ६२, ६४, ६५.
कस्तुरिरंग ७३
कळस [ अ. १३·१३, रे. ७५·२० ] ६६
कामबक्स ५६, ६७–९,
कामियाबखान ६७
कारकळ [ अ. १३·१३, रे. ७५ ] ५१
कालेयखान ७
कावेरी ४७
काशी ५२, ५४, ६२,
काशीपंत ५८
किकेरी [ अ. १२·४६, रे. ७६·२५ ] १०
कुणिगिल [ अ. १३·२, रे. ७७·२ ] ३
कुतुबशाह २८, ५७, ५९, ६३.
कुतुबुद्दीनशहा ५५
कूपखान २३–४
कूबरखान ४६
कुमारय्य ५१
कुमारराम ५५
कुरुक्षेत्र ५२
कुष्णु सुलतान ५५
कूर्म पातशाहा १०,१७
कूसपय्य ४८
केळदि [ अ. १४·१३, रे. ७५·६ ] ३४–५, ४०–१, ५०, ६६.
केळ्ळे ७६
कोटिलिंगप्प ७१
कोटे ( मलुकोटे ? ) [ अ. १२·४०, रे. ७६·३८ ] ८
कोट्टिपूर ४८
कोडगू ( कूर्ग ) ३,२९, ३०,७६
कोडसी [ ? ] ४९
कोडियाल [ अ. १२·२७ रे. ७५·५० ] ४०
कोतची [ अ. १२·२८, रे. ७६·५२ ] ३६
कोन्नूर [ अ. १२·४८, रे. ७६·४ ]

कोल्हूर [ अ. १३·५१ रे. ७४·५२ ] ४६
कोहिला [ कौलिय दुर्ग ? ] ७०
कोव्याल [ अ. १३·३०, रे. ७८·० ]
३, ५, १२, १५,
कोळिवाड [ ? ] ६६, ६९
कौलिय दुर्ग [ अ. १३·४२, रे. ७५·११ ]
४४–५,
कंगोंदी [ अ. १२·४६ रे. ७८·२७ ]
३, ५, १२, १६
कंठरिव नरसराज १, ४, ६, ७–१०,
१२–२७, ७४, ७६, ७७.
कंडलूर [ अ. १३·३८, रे. ७४·५३ ]
४६
कंदुगोरे [ कंदीकेरें ? ] [ अ. १३·३२, रे.
७६·३७ ] ७१
कुंजप्पन दासय ४०
कुंदूरुपे [ अ. ७७ रे. १४·१७ ] २, ५
११, १५
कुंबसे [ अ. १४·८, रे. ७५·३० ] ७३
केंगेरी [ अ. १२·५५, रे. ७७·२४ ] ७६
केंगनायक १, ५, १२, १८
केंगेय हनुम ४६, ४९, ७४-५, ७७
कृष्णय्य ४९-५१
कृष्णप्प ३६, ६९
कृष्णराय ४१-२
कृष्णवेणी ६४
खवासखान ५७-८
खाजी ५७
खानखाना ७६
खांडच [ अ. १३·२२, रे. ७५·३१ ] ६६
खंडोजी दाभाडे ६८
गफार ७०
गया [ अ. २५, रे. ८५·० ] ६२
गलगली [ अ. १६·२६ रे. ७५·० ]
६४, ६७
गाजदीखान ५६
गाजनूर ( नदी ) ६६
गालियखान ५, ७, २३
गीजगनुहळ्ळी ( विजापूर पहा )
गिरिदुर्ग ३
गिरियप्प ५०
गुज्जरात ७, ५६
गुडिय कोटे [ अ. १४·५०, रे. ७६·३६ ]
५, ११
गुत्ति [ अ. १५·९, रे. ७७·४० ] ४३
गुम्मनायकन् पाळें [ अ. १३·४८ रे.
७७·५६ ] ३६, ३८
गुरुवध मांत्रि ७०
गोपाळराय ७४
गोलकोंडा ( भागानगर पहा )
गोविंद वैद्य १
गंगाधरय्य ७०
गंडीकोट ( जम्मलमदगू–कडापा– ) ३७
चन्नगिरी [ अ. १४·२ रे. ७५·५६ ] ७४
चन्नमाजी ४८-५०, ६५-७, ६९
चर्मणावती ६९
चन्नबसवप्प ६९, ७४
चिक्कणनायक ३९
चिक्कदेवराज २८-३५, ७४, ७६-७
चिक्कनायकपूर [ ? ] ५
चिक्कनायकनहळ्ळी [ अ. १३·२५, रे.
७६·३७ ] २, ११, ७१
चिक्कपा ४०
चिक्कबळ्ळापूर [ अ. १४·२६, रे.
७७·४३ ] ३, ५, १२, १५
चिक्कलिसखान ५६, ७१-२

चिक्कसंकण ४७
चितोड ५२-३
चित्रदुर्ग [ अ. १४·१३, रे. ७६·२४ ] ३८-४०
चिलहरखान ७
चेन्नपट्टण [ अ. १२·३९, रे. ७७·१३ ] ६, ८, १०, १२, १९
चेन्नबसव ३३-३५
चेन्नरायपट्टण [अ. १२·४४, रे. ७६·२५] ८, १२
चौकालिंग ७७
चौट [ अ. १४·३४, रे. ७५·१९ (!) ] ५१
चौडप्प नायक ४१
चंगल्व ( गुंतूर-मद्रास ! ) २५
चंदन [ अ. १७·५०, रे. ७४·४ ] ६०, ६७
चंदावर [ अ. १०·४२, रे. ७९·१३ ] ४६, ६१
चंदीगड [ अ. १२·१५, रे. ७९·०] ६१, ६५-७
चांदिनमल्लीक ५९
चिंतनकल [ चित्रदुर्ग ! ] ७३, ७६
जगदेवपंत ५७
जडकल्लू ३९
जडेयकोटे [ अ. १४·३५, रे. ७५·२ ] ४३ ५०, ५७
जन्नोपंत ४६
जमवाडन [ नेलोर ] [ अ. १५·० रे. ८०·० ] ४१
जयचंद्र ५४
जयसिंग ६१, ६२
जरिमले [ ! ] ५१
जलाबुद्दीन ५५
जहांगीर ५५
जातपनायक ४८-५१
जाधवराव ५४
जानसरखान ६६
जानंतराय [ काशीपंत पहा ]
जालेय पाळू ४२
जावली मारली ५९,६०
जिजाबाई ५४
जिन्नोपंत ४९
जिलहरखान ५, १५
जिवाबाई ५४
जुल्फरखान ५६, ५७
जैतजी काटकर, २९, ३२-३, ३५
जैतजी घाटी २८
जंबुखिंड ( जमखिंडी ) [ अ. १६·३०, रे. ७५·१२ ] ४१
डणायनकोटे [ ? ] ७६
तदियकेरे [ ? ] ७६
तम्मण नायक २
तरिकेरे [ अ. १३·५४, रे. ७५·५८ ] ४५, ४७, ७१
तवनिधी [ अ. १४·२६ रे. ७५·९ ] ५०
तळकाड [ अ. १२·११ रे. ७७·३ ] १२
तानाशहा ५९, ६३
तायरखान ७१
तालितखान ४१
तिगुळ २९-३०
तिप्पुरु [ अ. १३·३, रे. ७६·२३ ] १२
तिमिरलिंग ५५
तिम्मण नायक ३९, ४४, ४९-५१
तिम्मनायक ३७

तिम्मपा ६९
तिम्मायि ६६
तिरुमल नायक ७६
तिरुमलार्य ३०
तिरुमलेयार्य ७४, ७६
तीर्थराजपूर [ ! ] ४४
तुमकुरु [ अ. १३·२१, रे.७६·७ ] ३३
तुर्क १०–१५,१७–८, २१-४, २७,३०-१, ३५, ३७–८, ४१, ४३, ४८, ५१-२, ५५, ६५-६ ६९,७२,७७
तुरुगेरे [अ.१३·२१, रे. ७६·४०] २,५,८, २०, २४-५ ७५-६
तुळजाभवानी ३४-५
तुलुव ( मानकरी ) ४९, ५१, ७६
तेरकणांबी [ अ. ११·४९ रे. ७६·४८] १२
तेलुंग ३१
तोडसिहाळे [ अ. १५·५४, रे. ७६·३ ] ४८
त्रिवेणी ५५
दरद्याखुली ७१
दस्तुरखान ४१
दादजी काकडा २८, २९, ३१-३३
दामले ७७
दाराशहा ५६
दासप्पनायक ३७
दिलाल ७०
दिलावरखान ३८
दिल्ली [अ. २८·४२, रे. ७७·६ ] २८–९, ३१–३ ३९–४०, ४२, ५२, ५४–५, ५७, ५९, ६१, ६३, ६६–७१.
दिवाबोंकस ६८
दुम्मी [ अ. १४·३, रे. ७६·५ ] ५६
देवगिरी ( दौलताबाद ) [ अ. १९·५७ रे. ७५·१३ ] ५७,५९
देवराय ३६–७
देविनायक ४३
देवंडपुरी [ ! ] ३
दोखंडेराय ४३
दोड्डदेव ७७
दोड्डसंकण्ण नायक ४२–३
दोड्डेरी [ अ. १४·१९ रे. ७६·४२ ] २, ५
धर्मपुरी [ अ. १२·८ रे. ७८·१० ] ३३
नदीमुल्लु ५७
नरसिंहपूर ( चिंगकुपेट–कडापा ) २, ५ २१, २४,
नल्लुचरवू ३६
नल्लूर [ अ. १३·२८, रे. ७६·५५ ] ७१
नवरसनारी ५७–८
नविलेयगड [ नविले ! ] [ अ. १३·५, रे. ७६·२६ ] ६९
नसीमद्दीन घोरी ५५
नागमंगल [ अ. १२·४८, रे. ७६·४५ ] ८, १०, १२
नानाजी ७३
नानाराय ७४
निजामशहा ४२, ५९
निरुतडी [ अ. १४·२१, रे. ७६·९ ] ३९
नुजुंड २२, २४,
नेडेहाळ्ळि [ अ. १४·२२, रे. ७५·५ ] ६६
नेतोजी ५४, ५९
नोणवनकेरे [अ. १३·१२, रे. ७६·३३] २०
नंजराजेंद्र १, ५–७,९, १०, १४, १९–२७.

नंदीगावें [ अ. १३·२३, रे. ७७·४२ ] ७३
पट्टगुप्पा [ अ. १३·५९ रे. ७५·६ ] ४६
पट्टण [ श्रीरंगपट्टण पहा ]
पट्टद्य्य २१
पट्टाभिरामय्य ७१
पठाण ५, ५५
पत्तेखान ५
पत्तेसिंग ७३
पद्मिनी ५२
पन्नाळी [ अ. १६·४८, रे. ७४·७ ] ६१-२,६४-५,६७
परशुराम ६०
परातखान ४, ७, ४६,
पालुपरे (?) २, ५, ११ १५, २२
पाळेगार ३६
पाळेगार ग्रंथमाला ३६, ३९
पाळय ६०
पिड्डुनायक ६७
पिरियपट्टण [ अ. १२·२०, रे. ७६·५ ] २१, २३, २५,२७, ७६
पुट्टण एम. ए. ३६
पुट्टण ३९, ४६
पूवल हनुम ६, ११, १७
पराहशहा खतनू ५५
पर्वोळे (?) ६९
पैजेयल्ली खान ७०
पोदली लिंगप्प ४०
पोन्नाळी [ अ. १४·१४, रे. ७५·३९ ] ६५-६, ७२-३,
पोन्नूर ( गुंतूर-मद्रास ) ७२
पोसऊरू ( होसूर ) ३४
पोळेय ७२, ७३
पंगुळी [ ? ] ६१
पृथुराज ५४
प्रतापरुद्र ५६
फकीरसाहेब दर्वेसी ५७
फरकशहा ५६
फरसाह ५५
फरक्षाह ५५, ६९
फेरोजखान ४१
फेरोजंघ ५६
फेरोदशहा ५५
फ्रेंच ३९
बडेसाहेबीण ५७-८, ६३
बनवसे [ अ. १४·३३ रे. ७५·६ ] ५१
बरमेमावूत ४९
बरिदग ( वजीर ) ४४
बरीदग ( पादशाहा ) ४२, ५९
बलवंतखान ४, ७, १५
बलुलखान ४७-८, ७०
बल्लाळपूर [ ? ] ३
बसवप्पनायक ३२, ५०, ६९·७०, ७२-७४
बसवपट्टण [ अ. १४·१२, रे. ७५·४८ ] २, १८, ४६, ५१, ७४
बसवलिंग ४४, ७४
बसंतराय ७३
बहिलीमखान ४३
बाहिलोल लूदी ५५
बळ्ळापूर ५, १२, १५
बळिचोड्डु ३९
बागूर [ अ. १३·१, रे. ७६·२२] १९-२०, २४-५
बागेपल्ली [ अ. १३·४७, रे. ७७·४८ ] ३६
बाजीराव ३८, ७२
बाणावर[अ.१३·२४ रे.७६·१०]४५,५१

बापुगाय ७३
बाबर ५५
बारेगुड्ड [ ! ] ४०
बावलूरु [ ! ] ३, ५, १२, १५
बाळाजी विश्वनाथ ६८
बिज्जावर ३, १२, १५, ७६
बिदिरे ( बीदर पहा )
बिदुरूरु [ अ. १३·५०, रे.७५·७ ] ४५, ६७
बिलुसागर [ ! ] ४८
बीदर [ अ. १८, रे. ७७·० ] ३७, ५९
बीळगी [ अ. १४·२१, रे. ७५·५२ ] ४३-५, ४९
बुकन केरे [ ! ] १०
बुदिहाळ [ अ. १३·३७, रे. ७६·२५ ] ४०
बुलंद कथर ५६
बक्कोड ( बेलकोडे ) [ अ. १३·५७ रे. ७५·१९ ] ४८
बेगमु ५६, ६५, ६८
बेट्ट ( चामुंडी ) १०
बेट्टद चामराजरस ७४
बेड २२
बेलुरु [ अ. १२·५८, रे. ७६·४३ ] २, ५-६, ११-२, १५, १९, ४७-८, ५१, ७६
बेळगोरु ४८
बैरनायक २
बोक्कसिंग ४१
बोम्मय्य ६६
बोम्मरसय्य ६९
बोरे ( ! ) ६६
बंकापूर [अ. १४·५५, रे. ७६·१६ ]४६
बंगाजल [ ! ] ५१
बेंगलूर [ अ. १३, रे. ७७·३० ] ३-४ १६, १८, ३४, ७५
ब्रह्मपुरी ६७
भद्रप्प नायक ४४, ४८, ५१
भद्रय्य ४९-५०
भरमप्प नायक ३८
भागानगर [ अ. १७·२२, रे. ७८·२२ ] २८-३० ३२, ३५, ३७, ४०, ४७, ५१, ५७-९, ६२-३, ६८-९.
भागिरथी ५९
भादुर्शाह ( शाहालम पहा )
भीमरथी ६४
भुवनगिरी ४८, ५०, ६६
भैरी निजाम पादशाहा ४१
मत्तिगड [अ. १२·४१, रे. ७७·४८] ५, ११, ३९.
मत्तीवीड १५
मथुरा ७७
मदगिरी [ अ. १३·३८, रे. ७७·१० ] ७६
मदुरा [ अ. १०·० रे. ७८·० ] २१, २७, ३४, ६१, ७६.
मधुरा ( मदुरा पहा )
मद्दरु १०, १२
मनाजी मोरा ६६
मराठे १, ३०-६, ४०, ५१-२, ५७, ५९, ६२, ६७, ६९, ७१-३.
मरेबोवी ( ! ) ४९-५०
मलापहारी ( मलप्रभा ) ३८
मल्लिक विभ्रम ५९
मल्लिकार्जुनगिरी ( ! ) ५१
मल्लिगेखान ७, ११, १५

मसूद ४९
मसूदनशहा रणाति ५५
मसूदा बिबी ५५
महमुद अंजराजादिन ५५
महमुद खान ४३
महमुद तोबर ५५
महमदुल्ला नसलक्क ५५
महम्मद शहा ५७, ६२, ६९,
मादेवपूर [ ? ] ४७, ६६, ७०, ७४,
महानवमीचें मैदान ४९, ७२
मळवळ्ळी [ अ. १२·२३, रे. ७७. ३ ] ८, १२,
मळलवाडी [अ. १२·१८ रे.७६·१७]१२
मळ्याळ २२, २९, ७६
मागडी [ अ. १२·५८, रे. ७७·१३ ] १२
मातुलंग [ ब्रह्मपुरी ] ६४
मादण ६२–३
मामुद्दखान ५-७
मास्ति [ अ. १२·५२, रे. ७८ ] ३, ५, १६,
मिडिजे [ ? ] ५०, ७०
मिरिजा आद्दमखान ७१
मजबुरखान ४९
मुजादिन्नू ६९
मुद्दखुल्ली ५९
मुदालियार २१
मुनिलखान ४१
मुरारिपंत ४४, ५८
मुलूक रहिम २३, २४
मुस्तपखान, ४, ७, ११, १५, २५–६
मूर्तजाअल्ली ५७
मेदेकेरे [ अ. १४·१३, रे. ७६·१ ] ७३
मैसूर [ म्हैसूर ] [अ. १२, रे. ७६·३० ] ४, ५, ८, १०, १२, १४, १९-२१, २३, २६, २८, ३०–१, ३३–५, ४६–८, ५१, ६९, ७१, ७४
मोरवंजी [ ? ] ७३
मोरसू ३, ६, १२, २९–३१
मोहिद्खान ७३
मोळगोंडनहळ्ळी ४०
मौजदिन ५५, ५६, ६८
मंजुळखान ४३
मृत्युंजय देव ४४
यकलासखान ४, ७, ११
यलुप्प नायक ५, ११
यशवंत ३२, ३४–५
याद्वगिरी २८
याद्वाद्रि १०
येकोजी ५४
येकोत सारथी ७
रगटी बलूलखान ५६, ७०
रघोजी भोसले ७३
रजपूत ५४
रणदुल्लाखान १–११, १४, १६–२०, २५, ४०, ४५–६, ७४, ७७
रत्नागिरी [ ? ] ७६
रणमस्तखान ६६
रपेल शहा ५६
राघव पंडित ५, ७
रामराज ४४, ५२, ५४, ६५–७
राणाराजा ५२, ५३
राणोजी घोरपडे ७०
रामकृष्णप्प नायक ४५
रामगिरी [ ? ] ४, ५ १७–१९, २४, २५, ४०, ७६

रामचंद्र नायक ५१
रामराय ४३
रामसिंग ५२
रामानुजाय्यंगार्य ७४
रायगोंडें [ ? ] ७६
रायदुर्ग [ अ. १४·४१, रे. ७६·५० ] २, ५, ११ १५, ३८, ७१
रावुतखान ४१
राहिरी [ रायगड ] [ अ. १८·१३, रे. ७३·३० ] ६०
रुद्रपट्टण [ अ. १२·३६, रे. ७६·७ ] १८
रुप्पाजी भोसले ६६
रस्तुंजमान ४६
रोहिले गंगा ७१
रंगराय ३८
रांगिणी ( रांगणा ) [ अ. १६·४८, रे. ७४·७ ] ६७
रिंगिणी ( रांगणा ? ) ६०
लतेब ५९
लक्ष्मय्य ४९
लक्ष्मीपती ४४, ७१
लेखिनी ( खेळणा ? ) ६०, ६७
लिंगण्णकवी ४०
लिंगप्प ५१, ७१ –७३
लिंगेंद्र १४, २०, २३, २७
बज्रखान ४१
बड्डी ( विजगापट्टम् ) ७
बसुधारे [ ? ] ५१, ६६
बसंतगड ६०; ६७
बसंत नायक ३६–८,
बामिनागिरी ( कनकगिरी ) ६७
बामन गड ६०
विजयानगर [अ. १५·१९, रे.७६·२१] ३२, ३६-३९, ४१, ४७
विजयापूर [ विजापूर ] [ अ. १६·० रे. ७६·० ] १, १०, १७ २५, २८, २९, ३०, ३२, ३५, ३७, ४०, ४२-४५, ४७–४९, ५७, ५९, ६०-१, ६३, ६७-८, ७०, ७५, ७७
विश्रामअल्ली येदुलशहा ६३
विभराम लोदी ५५
विभरम येदुलशहा ५७
वीरदासप्प नायक ३८
वीरभद्र नायक ४४-७, ७२, ७४, ७६
वीरप्पनायक २
वीरभद्रय्य ४९, ५०
वीर वोडेयर ४४
वुडुगणी [ अ. १४·२०, रे.७५·१९] ४७
वेणुपूर [ विदुरूरु ] ४५, ४७, ४८, ५०, ६६, ६९, ७०
वेदोजी ५, ७, ११, १५, २०, २३-४, ७७
वेल्लूर ७७
वंदन [ अ. १७·५२, रे.७४·४ ] ६०, ६७
वेंकटपती ४५
वेंकटप्पनायक ४३, ४४, ४६
वेंकटराय ७३
शरजाखान ४८
शरजाराऊ ६६
शरभजी ५४
शरशहा सूर ५५
शरिमन ५५
शहाअल्ली ५५
शहा मैनुद्दिन ५५
शाठेखान ४१-४३
शादुल्लखान ७१

शाब्जीखान ५६
शास्ताखान ५६, ६१, ६३,
शाहालम ५६, ६८, ६९.
शाहाजी ४, ७, ११, १५, २४, ३०, ३२, ४६, ४८, ५७, ५९, ६०, ६१, ६३.
शाहूराजा ६४, ६५, ६८, ७२–३
शिर्खिंद्र ५७–८, ६३
शिर्खेंद्र लोदी ५५
शिवगंगा [अ. १३.८, रे ७७.१५] ३
शिवप्पनायक ४५-४७, ४९-५०, ७६
शिवाजी २८-९, ३१-२, ५३-४ ५७, ५९-६४, ६७
शेखुकुंद ६९
शेखुनिजाम ५६, ६५
शेरुशहा ५५
शंकर नाराणय्य ४५, ५१
षेरखान ३९–४०
षंषेरखान ३९–४०
सत्यमंगल [अ. ११·३०, रे. ७७·१५] ७६
सत्यागाल [अ. १२·१८ रे. ७६·७] ८, १२
सदाशिवराव नायक ४१-२, ४४, ५१ ७३
सरपन मुलूक ५०
सरीमशहा ५५
सलाबितखान ४३
सवणूर [अ. १४·५८, रे. ७५·१५] ७०
सागर [अ. १४·११, रे. ७५·१०] ४६
सातारा [अ. १७·४०, रे. ७४·०] ६०
सावंत ५१
सासुवेयहल्ली [अ. १४·१०, रे. ७५·५२] ७२
साळो नरसिंगराय ३९
सिडिलगट्ट [अ. १३·२३, रे. ७७·५२] ४
सीदे ५१
सिदोजी ७३
सिद्दप्पशेटी ४८, ७०
सिद्धबसवय्य ६६
सिद्दी मल्लिगेखान ५
सिद्दी रहीम ५, ७, ११
सिमोग्गे [अ. १४·०, रे. ७६·०] ४६, ६६, ७२
सिरसे-सोदे ५१
सीरे [अ. १३·४६, रे. ७६·५६] ३, १६ १८, ६१, ७१, ७५
सुगुणाबाई ७२
सुधापूर [सोंधे] ४८, ५१
सुरभिपूर [?] ७३
सूरेबले [?] ३
सैदाविलास ४८
सोमशेखर ४८, ५०, ७०–७२
सोरब [अ. १४·२४, रे. ७५·५] ४७
सोलापूर ५
संगमेश्वर [अ. १७·१२, रे. ७३·३७] ६५
संजखान ४१, ४३
संतजी २९, ३०
संतम्मनायक ३७
संताजी जगदाब ६६
संते बेन्नूर [अ. १४·१०, रे. ७६·१] ७३
संभाजी २८, २९, ३१-२, ५३-४, ६२, ६४–६५, ६७–८
संयमिनीपट्टण ३३
सांबल्ली [अ. ११·५०, रे. ७७·४८] २१, २७, ७५
सोंडुरू [अ. १५·६, रे. ७६·३६] २, ५, ११, १५

सोंदे [अ. १४·४४, रे. ७४·५२] ४४-५, ४७-८, ५०
श्रीपतीराम ६८, ७२
श्रीरंगपट्टण [अ.१२·२४ रे.७६·४२] १, ४, ६, ८, १०-११, १६-७ १९-२१, २५, २९, ४७, ७१, ७५, ७७
श्रीरंगराय ४७, ७६, ७७
हट्टी [अ. १४·२७, रे. ७५·३४] २, ५, ११
हनुमपा नायक २, ९, १२, १५, १८, ४३, ४५, ५०, ५१
हम्मावु ५५
हमीर सुलतान ५५
हरजी २९-३०, ३२-३
हरद्नहळ्ळी [?] १२
हरदपूर [?] ८
हरपूर [?] ४७, ७३
हरिजी ५९
हरिहर [अ. १४·३२, रे. ७५·५०] ३९, ४०, ४५
हरुपनहळ्ळी [अ. १४·४८, रे ७५·५९] २, ५, ११, १५, ४०, ७६
हसन गंगू ५९
हानगल [अ. १४·४६ रे. ७५·५] ४३
हारोवेदुप ७१
हासन [अ. १३·० रे, ७६·५] ५१ ७६
हिरियूर [अ. १३·५५ रे. ७६·४७] २, ५
हुलियरु १९
हूवय्य ४८
हेब्बूर [अ. १३·७ रे. ७७·२] ७६
हैदरअल्ली ३९
हैदर मल्लिनायक ४३
होदिगेरं [अ. १४·३ रे. ७६·०] ७३
होन्नाळि [१४·१४ रे. ७५·३९] ५० ७०
होरकेनायक ४०
होसऊरु [अ. १३·३५ रे. ७७·२७(?) ३
होसकोटे [अ. १३·४, ७७·४८] ३ ५, १२, १६
होसंगडी [अ. १३·४२ रे. ७५·१] ५०
होसहोळल [अ. १२·३८ रे. ७६·२९ १२
होळल [अ. १२·३३ रे. ७६·५०] १०
होळवनहळ्ळी [अ.१३·३२ रे.७७·१८ ३, ५, १२, १५
हंप ४७

# केळदीच्या नायकांची वंशावळ

- चौड-गौड (इ. १५०६)
  - सदाशिव-नायक (इ. १५४५-६५)
    - दोड्डसंकण्ण-नायक अर्थात् इम्मडि सदाशिव-नायक (इ. १५६६)
      - रामराज-नायक (इ. १५७०-८६)
        - विरप्प-नायक (इ. १६३०)
      - वेंकटप्प-नायक (इ. १५९२ ते १६२९)
        - भद्रप्प
          - वीरभद्र-नायक (इ. १६२९-४५)
    - चिक्कसंकण्ण-नायक (इ. १५७०-८०)
      - सिद्दप्पा
        - शिवप्प-नायक इ. १६५२, १६५९ (१६४५-६०)
          - भद्रप्प-नायक इ. १६६१-१६६३ (१६६१-६३)
          - सोमशेखर-नायक १६६३-६७ (१६६३-७१) (पत्नी) चन्नम्माजी इ. १६६१ ते ९७
            - बसप्प-नायक १ ला (दत्तक) इ. १७०२-१४ (१६९७-१७१४)
              - सोमशेखर-नायक २ रा इ. १७२२-३७ (१७१४-३९)
              - वीरभद्र
                - बसप्प-नायक २ रा इ. १७४०, १७५२ (१७३९-५४) (पत्नी) वीरम्माजी (१७५७-६३)
                  - चेन्नबसप्प-नायक (दत्तक) इ. १७५५ (इ. १७५४-५७)
                  - सोमशेखर-नायक ३ रा (दत्तक) इ. १७५८
        - वेंकटप्प-नायक इ. १६६० (१६६०-६१)
  - भद्रप्प

# म्हैसूरच्या राजांची वंशावळ

१ यदुराय (इ. १३९९–१४२३)

२ हिरियबेट्टद चामराज (इ. १४२३–५९)

३ तिम्मराज (इ. १४५९–७८)

४ हिरिय चामराजरस २ रा (इ. १४७८–१५१३)

५ हिरिय बेट्टद चामराज ३ रा (इ. १५१३–१५५३)

६ तिम्मराज २ रा (१५५३–७२)

७ बोळ चामराज ४ था (इ. १५७२–७६)

८ बेट्टद चामराज ५ वा (इ. १५७६–७८)

९ राज ओडेयर (इ. १५७८–१६१७)

हलु मुप्पिन देवराज

१२ कंटीरव नरसराज (इ. १६३८–५९)

नरसराज

११ इम्माडिराज ओडेयर २ रा (इ. १६३७–३८)

१० चामराज ओडेयर ६ वा (इ. १६१७–३७)

१३ दोड्ड देवराज ओडेयर (इ. १६५९–७३)

१४ चिक्क देवराज ओडेयर (इ. १६७३–१७०४)

१५ कंटीरव महाराज ओडेयर (इ. १७०४–१४)

१६ दोड्ड कृष्णराज ओडेयर (इ. १७१४–३२)

१७ चामराज ओडेयर ७ वा (इ. १७३२–३४)

१८ कृष्णराज ओडेयर (इ. १७३४–६६)

१९ नंजराज ओडेयर (इ. १७६६–७०

२० बेट्टद चामराज ओडेयर ८ वा (इ. १७७०–७६)

२१ खासा चामराज ओडेयर ९ वा (इ. १७७६–९६)

२२ कृष्णराव ओडेयर ३ रा (इ. १७९९–१८६८)

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला

(१) मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश (पृ. २४३–रा. ब. वा. अ. बांबर्डेकर. रु. २ व रु. १०१४)
(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (पृ. ५०–स. म. दिवेकर. रु. ०१० व ०८)
(३) श्री शिवभारत (कवींद्र परमानन्दकृत) मूळ व मराठी भाषांतर (पृ. ५८९) –स. म. दिवेकर. रु. ६ व ५०१२)
(४) शिवचरित्रप्रदीप (पृ. ३२५– द. वि. आपटे. व स. म. दिवेकर, कागदी व कापडी. रु. ३॥ व ४ आणि रु. ३। व ३॥)
(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला. (पृ. २००–कै. रा. सा. रु.वि.वझे रु.३ व रु.२)
(६) शिवकालीन जंत्री शके १५५१–१६५० (पृ. २००–कै. ग. स. खरे रु. ५)
(७) साधन–चिकित्सा (पृ. ३२०–वा. सि. बेन्द्रे. रु. ३॥ व रु. ३)
(८) ऐतिहासिक पोवाडे (पृ. ६१५–य. न. केळकर. रु. ३ व रु. २॥)
(९) वाठारकर निंबाळकर–इतिहास (पृ. ३०० रु. १॥ व १०३०३)
(१०) भूतेश–आख्यान (पृ. ७५ ०१२ व ०१०)
(११) कऱ्हाड, (पृ. ५४–श्री. य. रा. गुप्ते, बी. ए. ०८)
(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (पृ. ६००–कै. वि. का. राजवाडे रु. ३ व २०६ ०६)
(१३) राजवाडे यांचे संकीर्ण निबंध (पृ. २९१ श्री. शं. ना. जोशी रु. २ रु.१॥)
(१४) राजवाडे संकीर्ण निबंध भाग ३ रा. (पृ. २८० श्री. शं. ना.जोशी १व२०१४)
(१५, १६) प्रकाशित व्हावयाचे आहेत.
(१७) पुरंदरे–दप्तर, भाग २ रा. उत्तर पेशवाईतील पत्रव्यवहार (रु. ३ व रु. २॥)
(१८) The Deliverance or the Escape of Shivaji the Great from Agra (R. S. G. K. Deshpande रु. ३ व रु. २॥)
(१९) लोककथा, पुस्तक १ लें (शं. ग. दाते कापडी कागदी रु.१॥ व रु.१, १। व ०१४)
(२०) पानसे घराण्याचा इतिहास (कै. रा. ब. पानसे रु. ३ व रु. २॥)
(२१) कै. वासुदेवशास्त्री खरे–चरित्र (दा. मो. भट रु. २॥ व रु. २।=)
(२२) लोककथा भाग २ रा. (पृ.८०–श्री. शं.ग. दाते रु.१०८ व १०४ व १०४व०१४)
(२३) संपूर्ण भूषण (पृ. २३०–श्री. रा. गो. काटे–रु. १०८ व १०४)
(२४) शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा (पृ. २८२– रु. ३ व रु. २०८).
(२५) राजधानी रायगड (पृ. १६४–श्री. वि. वा. जोशी रु. १ व ०१२)
(२६) Shivaji the Founder of Maratha Svaraja (pp. 410 –C. V. Vaidya Rs. 3 and Rs. 2-8-0)
(२७) आळंदी (पृ. २०–श्री. ग. ह. खरे ०२)
(२८) मठगांवचा शिलालेख आणि कुडाळप्रांताचा प्राचीन इतिहास (पृ. १६५– अ. ब. वालावलकर रु. १०२ व ०१२)
(२९) पुरंदरे दप्तर भाग ३ रा (पृ. २५०–श्री. कृ. वा. पुरंदरे ३ रु. व रु. २०८)
(३०) मध्वमुनीश्वराची कविता (पृ. २५८–श्री. कै. प्र. व्यं. गुळ्वी ३ व २०८)
(३१) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (पृ. ९०–श्री. वि. गो. दिघे रु. १ व ०१२)
(३२) वेदस्तुति आणि स्फुट कविता (कृष्णदयार्णवकृत)–(किं. ०१२ व ०१०)
(३३) ज्ञानप्रदीप (पृ. १२५–प्रो. द. वा. पोतदार रु. १ व ०१२)
(३४) पेशवाईच्या सावलीत (पृ. ४००–श्री. ना. गो. चापेकर किं. रु. ४ व ३).

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-स्वीय-ग्रंथमाला

* अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारानें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर केले आहेत. ‡ हें पुस्तक शैक्षणिक (training) संस्था व शिक्षकग्रंथालयें यांसाठीं मंजूर झालें आहे.

| अनुक्रम | किंमत रु. |
|---|---|
| १ अहवाल (शके १८३२) | ३ |
| २ ,, (शके १८३३) | ५ |
| ३ सुबंत विचार (के.वि.का.राजवाडे) | १० |
| ४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४) | ५ |
| ५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (के.वि.का.राजवाडे) | १८ |
| *६ प्रथम संमेलन वृत्त (शके १८३५) | ०१२ |
| *७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५) | ६ |
| *८ द्वितीय संमेलन वृत्त (शके १८३६) | ३ |
| *९ वार्षिक इतिवृत्त (शके १८३६) | ३ |
| *१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) | ३ |
| *११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) | ६ |
| *१२ तृतीय संमेलन वृत्त (शके १८३७) | ३ |
| *१३ मुकुंद-महाभाष्यं (संस्कृत) | ०८ |
| *१४ ग्रंथराज (दासोपंत) | ०८ |
| *१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला | ०१२ |
| *१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा | ०१२ |
| *मंडळ-त्रैमासिकः-१८४२-१८५८, १७ पुस्तकें प्रत्येकी | ३ |
| *१७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८) | ३ |
| १८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शके १८३८) | ३ |
| *१९ राजवाडे-खंड-स्थलसूची | ४ |
| *२० पंचम संमेलन-वृत्त (शके १८३९) | ३ |
| २१ संशोधनसंग्रह (१८३९) छापत आहे. | |
| २२ चंद्रचूड-दप्तर-कला १ | ३ |
| २३ महाराष्ट्र-सारस्वत (संपलें) | |
| २४ षष्ठ संमेलन-वृत्त (१८४०) | ४ |
| २५ सप्तम संमेलन वृत्त (१८४१) | ३ |
| २६ संशोधकाची छोटी जंत्री | ०४ |

| अनुक्रम | किंमत रु. |
|---|---|
| २७ प्रदर्शन परिचय | ०४ |
| *२८ फारसी पत्रव्यवहार-मूळ व भाषांतर (कंपनी व पेशवे) | ५ |
| २९ फार्सी-मराठी कोश | ४ |
| ३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला | १८ |
| ३१ Historical Miscellany | ३ |
| ३२ पुरंदरे-दप्तर भाग १ | ४ |
| ३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा. | ४ |
| ३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ला | २ |
| ३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खं. १, २ | |
| ३६ राजाराम-चरितम् | १८ |
| ३७ मंडळांतील नाणीं | १ |
| †३८ शिवचरित्र साहित्य खंड ४ | १८ |
| ३९ A History of the late Revolution in the Kingdom of Golconda मराठी विवेचन | रु. ४ |
| †४० ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ला. | १८ |
| †४१ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड २ रा. | २ |
| †४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३ रा. | १८ |
| ४३ मंडळ चित्र ग्रंथ चित्रें २० | ०८ |
| ४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं. ३ | २॥ |
| ‡४५ विजयनगर स्मारकग्रंथ | ४ |
| †४६ ऐतिहासिक फारसी साहित्य खंड २ | १८ |
| ४७ शिवचरित्रसाहित्य खं. ६ | १८ |
| †४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार | ०१२ |
| ४९ शिवचरित्रवृत्त संग्रह कानडी विभाग | १ |

टीप-ट. ह. व बंगी, व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. † हा ग्रंथ त्रैमासिकांत भागशः प्रसिद्ध झाला आहे. ४०, ४१, ४६, ४८ स्वतंत्रही मिळतात.

## भा. इ. सं. मंडळाचे चार नवीन ग्रंथ

स्वीयमाला क्र. ४५

### विजयनगर स्मारक ग्रंथ (मराठी)

४०० पृष्ठें, ६० चित्रें, किंमत ४ रुपये.

हा ग्रंथ कर्नाटक पब्लिशिंग हाऊस चिरा बाजार
मुंबई नं. २ येथेंही मिळेल.

स्वीयमाला क्र. ४६

### ऐतिहासिक फारसी साहित्य खंड २

१०० पृष्ठें, ५० लेख, किंमत १॥ रुपया.

मूळांचें फारसी लिपींत वाचन, मराठी भाषांतर, टीपा
आणि इंग्रजी सारांश यांसह.

स्वीयमाला क्र. ४७

### शिव-चरित्र-साहित्य खंड ६

१५० पृष्ठें, १७५ पत्रें, किंमत १॥ रुपया.

कर्नाटक व महाराष्ट्र यांतील १७५ पत्रें, त्यांवरील टीपा,
पत्रांची कालवार यादी, इत्यादींसह.

स्वीयमाला क्र. ४८

### मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार

९० पृष्ठें, २ नकाशे व १ चित्र, किंमत बारा आणे.